साप्ताहिक माणूस शनिवार । ९ मार्च ७४ । एक रुपया

## मुंबईच्या आमदारनिवासात 'चेतक'चा एक फेरफटका




दर्डामहाराजांच्या आणखी काही लीला – पृष्ठ २६

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ९ मार्च | अंक : एकेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया] |


# साप्ताहिक माणूस



## अंबरसिंग सुरतवंती

जन्म : १९३९ (पाडळदे-शहादे) । मृत्यू : २५ फेब्रुवारी १९७४ (पुणे)

# गड आला, सिंह गेला !

तरुण मित्राचे प्रेत घेऊन गाडी शहाद्याकडे निघाली.

हा हन्त हन्त !

पुढचे मागचे बराच वेळ काही आठवले नाही.

मग हळुहळु एकेक चरण आठवत गेला.

**रात्रीर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्**

रात्र संपेल, पहाट उजाडेल.

**भास्वान् उदेष्यति हसिष्यति पद्मजालम्**

सूर्य वर येईल, सगळी कमळे उमलतील.

**इत्थं विचिंतयति कोशगते द्विरेफे**

रात्रभर कमळात अडकलेला भ्रमर अशी स्वप्ने रचित होता—

**हा हन्त हन्त नलिनीम् गजमुज्जहार...**

हाय ! हत्तीने देठासकट कमळच उपटून नेले...

तरुण मित्राच्या आयुष्याची आज अशीच शोकांतिका झाली होती.

आत्ताच कुठे शहाद्यातील हे कमळ उमलू लागले होते.

येथल्या आदिवासींची शतकानुशतकांची रात्र सरली होती.

नव्या आशाआकांक्षा उमलत होत्या.

मनोरथ धावू लागले होते.

भ्रमर स्वप्ने पाहत होता—लवकरच आपण मुक्त होऊ; जंगलात गाऊ, नाचू; शेतात काम करू.

पण हाय ! स्वप्ने निखळली. मनोरथ कोसळले.

अगदी देठासकट कमळ उपटले गेले.

पुन्हा रात्र. पुन्हा तो बंदिवास.

पुढची पहाट आता केव्हा उजाडेल !

¤

गाडी पुढे धावत होती.

पहिली साखळी मध्येच केव्हातरी तुटली. मन इतिहासात गेले.

गड आला पण सिंह गेला !

आजवरची मोहिम तर यशस्वी झाली होती. शहाद्यातील आदिवासींना जमिनी तर मिळाल्या होत्या. पण मोहिमेचा सेनापती, या भूमुक्ती आंदोलनाचा नेता लढाईत कामास आला होता. गड मिळाला पण सिंह गमवावा लागला.

असे मरण तरी किती जणांच्या भाग्यात असते? लढाईतले मरण ! 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्...

अंबरसिंगला हे मरणभाग्य लाभले आहे...

¤

पांढरी चादर. त्यावर निघताना कुणीतरी वाहिलेली कण्हेरीची ताजी फुले.

आतले निश्चेष्ट, गोठलेले, थंड शरीर.

ही प्रथा का पडली असावी !

प्रेतावर ही प्रसन्नतेची पखरण कशासाठी ?

मृत्यूची भीषणता कमी जाणवावी म्हणून !

मरण दुःखदायक आहे, पण जीवन तरी कुठे थांबते आहे ?

लांबरुंद पांढऱ्या चादरीवर तांबडी फुले हसतातच आहेत.

न जायते म्रियते वा कदाचित्...

¤

कल्लोळ. लाटा. बेभान शोक.

किंचाळ्या. आक्रोश. हंबरडे.

शववाहिनी शहाद्यात पोचली होती.

असे वेढून टाकणारे दुःखदृश्य यापूर्वी कधी पाहिले नव्हते. अशा गदारोळात कधी सापडलो नव्हतो. ऐकले होते, वाचले होते, की आंबेडकरांच्या वेळी लक्षावधी अनुयायी असेच धाय मोकलून रडले, महाशोक उसळला—सागरासारखा.

तो सागर मुंबईला उसळला होता. हा एक महाराष्ट्राचा कोपरा होता—हाच काय तो फरक.

लाटांवर लाटा. दुःखाच्या, शोकाच्या. कार्यकर्ते गांगरून गेले. कसा आवरायचा हा समुद्र !

लोंढे येतच राहिले. चहूदिशांनी. बातमी पसरत गेली तसतसे. शहाद्यातून, आसपासच्या गावातून, लांबलांबहून. वाहनांनी, पायी, धावतपळत, हातातली कामे टाकून, जेवणखाण सोडून.

कुणी आल्याआल्या जमिनीवर कोसळत. मातीत गडबडा लोळत. मिठ्या मारमारून कुणी हंबरडत. कपाळ बडवीत. छात्या पिटत.

बायांचा तर कहरच उसळला होता.

तास झाला. दोन तास झाले. समुद्र शांत होत नव्हता.

या शोकसमुद्रात सापडणे, लाटांनी वेढले जाणे, त्यात बुडणे आणि वर येणे हा एक महानुभव होता.

आपली 'सुविहित' मरणे, टापटिपितली !

आदिवासी समाज सगळे कसे बेभानपणे करत असतो !

उत्सवानंदात रात्ररात्र बेहाय नाचतो, शिकारीमागे दोन दोन दिवस पळत राहतो. दुःखावेगालाही मर्यादा नाही. बांध नाही. आवर नाही. सगळेच अफाट. छात्या फुटून निघाव्यात इतके.

पाडळद्याला. अंबरसिंगच्या गावी. शहाद्यापासून पाच मैलावर. ज्या झाडाखाली भजने म्हणत, स्वतःची रचत अंबरसिंग लहानाचा मोठा झाला तेथे सगळेजण जमलेले आहेत.

झाड लहानसेच. अशोकाचे की पिंपळाचे ?

भाऊंनी तो अशोक सांगितला. भाऊ मुंदडा. अंबरसिंगला ज्यांनी आपला मुलगा मानले होते. सभेत त्यांनी अंबरसिंगचे ऐकलेले पहिले भजन म्हणून दाखवले होते—थोड्या वेळापूर्वी.

या दिव्यात तेल नाही—

तरीही तो जळतो आहे !

जवळ सत्ता नाही, संपत्ती नाही, कुठलीही साधने नाहीत. तरीही आदिवासी समाजाला नवा प्रकाश हा अंबरदिवा देत राहिला. अगदी काल-परवापर्यंत. जेमतेम चार–पाच वर्षं ही ज्योत तेवली. पण तिने मागच्या पुढच्या कित्येक वर्षांचा अंधार उजळून टाकला.

¤

सूर्यास्ताची वेळ झाली.

झाडाखालचे विवर खणून तयार होते.

यात अंबरसिंगचा देह ठेवायचा, त्यावर नंतर एक लहानसे देऊळ बांधायचे असे सर्वांनी अगोदरच ठरवलेले होते. देवळातल्या देवाचे लोकांनी नावही ठेवले— श्रमदेव. आमचा अंबरदादा, आमचे महाराज, आमचा श्रमदेव. सातपुड्यातील आदिवासींचा जुना वाघदेव होताच— अजूनही आहे. अंबरसिंग आता त्यांचा नवा श्रमदेव होणार !

तेहतीस–चौतीस वर्षांचे सारे आयुष्य !

माणसाचा देव होऊ शकतो !

¤

विवरात बाजूला आणखी एक कोनाडा केला होता. त्यात बसलेल्या स्थितीत अंबरसिंगला अगदी हळूवार हातांनी ठेवले गेले.

बायांची शेवटची शोकगीते...

भाऊंची रामधून, गीता...

अमर रहे, अमर रहे, हा जनकंठनिनाद...

मिठाची रास वाढत होती.

लिंबाचा पाला पसरून झाला.

शेवटचा नैवद्य ठेवला. आरती झाली.

सूर्य मावळला.

मातीचा एक थर


दुसरा थर

भराभर माती लोटली जात होती.

आम्हीही एकेक मूठ माती वाहिली.

नमस्कार केला आणि निघालो.

—श्री. ग. मा.



अंबरसिंगमहाराजांसाठी ऐपतीप्रमाणे रुपये दोन फक्त पाठवीत आहे. आपण त्यांच्यासाठी निधी उभारावा ही विनंती. शहाद्याच्या आदिवासींच्या लढाईतील अंबरसिंग ही धगधगती खूण होती. त्याने आदिवासीजीवनात अद्‌भुत क्रांती केली, त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी सर्वोदयाची त्याने दीक्षा घेतली होती. आदिवासींच्या रास्त हक्कासाठी शहाद्याच्या सर्वोदय चळवळीने सक्रीय आचारधर्म तडफेने स्वीकारला होता आणि कसोशीने तो पार पाडण्याची पराकाष्ठा केली. याचे श्रेय अंबरसिंगलाच आहे. शेवटी एक प्रश्न—जगात परमेश्वर आहे का ?

२७ फेब्रुआरी

अ. वि. वरोडे
रतनगल्ली
त्र्यंबकेश्वर (नासिक)

[ निधी जमविण्याचे काम पुण्याच्या साधना साप्ताहिकाद्वारे यापूर्वीच सुरू झाले आहे. आपण म. ऑ. ने पाठविलेले रुपये दोन साधना कार्यालयात पाठवीत आहोत. आपणहून पाठविलेत म्हणून या दोन रुपयांचे मोल विशेष वाटले. —संपादक ]

# थाळीवादन, विधानसभा घेराव आणि नंतर....

सु. ल. सोमण

शुक्रवार २२ फेब्रुवारी. आ. मृणाल गोरे व प्रामुख्याने समाजवादी पक्षाने, नाईक मंत्रिमंडळाविरुद्ध इषारा घंटा वाजवायचे आवाहन मुंबईकरांना केले होते. जनसंघ व त्याच्या अधिपत्याखालील विद्यार्थी परिषद आदी संघटनांनी आदल्या दिवशीच ह्या कार्यक्रमाला पाठिंबा जाहीर केला. इतर डाव्या पक्षांचा विरोध नव्हताच. ह्या 'इषारा-घंटा' वादनाच्या वेळी खुद्द श्री. वसंतराव नाईक, ग्रँटरोड इथल्या अप्सरा सिनेमा गृहात होते. 'हिंदुस्थान की कसम' ह्या चित्रपटाचा तिथे 'चॅरिटी शो' होता. हवाई दलाच्या पीडीत, अपंग वगैरे लोकांच्या मदतीसाठी. थाळी वादनाचा कार्यक्रम आणि अप्सरातला चित्रपट–वेळा साधारणतः सारख्याच होत्या आणि त्यामुळे लॅमिंग्टन रोडवर हे भलेमोठे पोलिसांचे जाळे उभारले गेले होते. गिरगावातला हा भाग, सततच धुमसत राहिलेली मध्य मुंबई इथेच साधारणपणे थाळी-वादनाचा धमाका उडेल आणि कदाचित गडबड माजून जाईल अशा तयारीत त्या दिवशी पोलीस होते.

पण त्या दिवशी घडले मात्र नेमके वेगळेच. वर उल्लेखिलेल्या व अन्य गरिबांच्या आणि मध्यमवर्गीयांच्या वस्त्यातून कानठळ्या बसवणारा 'इशारा-घंटा' नाद झाला नक्कीच. त्या आवाजाने नाईक सरकारची निदान त्या रात्रीची झोप तरी नक्कीच उडाली असणार! (कायम झोप उडेल असे मला तरी कधीच वाटत नाही!!) पण ह्या वस्त्यांमधल्या घंटानादाचे यश, काळबादेवी, मलबारहील आदी ठिकाणी घडलेल्या प्रकारांनी काहीसे झाकाळले यात मात्र वाद नाही. जिथे जिथे जनसंघाचा जोर होता आणि त्यातही जिथे गुजराथी समाज मोठ्या प्रमाणावर होता, तिथे 'थाळी-वादन' नुसते 'थाळी-वादन' राहिले नाही, तर ते एक हिंसक आंदोलन बनले. दूध केंद्रे जाळली गेली, बसेस पेटवल्या गेल्या, रस्त्यावरून धावणारी खाजगी वाहने रोखून त्यांना आपापले 'हॉर्नस' सतत वाजवत राहाणे भाग पाडले गेले. ह्यातूनच काबूबाहेर जाणाऱ्या जमावाला आवरण्यासाठी पोलिसांना ठिकठिकाणी गोळीबार करावे लागले. गोळीबारातल्या मृतांची अधिकृत संख्या आठ आहे. अनधिकृत, सांगो-वांगीचा आकडा विसाच्या घरात आहे. जखमींची मोजदाद जवळ जवळ अशक्य आहे. कारण त्यापैकी कित्येक घरात पडून आहेत, कित्येकांच्या जखमा उजेडात आलेल्याच नाहीत.

गगनचुंबी इमारतीतला तरुण एरवी रस्त्यावर येतो तो 'बॉबी'-तली गाणी गुणगुणत आणि रस्त्यावरच्या प्रत्येक तरुणीत 'डिंपल' शोधीत! पण त्या दिवशी मोठमोठाले फटाके उडवीत हा तरुण बाहेर आला तो विध्वंसाच्या तयारीनेच. मुंबईचा अहमदाबाद करण्याच्या तयारीनेच. गुजराथचे काही (सुमारे १०००) तरुण मुंबईत 'ह्या' प्रकारच्या आंदोलनाला मार्गदर्शनासाठी जनसंघाने आणले होते, असा एक आरोप आहे. ह्यात कितपत तथ्य आहे हा महत्त्वाचा भाग आहे, संशोधनाचा विषय आहे. पण एक गोष्ट मात्र नक्की की, अहमदाबादच्या यशाची धुंदी इथल्या गुजराथी तरुणाला चढली होती आणि त्या नशेतच रस्त्यावर येऊन त्याने त्या दिवशी धमाल उडवून दिली. खुद्द अहमदाबादेतून कार्यकर्ते येऊन त्यांनीच केवळ हिंसक प्रकार केले, चिथावण्या दिल्या ह्या म्हणण्याला फारसा अर्थ नाही. माझ्या माहितीप्रमाणे खुद्द जनसंघाचे असे दहा-बाराच कार्यकर्ते गुजराथेतून मुंबईत आले होते व तेही 'युवा-संघ' प्रस्थापनेची चर्चा करण्यासाठी. ह्यातले बहुसंख्य कार्यकर्ते 'थाळी-वादन' कार्यक्रमाच्या आदल्याच दिवशी गुजराथेत परतले होते.

हा वादाचा विषय थोडा बाजूला ठेवला, तरी त्या दिवसाचा मान प्रामुख्याने गुजराथी वस्ती असलेला भाग घेऊन गेला–गिरगाव, मध्य मुंबई, उपनगरे ह्यातून ह्या 'इशारा घंटा' कार्यक्रमाला भरघोस यश मिळून देखील! ह्या साधारणतः गरीब आणि मध्यमवर्गीय वस्त्यांतून झालेला घंटानाद खरोखरच दणदणीत होता. कुणालाही धडकी भरवण्याचे सामर्थ्य त्यात निश्चित होते. (जाड कातडीच्या शासनाला मात्र तरीदेखील धडकी भरली असेल असे वाटत नाही!) असे असूनही एरवी शांत असणाऱ्या व साधारणतः 'श्रीमंत' समजल्या जाणाऱ्या वस्त्यांतून हिंसाचाराला त्या दिवशी जो ऊत आला त्यामुळे नंतर गाजले ते इथलेच 'थाळी-वादन.' त्याचे नेतृत्व गुजराथेतल्या वारसामुळे साहजिकच जनसंघाकडे आले. इथला बहुसंख्य गुजराथी समाजही प्रायः संघाकडे झुकलेला असल्यामुळे हा संबंध जोडणे सहज शक्य झाले. त्यामुळे दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांतून व नंतर विधानसभेत झालेल्या चर्चेतूनही असा एक सूर लावला गेला की, त्यामुळे आपोआपच, मूलतः जनसंघाचे नसलेल्या आंदोलनाचे नेतृत्व जनसंघाच्या गळ्यात जाऊन पडले. डाव्या पक्षांना गरीब मध्यमवर्गीय वस्त्यांतून संयमपूर्ण पण तरीही प्रचंड आंदोलन छेडण्यात यश मिळाले, मोठे यश मिळाले हेच मुळी इथे विसरण्यात आले. म्हणूनच, विधानसभेत बोलताना श्रीमती मृणाल गोरे व इतर बोलताना म्हणाले, '...तुम्ही काळबादेवी, वाळकेश्वर, मरीन लाईन्स भागातच हिंडला म्हणून तुम्हाला तिथले आंदोलन दिसले. परळ–धारावीतून हिंडला असतात तर तुमच्या कानाचे पडदे फाटले असते...जनसंघाला वेगळे काढून बडवण्यामुळे विरोधकात फूट पडेल, सरकारविरोधी आंदोलन ढेपाळेल हा तुमचा होरा साफ चुकीचा आहे...'

आंदोलनाच्या काळात जनसंघानेही स्वतःवर लादल्या गेलेल्या नेतृत्वाचा फायदा घेऊन वाहत्या गंगेत हात धुवून घ्यायचा प्रयत्न केला. संघर्ष समिती स्थापित केली, स्वतःची युवक आघाडी उघडून आंदोलनाला आलेली गति वाढवायचा प्रयत्न केला... शनिवार, रविवारीही हे प्रकार घडतच राहिले. मुंबईतली हवा गरम होऊ लागली होतीच. गुजराथ शांत नव्हतेच .. राज्याच्या बजेटात कराचे नवे ओझे लादले गेले होतेच... धान्य, बाजारात नव्हते, ते आणखीच दुर्मीळ होऊ पाहात होते... रॉकेलच्या रांगा वाढतच होत्या... रेशनिंगच्या तक्रारी होत्याच...

ह्या पार्श्वभूमीवर २५ फेब्रुवारीला विधानसभेला घेराव घालण्याची घोषणा केली गेली. ह्या आंदोलनाला विरोध करण्याची घोषणा शिवसेनापती ठाकऱ्यांनी केली. ती घोषणा करताना, 'मुंबईचा अहमदाबाद होऊ देणार नाही' अशा वल्गनाही त्यांनी केल्या. गुजराथेतल्या आंदोलनाची जबाबदारी जनसंघावर टाकतानाच, 'तिथल्या प्रकारांची पुनरावृत्ती मुंबईत करण्यासाठी १००० 'नक्षलवादी' तरुण गुजराथेतून मुंबईत आले आहेत, शिवसैनिकांनी त्यांना वेचून काढून पोलिसांच्या स्वाधीन केले पाहिजे असे सांगून अहमदाबाद आंदोलनात नक्षलवादी वृत्तीही होती असा पवित्रा त्यांनी घेतला. इतकेच नाही, तर मुंबईतल्या ह्या एकूणच आर्थिक प्रश्नावरील आंदोलनाला, 'गुजराथी मराठी' किंवा 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा गुजराथी कावा' असे स्वरूप देऊन आंदोलनाला त्यांनी विरोध केला. घेरावावर बहिष्कार टाकण्याचा आदेशही त्यांनी शिवसैनिकांना दिला. (खुद्द विधान भवनात मात्र, शिवसेनेच्या आ. मनोहर जोशी व आ. प्रमोद नवलकरांनी आंदोलनाला निर्विवाद पाठिंबा दिला! 'घेराव'मध्ये भाग घेतला. 'जनसंघाला वेगळे काढून झोडपण्याने विरोधकात फूट पडणार नाही' ह्या पद्धतीने मत मांडणाऱ्यात आ. नवलकर देखील होते!)

तर. आंदोलनाला आलेली गती आणि शिवसेनेने काँग्रेसच्या बाजूने (पुन्हा एकदा!) पणाला लावलेले सामर्थ्य अशा पार्श्वभूमीवर २५ फेब्रुवारी उजाडला. त्या दिवशी जवळ जवळ दिवसभर मी दक्षिण मुंबईतच होतो. ज्या पार्श्वभूमीवर घेरावची वेळ समीप येत होती, त्यामुळे बहुसंख्य मुंबईकर मंडळी (अर्थात फोर्टमध्ये ऑफीसात येणारी!) धास्तावलेली दिसत होती. सकाळच्या ऑफीसच्या वेळात मी त्या दिवशी मुद्दाम लोकल प्रवास केला. ठाणे-व्हीटी आणि अंधेरी-चर्चगेट असा दोन्ही रेल्वेंनी. थोडा प्रवास फर्स्टचा, थोडा थर्डचा. नेहमी फोर्टमध्ये जाणाऱ्या अनेकांनी त्या दिवशी चक्क दांड्या मारल्या होत्या. काहींचा विचार होता, 'बघूया काय होते ते? परळ स्थानकावर गाडीत शिरलेला एकजण म्हणत होता 'साले, सगळे पेटून निघाले पाहिजे. नाहीतरी जगायचे वांधेच झाले आहेत. सगळे पेटून खाक झाले तर, मायला उद्या खायचे काय हा तरी सवाल उरणार नाही.' फर्स्टच्या डब्यात प्रतिक्रिया 'बाबू' लोकात साधारणतः अशीच होती. भाषा थोडी जास्त सोज्वळ! 'भ्रष्टाचार बोकाळलाय, महागाई भडकते आहे, काँग्रेस उखडली पाहिजे...' वगैरे वगैरे. पण 'फर्स्टमधूनच प्रवास करणारा थोडासा उच्चपदस्थ वर्ग एकंदर आंदोलनाविषयी नाराज दिसला. कुठल्याशा औषधी कंपनीत 'मॅनेजर'च्या हुद्द्यावर असलेले एक पाईपवाले गृहस्थ (त्यांच्या हातातल्या बॅगवर V. Kamath असे नाव झळकत होते!) शेजाऱ्याला सांगत होते, 'धिस इज ऑल हम्बग. जस्ट नॉनसेन्स! सरकार उधळून काय लावणार आहेत कोण जाणे... झगडून अस्तित्व टिकविले पाहिजे, नवीन नवीन क्षितिजे काबीज केली पाहिजेत; त्यासाठी भरपूर काम करून ह्या शर्यतीच्या जगात (World of Competetion) पुढे जायला पाहिजे. पण आमचे विरोधी पक्ष, इतर काही जमत नाही म्हणून नकार घंटा गळ्यात अडकवून विध्वंसक भूमिकेच्या मागे धावत असतात. अनुयायांनाही असलाच निराशावाद शिकवून नकारात्मक मार्ग अनुसरायला लावतात. जस्ट सुइसायडल फ्रॉम द पॉईंट ऑफ व्ह्यू ऑफ दि नेशन!...

अर्थात व्ही. कामथसाहेबासारखी विरोधी सूर छेडणारी प्रतिक्रिया मला एखादीच आढळली. 'ह्या आंदोलनानीही काही होणार नाही, कारण शासनाला झोप मुळात लागलेलीच नाही. आज आहे ते झोपेचे सोंग आहे. पण तरीही आंदोलन आवश्यक आहेच...' असाच सूर साधारणतः सर्वत्र आढळला. आणि ह्या सुराबरोबरच सर्वत्र आढळली काही प्रमाणात पसरलेली भीती! गेल्या दीड दोन महिन्यातली मुंबईतली आंदोलने, वरळीतले धगधगते रणकुंड, २२ तारखेचे यशस्वी 'थाळी-वादन' आंदोलन ह्यामुळे २५ तारखेच्या घेरावच्या दिवशी काहीतरी धमाल नक्कीच उडेल, किमान दोन-चार ठिकाणी गोळीबार तर नक्कीच, होईल, बसेस-गाड्या रोखल्या जातील, दगडफेक, अश्रुधूर, लाठीमार भरपूर प्रमाणात होईल अशीच बहुतेकांची अटकळ. पेट्रोल भाववाढीनंतरही फोर्टात रोज स्वतःच्या गाडीतून ऑफीसला जाणारे एक रुबाबदार गृहस्थ ग्रँटरोडला गाडीत शिरले. साहेबांनी आपली टाय आणि टॉप सूट सांभाळत आधी ताडदेव ते ग्रँटरोड प्रवास टॅक्सीने केला होता नि नंतर धडपडत 'फर्स्ट'च्या डब्यात शिरले होते. 'केम नानूभाय, आजे कार नथी?' ह्या एका ओळखीच्याच प्रश्नावर वरील साहेब ऊर्फ नानूभाय उद्गारले, 'कार? ना रे बाबा!... या लोकांच्या ऊधममध्ये गाडी पण जाईल नि जान पण. कशाला पाहिजे ही आफत...'

## सचिवालय ओस

अशाच, साधारणतः धास्तावलेल्या अवस्थेत प्रत्यकजण बोरीबंदर चर्चगेट स्टेशनातून बाहेर पडत होता आणि व्ही टी ते फौंटन चालताना प्रथमच मला फूटपाथवरून धडपणे चालता आलं. आजच्या आंदोलनाची पूर्वतयारी म्हणून फूटपाथवरची जागा एरवी अडवून बसणारे फेरीवाले साफ गायब झाले होते. ऑफिसकडे लगबगीने धावणाऱ्या सर्वांनाच फेरीवाल्यांची अनुपस्थिती जाणवत होती! साधारणतः ११–१२ च्या सुमारास चर्चगेट ते सचिवालय चालायला सुरूवात केली तो सचिवालय ओस पडल्याची बातमी येऊन थडकली. उगीच गोंधळात अडकून पडायला नको म्हणून, सचिवालयातल्या तमाम मंडळींना मस्टरवर सह्या करून परत पाठवून दिले होते म्हणे. ऑल इंदिरा रेडिओने (सॉरी हं! उत्तर प्रदेशातला निवडणूक प्रचार इतका मी ऐकला होता की, माझ्याही नकळत ऑल इंडियाच्या ऐवजी ऑल इंदिराच लिहिले गेले!) देखील म्हणे २५ तारखेचे कार्यक्रम २३ तारखेलाच टेप करून ठेवले होते आणि आपल्या कर्मचाऱ्यांना 'सुरक्षितपणे' मागे परतायला सांगितले होते.

'यथा राजा तथा प्रजा' उक्तीप्रमाणे सचिवालय व अन्य सरकारी

ऑफिसेसचा कित्ता खाजगी ऑफिसेसनीही गिरवला. बारा-एक वाजताच फोर्टातल्या साऱ्या ऑफिसांनी आपापल्या ऑफिसेसना कुलुपे ठोकली. एका ऑफिसमधल्या कर्मचाऱ्याने (श्री. करकरे हे त्यांचे नाव!) मला सांगितले, '...आजच्या होऊ घातलेल्या प्रकाराची सगळ्यांनी चांगलीच धास्ती घेतली आहे म्हणायचे. नेहरू किंवा शास्त्री गेल्याच्या बातम्या आल्या तेव्हाही आमच्या ऑफिसने आपले काम थांबवले नव्हते. पण आजचा दिवस काही आगळाच दिसतो आहे. एवढ्यासाठी तरी मी नक्कीच म्हणेन-मृणाल गोरे झिंदाबाद!'

...ऑफिसेसच्या पाठोपाठ दुकाने, हॉटेले ह्यांनी आपापली दारे बंद केली. आदल्यारात्री पोलीस कमिशनरांशी चर्चा करून ठरवल्यामुळे रस्त्यावरच्या धावणाऱ्या बसेस क्रॉफर्ड मार्केट धोबीतलावपासूनच माघारी वळू लागल्या. साधारणत: अडीच तीनच्या सुमारास, फोर्टातले एरवी तुफान गजबजलेले असणारे रस्ते बसेसच्या, वाहनांच्या रहदारीविना सुने सुने वाटू लागले. रस्त्यावरून फक्त 'घेराव'मध्ये भाग घेणाऱ्यांचे मोर्चे जात होते. घोषणा देत देत :

'चले जाव, चले जाव, नाईक सरकार चले जाव!'

'एक दो, एक दो, नाईक सरकार फेक दो!'

'अनाज दो, राशन दो, या तो खुर्ची छोड दो!'

'मृणाल गोरे झिंदाबाद, नाईक सरकार मुर्दाबाद!' वगैरे वगैरे.

'बंद'चे आवाहन त्या दिवशी कुठल्याही पक्षाने केलेले नव्हते. पण तरीही दक्षिण मुंबईवर त्या दिवशी बंदची कळा पसरली होती. फोर्टमधले सर्व व्यवहार थंडावले होते. काळबादेवी, गावदेवी, पायधुनी वगैरे भागातही हे लोण पसरून तिथेही काही दुकानदारांनी 'शटर्स' खाली होती. एक चित्रपटगृहे व रेल्वे वहातूक सोडली तर, द. मुंबईभर ह्या अघोषित बंदनी आपला अंमल बसवला होता. आणि एखादी ॲम्ब्युलन्स व्हॅन किंवा वृत्तपत्राची गाडी व पोलिसांच्या लॉऱ्या वगळता 'बंदग्रस्त' द. मुंबईत इतर हालचाल होती ती विरोधकांच्या जीप्सची, त्यांच्या मोर्च्यांचीच फक्त!

ह्या बंदनीच त्या दिवशीच्या घेरावचे यश अर्धनिम्मे निश्चित केले आणि दुपारी ४ च्या सुमाराला अंदाजे २० हजारांचा घेराव विधान सभेला पडला आणि दूरदूरवर विखुरलेले लोक दंग्या धोप्यांच्या, गोळीबारांच्या, जाळपोळींच्या बातम्यांची उत्सुकतेने वाट पाहू लागले. काही प्रमाणात अफवाही उपनगरातून पसरल्या. मी साधारणत: ४॥ वाजता रीगल जवळच्या एका इमारतीतून श्री. गजानन पवार नावाच्या माझ्या एका मित्राला फोन केला. आमच्यातला संवाद इथे उद्धृत करण्यासारखा आहे...

'बोलतोयस कुठून तू?' इति. श्री. पवार.

'फोर्टमधून रीगल सिनेमाच्या जवळून.'

'अरे बापरे, तू तर अगदी मोक्याच्याच ठिकाणी अडकला आहेस. निघून ये बाबा चटकन तिकडे रिगल समोरच गोळीबार झाला, त्यात दोघे मेले अशी आताच एकाने मला बातमी दिली.'

'दोस्ता गजूभाऊ, अडीच वाजल्यापासून मी इथेच उभा आहे, माझ्या समोरच घेराव घालून बसलेले लोक मला दिसताहेत. अजून तरी इथे काही गडबड नाही. गोळीबार तर नाहीच नाही. तू ऐकल्यास त्या नुसत्या थापा आहेत.'

'अरे बाबा सुरेन, काही नसले तर ठीक. पण तू तावडतोब तिथून कटावेस असे मला वाटते...'

असा दरारा होता त्या दिवशीच्या घेरावचा. तिथला एकूण पोलीस बंदोबस्त बघितला असता, तरी ह्या दराऱ्याची कल्पना येऊ शकली असती. लोक बातम्यांसाठी त्यामुळेच उत्सुक होते...

### प्रचंड पण शांत

पण करायचे काय! नाईक साहेबांनी सर्वांचे डाव साफच उधळून लावले. ऑफिसेस सोडून देऊन 'अघोषित बंद'ला अघोषित पाठिंबा देऊन ते प्रथम मोकळे झाले. नंतर भारंभार पोलीस पेरून ठेवून लढ्याचे शिंग फुंकल्यासारखे त्यांनी दाखवले खरे, पण फारशी किटकिट फिटफिट न करता त्यांनी रस्त्यावरच्या बसेस हळूच काढून घेतल्या. इतर वाहने काढून घेतली. दुकाने, हॉटेल्स, ऑफीसे, बंद करवून घेतली. म्हणजे प्रश्नच मिटला. हल्लेखोरांना दंगा उपस्थित करायला, दगडफेक करून संघर्षाला तोंड फोडायला काही तरी उघडे असावे की नाही, पण नाव नाही! मग निदर्शकांची एकमेव मदार राहिली ती प्रत्यक्ष घेरावच्या वेळी होणाऱ्या गडबडीवर!! पण नाईक साहेब, त्यांचे मंत्री आणि सगळे काँग्रेसवाले चक्क पाईप ओढत आतच बसून राहिले हो! घेराव उठेपर्यंत एकानेही कुणी 'प्रतिकात्मक' म्हणून देखील घेराव मोडून बाहेर यायचा प्रयत्नच केला नाही!! त्यामुळे एवढा प्रचंड आणि इतका शांत घेराव प्रथमच पाहायला मिळाला, आणि तमाम पब्लिकची जाम जाम निराशा झाली!!

थोडी गंमत म्हणून एका हिप्पीला पिटायला मिळाले एवढेच.


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किंमत सात रुपये

राजहंस प्रकाशन

त्याने दारूच्या किंवा दुसऱ्या कसल्या तरी नशेत, घेराव करीत बसलेल्या निदर्शकातच चक्क आपली कार घुसवली पण त्याचे निमित्त करून दंगल उसळवणेही शक्य नव्हते. हा प्रकार घडला तोही नेमका जनसंघाच्याच छावणीत !

चर्चगेट स्टेशनातही बॉम्ब ठेवल्याची आवई उठवून अशीच थोडी गंमत कुणी उडवून दिली. काही तास त्यामुळे चर्चगेट स्टेशन बंद पडले एवढेच ! ...

नेहमीच्या रूढार्थाने, ८–९ तास चाललेल्या ह्या घेरावमध्ये तसे खास थ्रिल काही नव्हते. पण 'घेराव' त्या दृष्टीने तो अत्यंत यशस्वी झाला ह्यात वाद नाही. सरकारी प्रयत्नानंतरही ओढून ताणून गडबड गोंधळ माजवणे विरोधकांना, निदर्शकांना जमलेच नसते असे नाही. किंबहुना काही काही वेळा ह्या सहा-सात तासांच्या घेरावमध्ये असे प्रसंग आलेही. पण घेरावचे नेतृत्व करणाऱ्यांनी ह्यावेळी अत्यंत संयम दाखवला असेच मी म्हणेन ! शांतपणे एवढा मोठा घेराव पार पाडून, विरोधकांवर आरोप करणाऱ्यांनाही त्यांनी धडा शिकवला असे मला वाटते. सर्वच विरोधी पक्षांचे त्यासाठी अभिनंदन केले पाहिजे ! ...

घेराव यशस्वी झाला, ह्यात वाद नाही. पण पुढे काय ? विरोधकांच्या शिष्टमंडळाला मुख्यमंत्र्यांनी चक्क वाटाण्याच्याच अक्षता लावल्या. त्यांच्या कुठल्याही मागण्यांवर निश्चित आश्वासन शासनाने दिलेच नाही. रेशनचा कोटा आठ किलोवरून दहा किलोवर आणल्याचे शासनाने घोषित केले आहे. पण तरीही कित्येक ठिकाणी तो तसा मिळत नसल्याच्या लोकांच्या तक्रारी आहेत. इतर मागण्यांवर उल्हासच आहे. शिष्ट मंडळ मुख्यमंत्र्यांना भेटून आल्यावर नेते-मंडळी खूप संतापलेली दिसली. 'आता यांना धडा शिकवल्याखेरीज, अखेरचा दणका दिल्याखेरीज काम भागणार नाही. ह्याच्या पुढचा कार्यक्रम महाराष्ट्रभर बेमुदत संपांचा, कामगारांच्या आणि शेत मजुरांच्या ! ! ...'

## आंदोलनांच्या पलिकडे काहीतरी

अशा संपांनी तरी काही साध्य होईल का ? महाराष्ट्रभर असंतोष आहेच. त्याचे वणव्यात रूपांतर होऊन देखील शासनाचे डोळे उघडतील असे वाटत नाही. गुजराथेत चिमण सरकार कोसळले. एकूण शासन यंत्रणाच कोलमडली. पण फायदा काय झाला ? इंदिराजी लोकसभेत बोलताना, गुजराथच्या दंगलीचे खापर जनसंघावर फोडून मोकळ्या झाल्या. ह्या उप्पर गुजराथच्या लोकांना तात्काळ दिलासा देणारी कुठलीच कार्यवाही त्यांनी केली नाही. महाराष्ट्रात तर, गुजराथेएवढी कॉंग्रेस पक्षांतर्गत बंडाळीही नाही. इथे नाईक सरकारही उलथली जायची नजिकच्या काळात शक्यता नाही. आणि अशा ह्या सरकारांनी तर चक्क डोळ्यांवरचे कातडेच ओढून घेतलेले आहे. समाजवादाचा, गरिबी हटावचा जप करताना ही मंडळी फर्मासपणे जनतेवरील बोजे वाढवीत राहते.

अशा अवस्थेत अशा आंदोलनांची आवश्यकता असली तरी, त्याही पुढे जाऊन काहीतरी घडायची आवश्यकता आहे. त्या 'काहीतरी' मध्ये आजची संपूर्ण घडी उधळून लावली गेली तरी हरकत नाही. त्यातून काहीतरी नवनिर्माणाची प्रक्रिया सुरू होऊ शकेल. आजच्या घेरावच्या प्रचंड यशानी अशा सर्वकष उलथापालथीची नांदी म्हटली जाईल का ?

□ □


स्थापनेपासून लोककल्याणाचे ब्रीद घेऊन संरक्षण, उत्पादन, निर्यात
शेती–विकास व लघु उद्योग ह्यांना गेली अडतीस वर्षे मदत
करणारी तुमची जिव्हाळ्याची बँक

# बँक ऑफ महाराष्ट्र

**मुख्य कचेरी – ११७७ बुधवार पेठ, पुणे – २**

आपल्या सर्व शाखांनिशी तुमच्या सेवेस सिद्ध आहे.
सविस्तर माहितीसाठी आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या.

**वा. मा. भिडे**
चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर

# सोलकढी

## □ एका गप्रबुद्धाचे पत्र

प्राध्यापक ही एक सतत बोलणारी आणि डोलणारी जमात आहे, प्रकृतीपरत्वे रातकिडचाला जसे किरकिरावे लागते. तसे व्यवसायपरत्वे प्राध्यापकाला बोलावे लागते बरे, आपले बोलणे ऐकणाऱ्याला नीट समजायला हवे, असा त्याचा आग्रह नसतो. अर्थाची टरफले फेकून देऊन शब्दांचे दाणे चावीत रवंथ करण्याचे अद्भुत कसब त्याने आत्मसात केलेले असते. आपल्या बोलण्याच्या कसबावर लट्टू होऊन तो सदैव डोलत असतो. खरोखर, मराठी साहित्यिक सोडता, प्राध्यापकांइतकी दुसरी स्वयंतुष्ट जमात शोधूनही सापडणार नाही. (बरेच मराठी साहित्यिक प्राध्यापक का आहेत, याचे आम्ही सादर केलेले विश्लेषण लक्षणीय ठरावे.) अर्थात, जो स्वयंतुष्ट असतो तोच खऱ्या अर्थाने स्वयंरुष्ट असतो, अशी एक प्राध्यापकी मल्लिनाथी आम्हाला सुचते. (आमच्या प्राध्यापकांचे शिकविणे एवढे प्रभावी होते की शब्दपूर्ण, शब्दगर्भ, शब्दसंपन्न आणि शब्दपरिप्लुत लिहाय-बोलायचे एक खानदानी वळण आम्हाला लागून गेले आहे.) असो.

अशा या अव्वल जमातीचे एक जमादार आज आपल्या शब्दशक्तीने महाराष्ट्र विधान परिषद गाजवून राहिले आहेत. माझ्या सूज्ञ वाचकांनो, 'कोण बरे असतील ते?'

'आमदार ग. प्र. प्रधान तर नव्हेत?'

'लबाडांनो, बरोब्बर कसे ओळखलेत तुम्ही? फारच सूज्ञ–नव्हे सुसूज्ञ–झालात हां आताशा तुम्ही.'

विधान परिषदेतील कामकाजाबद्दल प्रा. प्रधान अत्यंत जागरूक असतात. त्या सभागृहासमोर येणारा कोणताही विषय फुसकट अतएव दुर्लक्षणीय आहे, असे ते मानीत नाहीत. वरवर किंवा खोलवर पाहता फुसकट दिसणाऱ्या विषयाच्या विशाल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादिक परिमाणांचे (प्राध्या)पकी भान प्रधानांना असते. त्यामुळे प्रा. ग. प्र. प्रधान सभागृहात उपस्थित असले की कोणत्याही विषयाची कशी अगदी सांगोपांग म्हणतात तशी चर्चा होते. आता चर्चा आणि तीदेखील लोकप्रतिनिधींची, म्हणजे शब्दांची उधळमाधळ आणि नासाडी होणारच. प्रा. प्रधानांना खपत नाही ते हे. शब्द ही काचसामानासारखी जपून वापरायची वस्तू आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे.

त्यामुळे परवा महाराष्ट्र विधानसभेत कॅबेरे या नृत्यविशेषावरून जी प्रश्नोत्तरे झाली त्यांनी प्रा. प्रधान फार फार अस्वस्थ होऊन गेले. वास्तविक एवढ्या गंभीर आणि महत्त्वाच्या विषयावर चर्चा करायची संधी सभागृहाला क्वचितच लाभते. एरवी सारा वेळ करआकारणी, सिंचनयोजना, धान्यवाटपपद्धती, खरीप आणि रब्बी पिके, कर्ज आणि कर्जवसुलीची टक्केवारी, विरोधी पक्षांच्या लोकशाही विरोधी कारवाया, दोन जमातीतील वैमनस्ये, पोलिसांनी केलेला बळाचा अतिरिक्त वापर, विद्यापीठ-विधेयके इत्यादी किरकोळ, अळणी आणि ठिसूळ विषयांवर आमदारमंडळी केवळ सवयीने व कर्तव्यदक्षतेने चर्चा पिशीत बसतात. कॅबेरेचे तसे नव्हते. सगळ्यांना त्यात स्वारस्य होते. विषय अखिल मानवजातीच्या जिव्हाळ्याचा होता. त्यामुळे मंडळी रंगली.

प्रमोद नवलकर हा या क्षेत्रातला अधिकारी आणि साक्षात्कारी पुरुष. त्याने 'कॅबेरे'ला 'लचक-नृत्य' असे नाव देऊन त्याचा जणू व्रात्यस्तोमविधी उरकून टाकला. खरे म्हणजे 'कॅबेरे'ला 'लचक-नृत्य' म्हणणे हे 'पिकनिक'ला 'वनभोजन' म्हणण्यासारखे आहे. पिकनिक म्हणजे वनभोजन नव्हे. पिकनिक हे एक ऐसपैस प्रकरण आहे; ती एक संस्था आहे; वनभोजन हा पिकनिकचा अवघा एक भाग आहे. कॅबेरेचे तसेच आहे. कॅबेरे हे सुद्धा एक ऐसपैस प्रकरण आहे. ती एक संस्था आहे; लचकेनृत्य हा कॅबेरेचा अवघा एक भाग आहे. कॅबेरे हे प्रकरण ऐसपैस असल्यामुळे त्याबद्दल कडक आणि काटेकोर नियम करणे अवघड आणि गैरसोयीचेही आहे. लचकललनेने काय आणि किती झाकावे वा उलगडावे, रसिकांशी तिने कितपत जवळीक साधावी, कशाने साधावी, कॅबेरे कलामंदिरात नेपथ्य, प्रकाशयोजना, ध्वनिसंयोजन कशा प्रकारचे असावे इत्यादी लकचिक गोष्टींबद्दल नफकड नियम कसे काय होणार बुवा? मात्र त्या गोष्टींबद्दल अनौपचारिक आचारसंहिता तयार करता येईल. कारण आचारसंहिता मोठी शहाणी आणि समजुतदार असते.

हे लक्षात घेऊनच, बहुधा, विधानसभेत, लचकनृत्याबद्दलचे नियम आणि आचारसंहिता या दोन्हीची अभ्यासपूर्ण चर्चा झाली. चर्चेत या दोन्ही शब्दांचा सोयिस्कर वापर करण्यात आला. तो बोलणाऱ्या एकणाऱ्यांनाच केवळ नव्हे तर आमच्यासारख्या तिऱ्हाईत अप्रबुद्धालासुद्धा समजला. समजला नाही तो एका गप्रबुद्धाला, त्याने लगेच सात्त्विक संतापाने 'महाराष्ट्र टाईम्स'ला पत्र लिहिले. १९ फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध झालेले हे पत्र मुळातून वाचावे अशा योग्यतेचे असल्यामुळे जिज्ञासू वाचकांसाठी मुद्दाम सादर करीत आहे. प्रा. ग. प्र. प्रधान लिहितात, 'सध्या अनेक शब्दांचा वापर बेछूटपणे केला जातो, हे इष्ट नाही. परवा विधान सभेत कॅबेरेच्या संदर्भात जी प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी 'आचारसंहिता' या शब्दाचा उपयोग असाच बेछूटपणे करण्यात आला. कॅबेरेसाठी 'नियम' हा शब्द पुरेसा आहे. आचारसंहिता हा शब्दप्रयोग गंभीर कृतींच्या संदर्भातच वापरला पाहिजे. 'संहिता' या शब्दाशी उदात्त अर्थ निगडित आहे. या शब्दाच्या पावित्र्याची विटंबना होऊ नये अशी सूचना मी विधानपरिषदेत काही महिन्यांपूर्वी केली होती. परंतु पुनश्च तीच चूक झाली. म्हणून मी जाहीररित्या ही सूचना करीत आहे'

या पत्राखाली नुसती 'ग. प्र. प्रधान' अशी बिरुदरहित सही असली तरी ते पत्र प्राध्यापक ग. प्र. प्रधानांचे असले पाहिजे हे महाविद्यालयातला प्रथम वर्षाचा विद्यार्थीही सहज सांगू शकेल. पण ही एक किरकोळ गोष्ट झाली. महत्त्वाची आणि उल्लेखनीय गोष्ट अशी की माझ्यासारख्या संवेदनशील पाहत्याला या पत्रातून महाराष्ट्राच्या सामाजिक मनाचे एक स्पंदन दृग्गोचर होते. प्रा. ग. प्र. प्रधानांसारख्या, जीवनाचा गांभीर्याने विचार करणाऱ्या एका तत्त्वचिंतकाला कॅबेरे ही 'गंभीर कृती' वाटत नाही, याची दखल आपण घेतली पाहिजे.

काय गंमत आहे पाहा. नेहमी ही प्राध्यापक आणि समाजवादी मंडळी साक्षेपाने कसली ना कसली तरी दखल घेत असतात; आणि आज एका प्राध्यापकाची आणि समाजवाद्याचीच गंभीर दखल आपल्याला घ्यावी लागत आहे.

—अनंतराव

# इस्लामी शिखर परिषद

वा. दा. रानडे

अरब-इस्राइल संघर्षात अरबांच्या मागे जगातील साऱ्या मुस्लिमांची संघटित शक्ती उभी आहे, हे दाखवण्याचा लाहोर येथील इस्लामी शिखर परिषदेचा मुख्य उद्देश होता. इस्राइलने १९६७ च्या युद्धात बळकावलेल्या अरबांच्या सर्व प्रदेशातून आपल्या फौजा तावडतोब आणि बिनशर्त काढून घेण्यास त्याला भाग पाडण्यासाठी सर्व क्षेत्रात उपाय योजण्याचे परिषदेने ठरविले आहे असा निर्धार परिषदेने पास केलेल्या एका ठरावात व्यक्त केला आहे. जरुसलेमवर अरबांचे सार्वभौमत्व पुनः प्रस्थापित करण्यात आले पाहिजे अशी मागणीही परिषदेने केली आहे.

ठरावाची भाषा संदिग्ध आहे. मतभेदाचे मुद्दे त्यात कौशल्याने वगळण्यात आले आहेत. पण मुद्दे वगळले म्हणून त्यांचे अस्तित्व काही छपून राहू शकत नाही. इजिप्त व सिरियाने युद्ध संयुक्तपणे सुरू केले पण शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रश्नावर त्यांची भूमिका एक नाही. सिरियाची वाट न पाहता शांतता वाटाघाटीबाबत व फौजा मागे घेण्याबाबत इजिप्तने इस्राइलशी एकतर्फी करार केला. जेरुसलेम शहरावर अरबांचे सार्वभौमत्व पुनः प्रस्थापित करण्यात यावे असा ठराव परिषदेने केला खरा पण अरबांचे म्हणजे कोणत्या देशाचे हे त्यात मुद्दाम संदिग्ध ठेवण्यात आले. कारण त्याबाबत अरब राष्ट्रात मतभेद आहेत. यासीन आराफत यांच्या नेतृत्वाखालील पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेला पॅलेस्टिनिइन लोकांची प्रातिनिधिक संघटना म्हणून परिषदेने मान्यता दिली पण या प्रश्नावर जॉर्डन आणि पॅलेस्टिनिइन मुक्ती संघटना यांच्यात असलेला संघर्ष परिषद मिटवू शकलेली नाही.

तेल हे आपल्या हातातील प्रभावी शस्त्र असल्याची जाणीव अरब राष्ट्रांना झाली आहे. तेल पुरवठ्यात कपात आणि तेलाच्या किमतीत भरमसाट वाढ असा या शस्त्राचा दुहेरी वापर अरब राष्ट्रे करीत आहेत. हे शस्त्र काही राष्ट्रांच्या बाबतीत परिणामकारक ठरले. जपानने अरबांना अनुकूल भूमिका घेतली. युरोपच्या सामाइक बाजारपेठेतील राष्ट्रांनी अरबांच्या भूमिकेस पाठिंबा दिला. ब्रिटन व फ्रान्सने तेलाच्या मोबदल्यात अरब राष्ट्रांना शस्त्र पुरवठा करण्याचे दीर्घ मुदतीचे करार केले.

या प्रभावी शस्त्राचा वापर चालू ठेवावयाचा पण औद्योगिक दृष्ट्या विकसित राष्ट्रांबरोबरच विकसनशील राष्ट्रांनाही त्याची झळ लागत आहे त्याबाबत काय करावयाचे हा परिषदेपुढे एक महत्त्वाचा प्रश्न होता. लिबियाचे नेते कर्नल गडाफी यांनी चार टप्प्यांच्या किंमती सुचविल्या. अरबांना पाठिंबा न देणाऱ्या विकसित राष्ट्रांना सद्यांची पूर्ण किमत, अरबांना पाठिंबा देणाऱ्या विकसित राष्ट्रांना किमतीत थोडी सवलत. विकसनशील राष्ट्रांना थोडी अधिक सवलत. आणि मुस्लीम राष्ट्रांना सर्वात जास्त सवलत अशी त्यांची योजना होती. तेलाच्या किंमती कमी करण्यास विरोध दर्शवून अल्जीरियाचे नेते बूमेडियन म्हणाले, 'तसे करणे म्हणजे राजकीय दृष्ट्या माघार घेणे होय.' तेल उत्पादन न करणाऱ्या विकसनशील राष्ट्रांना आपण आर्थिक मदत करावी व किती मदत करावयाची त्याची रक्कम या परिषदेतच ठरावी अशी सूचना त्यानी केली. इजिप्तचे अध्यक्ष सादत यांनी या सूचनेस पाठिंबा दिला. विकास निधी उभारण्याची इराणच्या शहाची सूचना याच स्वरूपाची आहे. पण निरनिराळ्या नेत्यांनी केलेल्या या सूचना परिषदेने पास केलेल्या ठरावात मात्र स्वीकृत करण्यात आल्या नाहीत. नको असलेल्या प्रश्नावरचा निर्णय समिती नेमून लांबणीवर टाकावयाचा हे नेहमीचेच तंत्र यावेळी अवलंबण्यात आले. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी अल्जीरिया, इजिप्त, कुवेत, लीबिया, पाकिस्तान, सौदी अरेबिया, सेनेगल आणि संयुक्त अरब अमीर राज्ये या आठ राष्ट्रांची समिती नेमण्यात आली आहे. या राष्ट्रांचे प्रतिनिधी व तज्ज्ञ समितीवर असतील. इस्लामी शिखर परिषदेच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक मलेशियात मे मध्ये भरणार आहे. त्यावेळी ही समिती आपला वृत्तांत सादर करील. त्याचा विचार करून निर्णय घेण्यास परराष्ट्रमंत्री आणखी विलंब लावतील. विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने ज्या प्रश्नावर वास्तविक निकडीने निर्णय हवा त्याबाबतीत असे विलंबाचे धोरण दिसून येत आहे.

या परिषदेची संधी साधून पाकिस्तानने बांगला देशला मान्यता दिली ही भारतीय उपखंडाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची घटना. बंगला देशाने १९५ युद्धगुन्हेगारावरील खटले मागे घेतल्याशिवाय आम्ही त्यास मान्यता देणारनाही अशी भुट्टोंची अट होती. पण अखेर त्यांना बिनशर्त मान्यता द्यावी लागली. मान्यता देणे अटळ आहे अशी स्वतः भुट्टोंची खात्री झालेली होती पण लष्करातील आणि पंजाबातील कट्टर नेत्यांच्या विरोधाला कसे तोंड द्यावयाचे हा त्यांच्यापुढे प्रश्न होता. इस्लामी परिषदेची संधी त्यांनी नेमकी पकडली व परिषदेच्या नेत्यांचे मतास मान देऊन आपण बांगला देशला मान्यता देत आहोत असा अभास निर्माण केला. या घटनेचा एक परिणाम म्हणजे भारत व पाकिस्तानात राजकीय संबंध आता लौकरच प्रस्थापित होण्याची शक्यता आहे. भारत-पाक संघर्ष मिटले असा याचा अर्थ नाही पण त्यांचा तणाव काहीसा कमी होण्याचा संभव आहे.

परिषदेच्या निमित्ताने दोन महत्त्वाचे तात्त्विक प्रश्न उपस्थित होतात. धर्माच्या पायावर जगातील राष्ट्रांच्या अशा संघटना असाव्यात काय? यापूर्वीची इस्लामी शिखर परिषद सप्टेंबर १९६९ मध्ये राबात येथे भरली होती पूर्व जरुसलेम अरबांच्या नियंत्रणाखाली देण्याची एकमुखी मागणी त्यावेळी सुद्धा करण्यात आली होती. पण या पाच वर्षात त्याबाबतीत काहीच प्रगती झाली नाही. परिषद त्याबाबतीत कोणतेही परिणामकारक पाऊल उचलू शकली नाही. कारण मुस्लीम राष्ट्रात अंतर्गत विरोध व संघर्ष एवढे आहेत की प्रत्यक्ष कृतीच्या वेळी ते एकत्र येत नाहीत. धार्मिक परिषदा भरवायला हरकत नाही पण त्यातील चर्चेचे स्वरूप धार्मिकच असले पाहिजे, त्यात राजकारण आणले जाता कामा नये. इस्लामी परिषदेचा उपयोग अरबराष्ट्रे इस्राइली संघर्षात आपले राजकीय उद्देश साधण्यासाठी करीत आहेत. तडजोडीने हा प्रश्न मिटला तर त्यांना इस्लामी परिषदेबद्दल काहीही आस्था राहणार नाही.

दुसरा प्रश्न धर्म निरपेक्ष राष्ट्रवादावर निष्ठा असणाऱ्या भारतासारख्या राष्ट्रांनी अशा परिषदेबाबत कोणती भूमिका घ्यावी? आंतरराष्ट्रीय राजकीय परिषदा धार्मिक पायावर भरविल्या जाऊ नयेत अशी भारताची भूमिका असल्याचे परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग यांनी पार्लमेंटमध्ये नुकतेच सांगितले. पण मग राबात परिषदेला उपस्थित राहून भारताने आपला अपमान का करून घेतला? तसेच लाहोर परिषदेस भारतास बोलावले नाही म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधी व स्वर्णसिंगानी नापसंती का व्यक्त केली? अरबांची बाजू न्याय्य म्हणून भारताने त्यांना पाठिंबा दिला असला तरी त्यांच्या इस्लामी परिषदेच्या राजकारणात भारताने गुरफटण्याचे कारण नव्हते.

तात्त्विक दृष्ट्याच पाहायचे तर बांगला देशानेही इस्लामी परिषदेत भाग घ्यावयास नको होता. □

# रेणापूर
## आंतरजातीय विवाहितांचा मेळावा

अनेक भेदांनी चिरफाळलेला आपला समाज एकसंध करण्यासाठी आंतरजातीय विवाह हाही एक प्रभावी तोडगा आहे अशी श्रद्धा असल्याने आम्ही काही मित्रमंडळींनी योजनापूर्वक आंतरजातीय विवाह घडवून (Arranged inter caste marriages) आणण्यासाठी एक मंडळ स्थापन केले असून त्याचा चौथा वार्षिक मेळावा नुकताच रेणापूर या गावी आयोजित करण्यात आला होता. मराठवाड्यात आर्यसमाज या संस्थेचे कार्य इतर भागापेक्षा बरे असल्याने व आंतरजातीय विवाह ही त्या संस्थेची एक सामाजिक सुधारणा चळवळ असल्याने आमचे मंडळ व आर्यसमाज यांचे घनिष्ट संबंध आहेत.

रेणापूर हे गाव लातूर–अंबेजोगाई रस्त्यावर असून बीड जिल्ह्यातील ती सर्वांत मोठी ग्रामपंचायत आहे. तेथील उत्साही कार्यकर्ते दर वर्षी मंडळाचा वार्षिक मेळावा आयोजित करतात. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात हा मेळावा यंदा भरविण्यात आला. तीन दिवस परस्पर परिचय, व्याख्याने, आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना आलेले अनुभव व अडचणी, शंका समाधान इत्यादी कार्यक्रमामुळे मेळावा संस्मरणीय झाला.

### श्री. रंगा वैद्यांचे विचार

मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष व सोलापूरच्या दैनिक 'संचार'चे संपादक श्री. रंगा वैद्य यांनी मेळाव्यात आपले विचार व्यक्त करताना सामाजिक अभिसरणासाठी असे विवाह उपयुक्त असून संप्रदाय निरपेक्ष मानवतावादी वैदिक तत्त्वज्ञान आणि आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांनी एकसंध समाजनिर्मितीसाठी जे प्रयत्न केले त्याचा आढावा घेऊन उदात्तीकरणाची प्रक्रिया किती प्रमाणात गतिमान होते यावरच आंतरजातीय विवाहाचे यशापयश अवलंबून असते असे आपल्या भाषणात सांगितले. कुटुंबसंस्था, वैवाहिक जीवन आणि पतिपत्नींचा एकमेकासंबंधीचा दृष्टिकोन याबाबत मुक्त चिकित्सा झाली पाहिजे असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. 'Skin to skin there is no sin' विचारसरणीने कुटुंब व्यवस्था मोडेल असेही ते म्हणाले.

निलंगा येथील ॲडव्होकेट शेषराव वाघमारे यांची भारतीय संस्कृती, धर्म, पुनर्जन्म, कर्मफळ या विषयावर प्रवचने झाली. सनातनी ब्राह्मण कुटुंब असूनही आर्यसमाजी झाल्यानंतर त्यांनी आपल्या मुलामुलींचे आंतरजातीय विवाह केले. त्यांना घरातील मंडळींकडून आणि समाजाकडून कसा विरोध झाला याचे त्यांनी मार्मिक विश्लेषण करून कौशल्याने व विचार प्रवर्तनाद्वारे हा विरोध कसा कमी केला हेही सांगितले. सोपे सोपे दृष्टांत देऊन ग्रामीण जनतेला क्लिष्ट व न पचणारा आणि न पटणारा विषयही रंजक पद्धतीने तिच्या गळ्यात कसा बांधावा याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पंडित शेषराव वाघमारे यांचे वक्तृत्व!

लातूरच्या राजश्री शाहू कॉलेजच्या प्रा. कु. भारती जाधव यांनी जाती प्रथा, हुंडा पद्धती इत्यादी कुप्रथाविरुद्ध महिलांनी आणि युवकांनीच प्रामुख्याने बंडखोरी केली पाहिजे असे सांगून अबला सबला झाल्या पाहिजेत तोपर्यंत समाजाची प्रगती होणार नाही असा इशारा दिला.

### अनुभव कथन

ज्यांनी आंतरजातीय विवाह केले आहेत त्यांनी आपले अनुभव एका कार्यक्रमामध्ये सांगितले. परळी येथील वैजनाथ कॉलेजचे प्रा. डॉ. सुग्रीव काळे यांनी त्यांच्या विवाहानंतर पत्नी गावाकडे सासरी घरी गेली असता आर्थिक परिस्थिती बिकट झालेली पाहून नोकरी करण्यास सुरुवात केली. प्रसूतीनंतर १५ दिवसही झालेले नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांना पी. एच. डी. च्या वेळी आर्थिक भार हलका व्हावा म्हणून सर्व प्रकारचे सहकार्य दिले. दोघांची जन्माधिष्ठित जात वेगळी असूनही दोघांची कुटुंबे आर्यसमाजी असल्याने 'वाचा मनसा एक रूपता' कशी झाली याचे त्यांनी विवेचन केले.

प्रा. हरिश्चंद्र रेणापूरकर (सरकारी कॉलेज गुलबर्गा) यांनी प्रारंभीच्या वेळी आंतरजातीय विवाहामुळे जन-रोष कसा झाला, नंतर काही काळ अपत्यांनाही अपमानास्पद वागणूक जातीयवाद्यांनी कशी दिली हे सांगून हे कटु विष पचवून विरोधकांचा विरोध समाप्त केला असे प्रतिपादन केले.

अर्जुनराव सोमवंशी हे उदगीर येथील तडफदार तरुण. ते मराठा समाजातील असून ब्राह्मण कन्येशी त्यांनी विवाह केला. अर्जुनराव आर्यसमाजी असले तरी घरी जुने सनातनी वातावरण. पण त्याच्याशीही त्यांच्या पत्नीने समरस होऊन संघर्ष टाळला व आता घरात आर्यसमाजाचा प्रभाव वाढत आहे असे त्यांनी सांगितले. सासूच्या गळ्यात मंगळसूत्रच नाही असा खोटा प्रचार अर्जुनरावाजवळ काही विरोधकांनी केला. विवाहात अडथळे आणण्याचा डाव केला.

ब्राह्मण-मराठा, मराठा-लिंगायत, ब्राह्मण-येलम, लिंगायत-ब्राह्मण अशा प्रकारचे अनेक विवाह मराठवाड्यात झाले असून ते यशस्वी ठरले आहेत. आर्यसमाजाचा वाटा अर्थातच त्यात सिंहाचा आहे. मुंबई पुण्याकडे असे संमिश्र विवाह होत असलेले तरी ते प्रेमसंबंधातून किंवा तत्सम भानगडीतून ते होतात. सामाजिक सुधारणेच्या ध्येयवादातून योजनापूर्वक आंतरजातीय विवाह घडवून आणणे हे आमच्या मंडळाचे ध्येय आहे. दोन्ही कुटुंबाची सांस्कृतिक आर्थिक पातळी समान असूनही केवळ 'जात' लग्नाच्या आड येऊ नये असे आम्हास वाटते. जाती निरपेक्ष समाजनिर्मितीच्या प्रयोगास हातभार लावणे हा मंडळाचा हेतू आहे. अर्थात जात न मानणाऱ्या लोकांची ही वेगळीच जात आहे असे हिंदुसमाजात वाटू नये. कारण अनेक सुधारकांना या समाजाने पचवून टाकले आहे. आंतरजातीय विवाहाचे कार्यक्षेत्र विस्तृत होत जावे यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत. रेणापूरच्या मेळाव्यात तीन दिवस सहभागी झाल्यानंतर योजनापूर्वक आंतरजातीय विवाह जुळविण्याचा मंडळाचा हा उपक्रम स्तुत्य आहे व प्रसिद्धीच्या प्रकाशात फारसे न आलेले हे विधायक सामाजिक आंदोलन आहे अशी 'किर्लोस्कर'चे सहसंपादक श्री. ह. मो. मराठे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली असून ती फार बोलकी आहे.

आर्यसमाजाची सेवा व 'आर्यभानु', 'आर्यभास्कर' आदींचे संपादन तसेच स्वामी दयानंद चरित्र आदी ग्रंथ लिहून गेल्या ६० वर्षांपासून समाज सेवा करीत असलेले श्री. हरी सखाराम तुंगार यांचा सत्कारही या मेळाव्यात करण्यात आला. तीन दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमामुळे उपस्थित श्रोतृसमुदायात विचार प्रवर्तनाचे बरेच कार्य झाले. रात्री एक वाजेपर्यंत शेकडोंच्या संख्येत श्रोतृसमुदाय उपस्थित रहात होता यावरून सर्व कार्यक्रमाशी तो किती समरस व तन्मय झाला होता हे दिसते. जनतेच्या प्रतिसादावरच नवसमाजाचा हा उपक्रम यशस्वी होणे अवलंबून आहे.

—देवदत्त तुंगार

अध्यक्ष आंतरजातीय विवाह मंडळ

# उलटी पालटी अमेरिका

लेखक : **आर्ट बुकवॉल्ड** । अनुवाद : **अनंत भावे**

## नाव आठवले नाही म्हणून

**मी** ज्या पत्रकारीच्या व्यवसायात आहे त्यात सगळ्या परिचितांची नावे लक्षात ठेवणे फार कठीण असते. त्यामुळे कधी कधी पंचाईत होते; कधी कधी त्रास होतो; आणि कधी कधी तर फार मोठे नुकसान पत्करावे लागते.

एकदा मी वेस्टहॅम्प्टन ते न्यूयॉर्क प्रवास बसने करीत होतो. बसमध्ये मला एक गृहस्थ दिसला त्याचा चेहरा मला चांगलाच ओळखीचा वाटला. त्यानेसुद्धा मला पाहताक्षणीच ओळखले. तो म्हणाला, 'काय योगायोगा आहे पहा मी तुलाच गाठायच्या प्रयत्नात होतो काही दिवस.'

'माझादेखील तुलाच भेटायचा विचार चालला होता.' मी म्हणालो, असे म्हणताना, तो कोण आहे, ते आठवण्याचा निकराने प्रयत्न मी चालवला होता.

'तू पॅरिसहून वार्तापत्रं पाठवतोस त्यांच्यावरती आधारलेली एक चित्रपटमालिका चित्रवाणीसाठी करावी, असं बोलणं चाललं होतं आमचं.'

'उत्तम कल्पना आहे' मी म्हणालो– याला कोठल्या हॉटेलात तर भेटलो नव्हतो मी ?

'ती– ती– नाव काय रे तिचं ?' मी त्याच्या बायकोचे नाव विचारले. त्या नावावरून तरी काही पत्ता लागतो का ते बघत होतो मी.

'अरे दोन वर्षापूर्वी घटस्फोट घेतला आम्ही. पुन्हा लग्न केलं आहे मी' तो म्हणाला.

'अरे वा, अभिनंदन. तू अजून त्याच जागी रहातोस का रे ?'

'नाही, आम्ही वेस्टहॅम्प्टनला राहातो आता. आता पुन्हा तुझ्या या चित्रपट मालिकेबद्दल गंमत अशी आहे की आमच्याकडे पुष्कळ पैसा आहे; आणि काही नवीन कल्पनांच्या शोधात आहोत आम्ही.'

'हे चांगलं आहे' मी म्हणालो– हा आणि मी एकाच शाळेत होतो काय ? आम्ही दोघे साधारण एकाच वयाचे होतो.

'आमचा बेत असा आहे– प्रत्येक कार्यक्रमाचे हजार डॉलर्स आणि दहा टक्के फायदा– एवढे आम्ही तुला देऊ'

तो कोणत्या संस्थेसाठी काम करतो हे जरी समजले असते तरी थोडाफार उलगडा कदाचित होऊ शकला असता–'तुझी ही संस्था भलती जोरात दिसते रे' मी म्हटले.

'अरे नुसती जोरात नाही, तुफान जोरात'

'तुझी कचेरी त्या पूर्वीच्याच इमारतीत आहे का रे ?'

'होय, पूर्वी होती तिथंच आहे, तुझी ही चित्रपटमालिका यशस्वी झाली तर रग्गड पैसे मिळतील तुला'

'हो ना' मी आनंदाने शीळ घालू लागलो– एखाद्या शिबिरात तर हा बरोबर नव्हता ना माझ्या ?

पुन्हा, कार्यक्रमाचे सर्व हक्क तुझ्याच स्वाधीन राहाणार आहेत' त्याचे चालूच होते.

या गृहस्थाला मी भेटलो होतो तरी कुठे ? तो कोण आहे ते कळण्याचा एखादा उपाय असता तर किती बरे झाले असते.

'तू एवढं सगळं सांगितल्यावर मी काय बोलणार ? तुला आपल्या जुन्या टोळक्यापैकी कोणी भेटतं का रे ?'

'नाही ना. वेस्टहॅम्प्टनला गेल्यापासून कोणी भेटत नाही मला'

'आमची योजना अशी आहे : सुरुवातीला पासष्ट हजार डॉलर्स देऊ आम्ही तुला, पुढे आणखीही देऊ'

हा गृहस्थ कोण ?

'अजून पुष्कळ प्रवास करावा लागतो का रे तुला ?' मी त्याला विचारले.

'नाही. अगदी क्वचित प्रवास करतो मी आता' तो म्हणाला.

मधे एका थांब्यावर आम्ही पाय मोकळे करायला उतरलो होतो त्यावेळी तो म्हणाला 'एकदा करारपत्रावर सह्या झाल्या म्हणजे थोडे पैसे आगाऊ देऊ आम्ही तुला ?'

त्याच्या सदऱ्यावर आद्याक्षरे आहेत की काय ते पहाण्याचा मी प्रयत्न केला. सदऱ्यावर आद्याक्षरे नव्हती. 'तुझ्या सदऱ्यावर आद्याक्षरे नाहीत हे कसं ?' मी विचारले.

'आद्याक्षरं असतात माझ्या सदऱ्यांवर. याच एकावर नाहीत'

आमचा प्रवास संपला. निरोप घेताना माझा हात प्रेमाने दाबीत तो म्हणाला, 'उद्या भेट तू मला म्हणजे सगळ्या गोष्टी ठरवता येतील.'

'कुठं भेटायचं तुला' मी तळमळून विचारले.

'कुठं म्हणजे ? त्या पूर्वीच्याच ठिकाणी' तो म्हणाला आणि टॅक्सी पकडण्यासाठी धावला.

ही आहे चार दिवसांमागची कथा. त्यानंतर प्रत्येक दिवशी सकाळी, कदाचित तो पुन्हा भेटेल या आशेने, मी या बसने प्रवास करतो आहे. पण पुन्हा काही तो गृहस्थ दिसला नाही.

या असल्या लहान गोष्टी माणसाचे स्वास्थ्य बिघडवून टाकतात ☐



# आमदारनिवासातील एक दिवस

## चेतक

मी पेशाने एका कंपनीमध्ये नोकरी करीत असलेला एक्झिक्युटिव्ह. आमच्या ऑफिसमधील वातावरणातील तोचतोपणा पाहून थोडा कंटाळा आला आणि ऑफिसमधील मुली (स्त्रिया) लावीत असलेल्या सेंटच्या हॉलभर दरवळणाऱ्या वासाचादेखील कंटाळा आला. वाटले, कोठतरी चेंजसाठी फेरफटका मारावा. एम. एल. ए. होस्टेलबाबत तसे जबरदस्त कुतूहल होतेच. महाराष्ट्राच्या राजकारणात नव्हे तर महाराष्ट्राच्या जीवनातील ह्या जागेला काही और महत्त्व आहे. तसेच ही जागा मुंबईच्या झकपक जीवनात एक न्यारे गूढ आहे असेच वाटते. हे होस्टेल म्हणजे काय कोडे आहे हे समजून घेण्यासाठी एक दिवस ठरवून तेथे गेलो. टॅक्सी ड्रायव्हरला सांगितले, 'एम. एल. ए.' एवढ्या एका शब्दावरोबर तो मला बरोबर घेऊन चालला हे पाहून आश्चर्य वाटले म्हणून त्याला विचारले की 'आपको यह जगह अच्छी तरह मालूम है ऐसा लगता है।' तर त्यानेच मला प्रथम झटका दिला, 'अरे साब चर्चगेट, व्ही. टी. से ही नही तो बंबईके हर गलीसे—फिर वह मलबार हिल से हो या फोरास रोड से हो—यहाँ हरदिन टॅक्सी आती है। यह जगह तो हर टॅक्सीवालेको मालूम है।' पुढे काही विचारायची सोय राहिली नाही आणि तेवढ्यात एम. एल. ए. आले. प्रवेश हॉलमध्ये गेलो तर भपकन एकप्रकारचा वास आला. थोडा शोध घेतला तेव्हा ध्यानात आले की पुढाऱ्यांच्या डगल्यांच्या खळीच्या (स्टार्च) घामामुळे हा उबट वास येत होता. ह्या वेळेसच माझ्या ऑफिसमधील सेंटच्या वासाची मला प्रकर्षाने आठवण झाली.

स्टार्चच्या वासाने गुदमरल्याने मी बराच वेळ हॉलमध्येच उभा राहिलो. तेवढ्यात एक तरुण मंत्री तेथे आले. तेव्हा एकदम कुजबुज सुरू झाली. त्यांच्या सभोवती भजनी मंडळांचा प्रचंड समुदाय होता. मंत्री आमदार निवासात पाहून आश्चर्यच वाटले. चौकशी केली तेव्हा, समजले की एका माजी साहेबांच्या प्रकृतीची चौकशी करायला ते तेथे आले होते. तेवढ्यात या मंत्रिमहाशयांना एका तरुण होतकरू कार्यकर्त्याने गर्दीत घुसून गाठलेच. आपल्याला काहीतरी करून दाखवायला वाव मिळायला हवा असे भाव या कार्यकर्त्याच्या चेहऱ्यावर प्रकर्षाने प्रकट होत होते. कपडे राजेश खन्ना स्टाईल पण खादीचे. हे होते प्रोफेसर विठ्ठलराव जाधव. गरीबी हटाव, समाजवाद, इंदिरा गांधी वगैरे मंत्राने प्रेरित होऊन यांनी प्रोफेसरकीचा राजीनामा देऊन सरळ केशवराव धोंडगेविरुद्ध निवडणूक लढविली. नव्हे केशवराव धोंडगेंच्या विरुद्ध उभे रहायला कुणी धजेना. म्हणून ह्या प्रोफेसरांचा तेथे बळी दिला. प्रोफेसर त्या तरुण मंत्र्याला एवढ्या गर्दीतही म्हणालेच 'नामदार साहेब, मला आपणाशी थोडे बोलायचे आहे.'

नामदार : आता वेळ नाही, नंतर भेटा.

प्रोफेसर : आता वेळ नसणारच. कारण आता काम झाले. तेव्हा केशवराव धोंडगेंच्या विरुद्ध उभे करायला माणूस मिळेना म्हणून माझ्यामागे लागून मला विनवण्या करीत होते. मला नोकरी सोडायला लावली आणि आता तुम्हाला बोलायलाही वेळ नाही. पण मी आता थांबणार नाही. मलाही आता 'न्युसेन्स व्हॅल्यू'चे महत्त्व कळायला लागले आहे. मला आता माझी मोड ऑफ ॲक्शन बदलावी लागेल.

प्रोफेसर साहेब असे एकदम आणखीच खवळले.

मंत्रिमहाशय म्हणाले, प्रोफेसर साहेब, तुम्ही तरुण आहात, तुमचा संताप मी समजतो. पण शासनाला काही मर्यादा असतात. असे रागावू नका. बंगल्यावर भेटा, आपण शांतपणे बोलू.

वाटले हा मंत्री लवकर तयार होणार. नाईक साहेबांच्या तोंडची वाक्ये ह्याने जशीच्या तशी पाठ करण्याची मेहनत घेतली आहे.

ह्या संवादाने भोवतालच्या भजनी मंडळींचा समुदाय बोअर झाला होता. या भजनी मंडळींनी प्रोफेसरसाहेबांना जवळ जवळ ढकलूनच बाहेर काढले व मंत्रिमहाशयांना एस्कॉर्ट करीत जवळजवळ अगदी अलगद उचलून लिफ्टमध्ये ठेवले. या भजनी मंडळींपैकी ९० टक्के भाविकांनी कोणत्या न कोणत्या काळात कुस्त्यांचे फड गाजविले होते. त्यामुळे प्रोफेसरसाहेबांचा नाइलाज झाला. मला प्रोफेसरसाहेबांची दया आली. मी त्यांना म्हणालो 'मला आपल्याशी थोडे बोलायचंय. आपण कॅन्टीनमध्ये जाऊया का?' प्रोफेसरसाहेब खुशीने तयार झाले. कोणत्या ध्येयाने प्रेरित होऊन आपण या यज्ञकुंडांत उडी घेतलीत! वगैरे प्रश्न मी केले. त्यांनी फार विचार करून उत्तरे दिली. शासनाच्या शेतीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल व्हायला हवा हे त्यांनी फार मुद्देसूदपणे पटवून दिले. मराठवाडाच्या सर्वांगीण विकासाची सविस्तर योजना समजावून सांगितली. वाटले या होतकरू तरुणाला संधी मिळाली तर किती चांगले होईल. पण तसे होणार नाही असे त्यांच्या बोलण्यावरून दिसले. कारण शंकरराव चव्हाण व वसंतराव नाईक हे दोघेही एकाच पक्षाचे एकाच मंत्रिमंडळात असूनही त्यांच्या अंतस्थ वादाची झळ खालच्या कार्यकर्त्यांना अजूनही लागत आहे असेच काही प्रतिपादन प्रोफेसरसाहेबांनी माझे-जवळ केले.

अजून बरेच काही पाहायचे होते म्हणून प्रोफेसर साहेबांना शुभेच्छा व्यक्त करून निघालो. कॅन्टीनच्या काउंटरवर पैसे देण्यासाठी आलो तेव्हा तेथे एक आमदार आपल्या गावच्या चार पाच लोकांसमवेत उभे होते व त्या उडपी कॅन्टीन मॅनेजरबरोबर गुलुगुलु गोष्टी करण्याच्या प्रयत्नात होते. उद्देश असा की आपल्याबरोबर असलेल्या इतर लोकांवर भाव मारणे—की मला येथे सर्वजण फार मानतात. पण दुर्दैवाने तो कॅन्टीन मॅनेजर त्या आमदारांना फारशी दाद देत नव्हता व त्याच्या चेहऱ्यावर असे काही हावभाव होते की 'माझ्या मालकांची व अनेक साहेबांची दैनंदिन बैठक आहे, तेव्हा मला तुमच्या ओळखीची गरज नाही व कृपा करून आता धंद्याचा टाईम खराब करू नका.'

मी कॅन्टीनमधून बाहेर पडलो. समोरच्या वेटिंग हॉलमध्ये गेलो. हॉल मोठा प्रशस्त आहे. हा काँग्रेसप्रेमी भजनी मंडळींसाठी थांबण्यासाठी हॉल आहे. आमदार लोक स्नान व ब्रेकफास्ट, जेवण, विश्रांती वगैरे करीत असताना त्यांच्याबरोबर अगर मागाहून आलेल्यांनी या हॉलमध्ये विश्रांती घ्यायची असते. या हॉलमधील वातावरण पाहून वाटते की, कोण म्हणतो ग्रामीण महाराष्ट्रीयास मुंबईत काहीच थारा नाही!

हॉलमध्ये एक प्रचंड धोळका पाहून कुतूहल निर्माण झाले. त्याच्याजवळ गेलो. एक प्रचंड धूड एका कोचावर मांडी घालून प्रशस्तपणे बसले होते. बाकीचे १००–१५० लोक कोचावर, खाली जसे जमेल तसे बसले होते. तो प्रचंड देह जवळजवळ भाषणच करीत होता. आमचे 'भाऊ' कसे चांगले आणि समोरच्यांचे भाऊ कसे वाईट हे दादांना व सी. एम. ना कसे पटवून देणार याची रिहर्सल चालू होती. मूळचा पेशा पहिलवानी असल्याने भाषणाच्या आवेशात जणू काही ते मांडीसह डनलॉपच्या कोचावर बैठकी काढीत आहेत असाच भास होत होता. एका जणाला विश्वासात घेऊन विचारले तेव्हा उलगडा झाला. आता हे दादा, दुसऱ्या भाऊंच्या गटात आले आहेत. कारण पहिले भाऊ आता मंत्री नाहीत. दुसरे भाऊ हेच खरे जनतेचे कैवारी भाऊ आहेत हे सी. एम्. वसंतदादा वगैरेंना पटवून देण्यासाठी ही भजनी मंडळी तीन पेशल एसटच्या भरून आली होती. ह्या दादांनी त्यांच्या साठाव्या वर्षी दुसरे लग्न केले होते. त्या सोहळ्याची आठवण झाली व मनातल्या मनात हसू आले. मोठ्याने हसण्याचे धाडस नव्हते कारण तीन एसटच्या भरून आलेले तालमीतील पठ्ठे दादांच्या भोवती दक्ष होते. तो लग्नाचा सोहळा मोठा गाजला. दादांनी बाशिंग बांधून घोड्यावरून स्वतःला फिरवून घेतले होते. नवरीच्या अंगावर पाण्याच्या गुळण्या टाकून मजा आणली होती. सदतीस पोती साखरेच्या बुंदी तळून हजारो लोकांना जेवण दिले होते. दादांचे त्यावेळचे दैवतच 'पहिले' भाऊ होते. आपल्या या वयोवृद्ध व तपोवृद्ध नवरदेवाने नवपरिणित वधूसह पहिल्या भाऊंचे आगमन झाल्यानंतर त्यांना साष्टांग नमस्कार केला. दादांनी मंगलाष्टके झाल्यावर लाऊडस्पीकरवर चक्क भाषण केले होते. भारताचे लोकप्रिय नेते भाऊ या माझ्या शुभविवाहाला वेळेवर हजर झाले, म्हणून मला केवढा आनंद झाला म्हणून सांगू! भाऊ आले, भाऊंनी अक्षता टाकल्या. भाऊंनी आम्हा दोघा नव्या नवरानवरीला आशीर्वाद दिलेत. आमचा प्राण गेला तरी आम्ही भाऊंचा गट सोडणार नाही वगैरे वगैरे. भाषणातील प्रत्येक वाक्याचा कर्ता 'भाऊ' हा शब्द होता. भाषणाचे शेवटी भाऊंचा व इंदिरा गांधींचा विजय असो, अशी पहाडी आवाजात दादांनी हात उंचावून गगनभेदी घोषणा दिली. जनसमुदायाने त्यांना साथ दिली.

दादा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना दादांच्या अध्यक्षतेखाली थोरल्या साहेबांच्या हस्ते भूमिपूजनाचे बरेचसे दगड रोवले गेले होते. त्यावेळच्या भाषणात साहेब हात उंचावून बोलायचे – महाराष्ट्रात जनजागृती व्हायला पायजेल आहे. तरुणांनी उद्योगधंद्याच्या रणकुंडात उडी घ्यायला पायजेल आहे. साहेबांचा हा संदेश दादांनी आधीच अंगिकारला होता. शेतकी हा विषय घेऊनही मॅट्रिकला चार वेळेस नापास झालेल्या आपल्या पुतण्याला त्यांनी कॉन्ट्रॅक्टर केले आहे. ह्या सगळ्या भूमिपूजन झालेल्या बांधकामाची कॉन्ट्रॅक्टस अर्थातच दादांच्या पुतण्यालाच मिळाली आहेत. घरी जेवणाच्या कोंबडी कार्यक्रमाचे वेळेस पुतण्याची थोरल्या साहेबांशी ओळख झाली. ओळख करून देताना दादा साहेबांना अभिमानाने सांगावयाचे, 'आज याची चाळीस लाखांची कामे चालू आहेत.' साहेबांनी जेवण झाल्यावर या कर्तृत्ववान बाळाची पाठ थोपटताना मी पाहिले होते. ह्याला इंजिनियरिंग शास्त्रातले काही समजत नसले तरी दादांच्या नाजूक हातांनी इंजिनियरला कसे कुरवाळायचे याची विद्या एव्हाना चांगली आत्मसात झाली आहे.

आता हेच दादा पहिल्या भाऊंच्या विरुद्ध झाले आहेत. आणि दुसऱ्या भाऊंच्या गटात आहेत. सर्व भजनी मंडळी तीच आहेत, टाळही तेच आहेत. भजनाची चालही तीच आहे. फक्त भजन काव्यातील कर्ता बदलला आहे. हा सर्व खरीप आणि रब्बी सीझनचा शो पाहून मन चक्रावून गेले. दादांना कसलेही व्यसन नाही हे नमूद केले नाही तर दादांवर अन्याय होईल. दादा पूर्वी चरवी चरवी दूध एका दमात प्यायचे. आता दादा फक्त सोश्या पितात. दादा कोकाकोलालाच सोश्या म्हणतात.

ह्या घोळक्यापासून थोडा दूर गेलो. हॉलच्या दुसऱ्या कोपऱ्यात एक दुबळा म्हातारा खालीच जमिनीवर बसला होता. ठिगळ लावलेले जुनाट जाकिट त्याच्या अंगावर होते व जवळ एक पिशवी होती. तिच्यात एखादा शर्ट व धोतर असावे. म्हाताऱ्याचे पोट पाठीशी गेलेले, चेहऱ्यावरची हाडे वरती आलेली, डोळे खोल गेलेले. मी त्याच्या शेजारच्या कोचावर जाऊन बसलो. विचारले, काय बाबा, काय काम काढले. म्हातारा म्हणतो, 'रिटायर्ड होऊन दोन वर्षे झाली, अजून पेन्शनचा हिशोब नाही. आपले आमदारकाका काही करतील म्हणून इथे आलो. चार दिवस झाले आमदारकाकांनी इथेच बसून राहायला सांगितले आहे.' जास्त चौकशी केल्यावर समजले हे आमदारकाका पूर्वी गुरुजी होते. गरिबी हटावच्या कार्यक्रमात उडी घेतली व आमदार बनले. आता त्यांना कुणी गुरुजी म्हटलेले आवडत नाही. काका हे नाव त्यांनी जाणीवपूर्वक स्वतःला पाडून घेतले आहे. फोन आला आणि कुणी विचारलं, 'गुरुजी आहेत का?' तर हे उत्तर देतात. 'मी काका बोलतोय' नियतीची क्रूर चेष्टा अशी की तो म्हातारा आज मंत्र्यासमोर कोचावर बसायलाही भीत होता. तोही कोण्या एके काळी या आमदार गुरुजीचा शिक्षक म्हणून

# रजनीने हा चेंडू खेळण्यात चूक केली

होता आणि आज हा म्हाताराही आपल्या विद्यार्थ्याला काका म्हणून संबोधित होता.

वाटले आता तळमजल्यावरचे अवलोकन थांबवून थोडा वरच्या मजल्यावर फेरफटका मारावा म्हणून लिफ्टकडे गेलो. लिफ्टच्या रांगेत माझ्या पुढेच एक नोकर होता. हातात ब्राऊन पेपरच्या पिशवीत तीनचार बाटल्या वर घेऊन चालला होता. बहुधा बिअरच्या असाव्यात. टॅक्सीतून उतरल्यावर रस्त्यावर चणे फुटाण्याचे फेरीवाले का हजर होते याचा उलगडा झाला. लिफ्ट खाली आली तेव्हा त्यातून एक नोकर सोड्याच्या रिकाम्या बाटल्या घेऊन बाहेर पडला.

पहिल्याच मजल्यावर आलो. म्हटले येथे थोडा फेरफटका मारावा. सहज पॅसेजमधून चाललो होतो. एका रूमचे दार उघडे होते. दृष्टादृष्ट झाली व ओळख असल्याने आत गुबगुबीत गादीवर पहुडलेल्या आमदारसाहेबांनी मला बोलाविले. प्रकृती वगैरे कशी म्हणून विचारले. तेवढ्यात तेथे एका जिल्हा बँकेचे मॅनेजर आले. ते कोणाच्या तरी शोधात होते. चौकशीसाठी या आमदाराकडे आले होते. पण ते काही बोलण्याअगोदर आमदारांनीच त्यांना प्रश्न केला, तुमची गाडी कोठे आहे? बँक मॅनेजरनी सांगितले, खाली आहे.

आमदार : मग ती गाडी माझ्यासाठी ठेवा. तुम्ही रेल्वेने जा. मी परवा येईन आणि तसा माझ्या घरी निरोप द्या.

मॅनेजरनी बहुधा बँकेच्या अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी गाडी मुंबईला आणली असेल (असे आपण गृहीत धरू या!) पण तरीही त्यांनी या सूचनेस झटकन होकार दिला. मलाच त्यांचे वाईट वाटले. पण त्यांच्या चेहऱ्यावर तसे दुःखाचे काही हावभाव नव्हते. बहुधा त्यांना अशा गोष्टींची सवय झाली असेल. धन्य तो सहकार!

### एकदम टॉप फ्लोअरवर

मी रूममधून काढता पाय घेतला. एखाद्या वेळेस आपल्याकडेही यांनी काही मागितले तर या भीतीने! लिफ्टजवळच्या बाल्कनीकडे जाऊ लागलो. काँग्रेसचे एक बुद्धिजीवी आमदार आणि केशवराव धोंडगे लिफ्टची वाट पहात होते. त्या बुद्धिवादी आमदारांनी तेवढ्यात धोंडगेना टोमणा मारला, काय केशवमहाराज! आज कोणते कीर्तन? धोंडगे खवळले, 'चेष्टा करू नका. आम्ही जे काही बोलतो ते पोटतिडीकेने. राजाराम बापूसारखे जरा धाडसी व्हा अन् आमच्या बाजूने भांडा जरा.' त्या बुद्धिजीवी आमदाराने विषय मिस्किल विनोदाकडे नेला. 'काहो केशवराव, मंत्रीपदावर असेपर्यंत सत्य बोलण्याची किती कुचंबणा होते याचंच हे जिवंत उदाहरण असा नाही का निष्कर्ष काढता येणार?' लिफ्ट आली दोघेही लिफ्टमध्ये गेले. नाही म्हणायला हे दोघे टोपी शिवाय होस्टेलमध्ये दिसले पण त्यांनी केसांना तेल लावले होते. केसांना तेल न लावलेला व पिंजारलेले केस असलेला आमदार मला अभावानेही पाहायला मिळाला नाही. कारण यातल्या बहुतेकांनी आता डोक्यावर टोप्या घातल्या आहेत.

म्हटले आता वरच्या मजल्यावर जावे. तेथे काही नवीन पाहायला मिळेल. लिफ्टमधून बाहेर पडल्याबरोबर बाल्कनी जवळील वेटिंग हॉलमध्ये कसली तरी गडबड ऐकू आली. सरळ तेथे आलो. एक काँग्रेस आमदार व एक संयुक्त समाजवादी कार्यकर्त्यांचा वाद चालू होता.

काँग्रेस आमदार : काल श्रीपतराव बोंद्रेंनी मुंबई संपावर काय झकास भाषण करून फर्नांडिसची उंडविली.

समाजवादी कार्यकर्ता : होय, फार छान भाषण केले. बोंद्रे म्हणाले— महाराष्ट्र जळतोय, गेली २५ वर्षे शेतमजूर संघटनेवाचून तडफडून मरतो आहे आणि फर्नांडिस फक्त मुंबई कामगारांचे प्रश्न हाताळतोय. पण काहो आमदारसाहेब, फर्नांडिस काय महाराष्ट्र सरकारमध्ये युनियन काढण्यासाठी नोकरीला लागला आहे? तुम्हा बागायतदार आमदार, बागाईतदार मंत्री यांच्या शेतावरील मजूर उपाशी मरत आहेत तर तो काय फर्नांडिसचा गुन्हा? म्हणे महाराष्ट्र जळतोय! जाऊ द्या आमदार साहेब, आपल्याला वाद वाढवायचा नाही आहे. फर्नांडिसनी बोनसची गुगली टाकली आणि रजनी पटेलचा कॅच वसंतराव नाईकांनी घेतला ही काँग्रेसची केवढी अगतिकता आहे. शेवटी पंतप्रधानांनी खरे बोलण्याचे धाडस दाखविले. त्या म्हणाल्या, 'रजनीने हा चेंडू खेळण्यात चूक केली.'

काँग्रेस आमदाराने नाइलाजाने टाळी दिली.

तिथेच एक फाटका माणूस कोपऱ्यात बसला होता. त्याची चौकशी केली तेव्हा समजले की त्याची जमीन एका टिनोपॉल आमदाराच्या भाच्याच्या नावावर करायची होती. काही कायदेशीर अडचणी होत्या म्हणून कलेक्टरला वरून रट्टा देण्यासाठी आमदारसाहेबांची धडपड होती.

आता म्हटले मधले सगळे मजले ड्रॉप करावेत. एकदम टॉप फ्लोअरवर जावे. हा फ्लोअर व्ही. आय. पी. साठी आहे. मस्त हवा वाहात होती. सोड्याच्या रिकाम्या बाटल्या नोकराने उचलून न्याव्यात म्हणून रूमबाहेर भिंतीला टेकून ठेवलेल्या होत्या. ह्या राज्यात दारुबंदी उठविल्यावरही कुणाच्या रक्तात किती अल्कोहोल आहे हे तपासून पाहण्यासाठी येथे दारूबंदी मंत्री आहेत हाही एक विनोदच आहे.

टेरेसवर मनमुराद गप्पा चालल्या होत्या. दुष्काळी जिल्ह्यातील एक विरोधी आमदार आपण टॉप फ्लोअरला टॉप रूम कशी मिळविली याचे चटकदार वर्णन सांगत होते. तर विरोधी आमदारांची भीतीने कामे लवकर होतात याची कबुली काँग्रेस आमदार देऊन नाराजी व आपली विनोद बुद्धी प्रकट करीत होते. एका आमदाराने तक्रार केली. महाराष्ट्राच्या राजधानीत मराठी लोक कायदा काढण्यासाठी येथे जमतात आणि विरंगुळा म्हणून एकही मराठी सिनेमा जवळपास नाही हे किती दुर्दैव! तर दुसरा आमदार म्हणत होता सिनेमाचे राहू द्या. खालच्या कॅन्टीनमध्ये मराठी माणसे जेवतात. पण वाढणाऱ्याला मराठी समजत नाही! तेवढ्यात एक बुद्धिजीवी (?) आमदार म्हणाले, 'काहो, आजकाल शालिनीताई अमेरिकेचा दौरा करून आल्यापासून कशा भन्नाट बोलताहेत नाही का? वसंतदादा व शंकरराव चव्हाण यांना एका खोलीत कोंडून ठेवून त्यांच्यात मुख्यमंत्रीपदाबाबत एकमत झाल्याशिवाय त्यांना बाहेर सोडायचे नाही ही शालिनीताईंची शक्कल नामी आहे. जणू काही महाराष्ट्रात दादाच फक्त तरुण आहेत व नाईकसाहेब सरकारी नोकर आहेत व वयाच्या अटीमुळे ते आपोआपच निवृत्त होणार आहेत! आणि वसंतदादा व शंकरराव चव्हाण यांच्यात कधीच एकमत झाले नाही तर दादा बाहेर कसे येणार? मग शालिनीताईंचीच पंचाईत

नाही का होणार? आणि काहो, मराठ्यांचे राज्य असताना पुन: मराठ्यांची जातीयवादाची संघटना कशाला हवी तुम्हाला? छत्रपती आमदार खवळले, 'काहो, आमची संघटना नसावी यासाठी तुम्ही जे आकांडतांडव करता आहात ते तुमच्या जातीयवादी संघटनांच्या व्यासपीठावरूनच ना? इतर सर्व जातींना संघटना हव्यात. त्यासाठी ब्राह्मण परिषद, दलित परिषद, वडार परिषद, चांभार परिषद, मारवाडी परिषद, वगैरे जातीयवादी परिषदेसाठी तुम्हाला यशवंतराव चव्हाणच प्रमुख पाहुणे म्हणून हवे असतात. मग यशवंतरावांच्या जातीबांधवांनी एकादी संघटना केली तर काय बिघडले? जातीयवाद मानणाऱ्या शंकराचार्यांच्या दर्शनासाठी तुम्ही का जिवाचा आटापिटा करीत असता? बुद्धिजीवी आमदार निरुत्तर झाले. तेवढ्यात कडू पाटील या कम्युनिस्ट आमदारांनी चान्स घेतला. हे वाद टाळावयाचे असले तर तुम्हा सर्वांना आमच्या पक्षात आल्याशिवाय गत्यंतर नाही. सत्तारूढ पक्ष नी विरोधी पक्ष यांच्या ह्या दिलजमाईच्या मनमुराद गप्पा पाहून हे दोघेही जनतेला कसे बनवीत आहेत याचेच प्रत्यंतर आले.

दुसऱ्या बाजूस एक कंपू बसला होता. पोशाखावरून असे वाटत होते की हे बहुधा व्यापारी वर्गातील असावेत. चौकशी करता समजले की केवळ सरकारच्या खताविषयीच्या चुकीच्या धोरणामुळे आम्हाला नाइलाजास्तव शेतकऱ्यांची कशी पिळवणूक करावी लागते हे सरकारला म्हणजे कोणत्या तरी एका साहेबाला पटवून देण्यासाठी हे व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ एम. एल. ए. होस्टेलवर येऊन टपकले होते.

टेरेसच्या कठड्यावर हात टेकून एक वयस्कर कार्यकर्ता दूरवर पहात होता. हॉफ पॅन्ट, खादीचा पण स्काऊटसारखा दोन्ही खांद्यावर दोन पट्ट्यांचा व दोन खिशांचा हॉफ शर्ट, खिशामध्ये दोन तीन पेन्स जड डायरी, डोळ्यावर तारेची फ्रेम असलेला चष्मा असा अवतार, हा नक्की कोकणातला कार्यकर्ता असावा असे वाटले. कुतूहलाने त्याचे जवळ गेलो. विचारले, आपण मुंबईत काय काम काढले? स्वारीचा बराच कोंडमारा झाला होता असे दिसले. ते एकदम उसळले 'हे काय राज्य आहे? साहेबांनी मागच्या वर्षात कोकणात दौरा केला. तालुका काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून मी त्यांचेबरोबर फिरलो. अगदी शेवटच्या पोलिसांच्या जीपमध्ये पेट्रोलच्या डब्यावर बसायला मिळायचे. साहेबांनी प्रत्येक भाषणात सांगितले 'कोकणात गावोगावी इतर जिल्ह्यांसारखे उसाचे मळे फुलले पाहिजेत. गुऱ्हाळाचा सुवास दरवळला पाहिजे, साखर कारखाने निघाले पाहिजेत. हे माझे स्वप्न आहे. आणि ह्या संदेशाने प्रेरित होऊन (महात्मा गांधी विचारसरणीचा काँग्रेसचा एक क्रियाशील कार्यकर्ता म्हणून मी ऊस लावला. कोकणातले दमट हवामान, हलकी जमीन व अती पाऊस व उन्हाळ्यात पाण्याचा तुटवडा यामुळे ऊस कोकणात पिकवता यायचा नाही हे तज्ज्ञांचे मत मला माहीत असूनही केवळ एक शिस्तबद्ध कार्यकर्ता म्हणून मी साहेबांचा संदेश डावलला नाही, आणि ऊस पिकवून आज माझा संसार उध्वस्त झाला आहे. ऊस जेमतेम ज्वारीसारखा वाढला आणि दमट गुळाचा रवा तयार होईना. ती रवडी मला शेवटी पातळ शेणासारखी बैलगाडीत भरून उकिरड्यावर नेऊन टाकावी लागली. कोकणातील भौगोलिक परिस्थितीचे वैचित्र्य मान्य करूनच येथील निराळ्या पिकपाण्याच्या संशोधनासाठी दापोली विद्यापीठ मंजूर केले आहे ना? येथेही ऊसच पिकवायचा होता तर मग राहुरी कृषी विद्यापीठावर भागले नसते का? असेच देशाचे नियोजन होणार असेल तर या देशाचे लवकर वाटोळे होणार आहे हे मी आज प्रांतिक काँग्रेसच्या बैठकीत कडाडून सांगणार आहे. काय चालले आहे या राज्यात? हा छत्रपती महाराजांचा, महात्मा गांधींचा, पंडित नेहरूंचा पवित्र देश उध्वस्त करायचा आहे काय या राज्यकर्त्यांना? स्वारीने एका दमात मला हे जळफळाटाचे भाषण ऐकविले. त्याच्या तळतळाटाची मला दया आली. मी विचारले, साहेबांच्या दौऱ्यात त्यांचेबरोबर कुणीच शेती तज्ज्ञ नव्हते काय? आणि त्यांनी साहेबांचा हा विचार चुकीचा आहे हे त्यांच्या निदर्शनाला आणले नाही काय? तो कार्यकर्ता म्हणाला, दोन स्टेशन वॅगन्स भरून शेती तज्ज्ञ होते. साहेबांच्या सभेला जनसमुदाय कमी पडू नये म्हणून! आणि आश्चर्य असे की साहेबांच्या प्रत्येक वाक्याला चमच्यासारखे चेहऱ्यावर लाचार हास्य आणून हे तज्ज्ञ टाळ्या वाजवीत होते आणि साहेबांना प्रोत्साहन देत होते. हेच तज्ज्ञ बारा महिन्याच्या ऊस पिकाला एकरी ६० किलो नायट्रोजन टाका व चार महिन्याच्या भाताला एकरी १०० किलो नायट्रोजन टाका असे कोकणातल्या शेतकऱ्यांना सांगतात हेही एक दुर्दैवच आहे आमचे.' त्या कार्यकर्त्याने मला त्या साहेबांचे नाव सांगितले. पण मी आपणाला सांगणार नाही, कारण हा दोष साहेबांचा नाही, आपण त्यांना निवडून दिलेत त्यामुळे प्रथमतः हा दोष आपलाच आहे.

आम्ही दोघांनीही मग बरोबरच एक दीर्घ उसासा टाकला. समोर दूरवर दृष्टी टाकली. नरीमन पॉईंटवर एका उंचच उंच अलिशान हॉटेलच्या इमारतीचे बांधकाम चालले होते. कृश कोकणी लोक लंगोटी लावून अक्षरशः पळत कॉंक्रीट ओतण्याचे काम करीत होते. संध्याकाळी खोपडी पिण्यासाठी पैसे मिळतील अन मग झोप येईल ह्या आशेने! विटाच्या ढिगाऱ्याखाली सावलीत एक लेकुरबाळ्या मजूर बाईचे पोर हातपाय हलवून खेळत होते, आईच्या ममतेच्या पान्ह्याची वाट पहात! त्याला कल्पनाही नव्हती की उपाशी पोटी हे कष्ट सोशीत असल्याने आपल्या आईचा पान्हा शुष्क होत आहे.

डोळे सुन्न झाले. तात्काळ एक सिगारेट शिलगावली व झटझट झुरके मारले. एव्हाना तो (महात्मा) गांधीवादी कार्यकर्ता माझे पासून निघून गेला होता. म्हटले आता येथे थांबणे बरे नव्हे. लिफ्टमधून सरळ तळमजल्यावर गेलो. लिफ्टमनने केविलवाणे माझ्याकडे पाहिले. त्याला चहाला चार आणे देऊन त्याचा सलाम मिळविला. खाली आल्यावर म्हटले आता रिसेप्शन काऊंटरवर जरा उभे राहून गंमत पहावी. तेथील मॅनेजरचे हाल पाहून वाटले यापेक्षा राज्य

## त्याच्या तळतळाटाची मला दया आली !

चालविणे सोपे आहे. एक कार्यकर्ता येतो, साहेब आहेत का? (तो असे गृहीत धरूनच चालतो की मॅनेजरने माझा चेहरा ध्यानात ठेवायला हवा आणि मला हवे असलेले साहेब कोणते हेही स्वतः होऊन ओळखायला हवेत).

मॅनेजर : नाहीत (मला मॅनेजरच्या सर्वस्पर्शी ज्ञानाचे कौतुक वाटले.)

कार्यकर्ता : असे कसे होईल? मला त्यांनी या वेळेस थांबतो म्हणून सांगितले होते.

मॅनेजर : 'मग असतील, वर जाऊन बघा.'

कार्यकर्ता : रूम नंबर काय ?

मॅनेजर : (लिहिण्याचे काम चालू ठेवून) साहेबांचं नाव काय ?

कार्यकर्ता आपला मामा झाला हे समजतो व हे संभाषण दुसरे कुणी ऐकले तर नाही ना, असे अवतीभवती ओशाळून बघतो व मग मॅनेजरला हळूच साहेबांचे नाव सांगतो, मॅनेजर की बोर्डकडे पाहून हळूच उत्तर देतो – 'ते कालच गेलेत.'

### थकबाकीदार आमदार

तेवढ्यात तेथे एक आमदार येतात. चाव्या ठेवतात. मॅनेजर जुन्या बिलाच्या बाकीची आठवण देतात. आमदारसाहेब खवळतात, 'मॅनेजर, मी पुन्हा बजावतो की, कमिटी मिटिंगला जात असताना व माझेबरोबर चार लोक असताना जुन्या बाकीबद्दल विचारीत जाऊ नका म्हणून! बिचाऱ्या मॅनेजरला काय माहीत हे कमिटी-मिटींगला चाललेत की कॅबरे-मिटींगला चाललेत.

मॅनेजर सौजन्याने उत्तर देतात – चुकले असले तर माफ करा. आम्हाला थेट मंत्रीसाहेबांचा हुकूम आहे की थकबाकी वसुलीकडे जातीने लक्ष द्या.

आमदार : जोडा साहेबांना फोन, मी साहेबांशीच बोलतो. हा काय पोरखेळ ?

मॅनेजर : कृपया त्या दुसऱ्या फोनवरून बोला.

आमदार नंबर फिरवितात. विचारतात, साहेब आहेत का ?

उत्तर येते – साहेब स्नान करताहेत. आमदार फोन ठेवून निघून जातात.

जुनी बाकी न देता !

काऊंटरभोवती साहेब या शब्दाचा एवढा काही गजर निनादत असतो की हा शब्द कुणाकुणाला उद्देशून उच्चारला जातो याचा थांगपत्ताच लागत नाही.

एवढ्यात समोरून एक डॉक्टर आमदार येतात. त्यांची व माझी जुनी दोस्ती. डॉक्टरांना पैशाचा उबग आला होता आणि पक्षाला खर्च करण्याची ऐपत असलेला उमेदवार हवा होता. डॉक्टरांना तसा आडनावाच्या पुण्याईनेही आधार दिला. डॉक्टर आमदार झाले. डॉक्टरांची भेट झाल्याने आनंद झाला. डॉक्टर तसे दिलखुलास असून अजातशत्रू. डॉक्टरांनी चहाचा आग्रह केला. पुन्हा कॅन्टीनमध्ये गेलो. डॉक्टरांना म्हटले, काय डॉक्टर, 'तुम्हाला उपमंत्रीपद मिळेल असे वाटले होते. डॉक्टर म्हणाले, तोच किस्सा तुम्हाला सांगायचा आहे.

डॉक्टर सांगू लागले–

निवडणूक झाल्याबरोबर सर्व वारकऱ्यांबरोबर मीही मुंबईतीर्थी काही प्रसाद मिळतो का, म्हणून दाखल झालो. पोस्टल डिग्रीचा नसून खराखुरा एम. बी. बी. एस. डॉक्टर असल्याने व प्रत्यक्ष जन्मतारखेच्या हिशोबाने तरुण असल्याने अपेक्षा होत्या, आपला कोठेतरी चान्स लागेल. अर्थात प्रयत्न गंमत म्हणूनच करीत होतो. मी एकूण तीन मंत्र्यांना भेटलो. या न त्या निमित्ताने त्यांची माझी ओळख होती. तर तिघांकडूनही एकच उत्तर (उपदेश) मिळाले, 'डॉक्टर, तुम्ही अजून लहान (तरुण शब्दसुद्धा नाही!) आहात. आम्ही संघटनेसाठी झिजलो. लोकशाही समाजवादासाठी झटलो. गरिबांच्या उद्धारासाठी रक्त जाळलं. काय काय केले नाही, तेव्हा कुठे आमची मागच्या कॅबिनेटमध्ये वर्णी लागली. देश संक्रमणाच्या काळातून जात आहे. अजून आपल्याला फार वाट चालायची आहे. पंतप्रधानांचे हात बळकट करावयाचे आहेत. तेव्हा तुमच्यासारख्या लहानांनी मंत्रिपद मिळविण्याची अशी खूप अवास्तव आशा सोडून द्यायला हवी. आमच्यासारखे कमीत कमी दहा वर्षे तरी स्वत:ला समाजात झोकून द्या. मग आपोआपच तावून सुलाखून निघाल आणि मंत्री व्हाल. हे वैभव आम्ही टाकीचे घाव सोसले तेव्हा आज उपभोगीत आहोत! उपदेश पटला पण तिघांचाही उपदेश जवळजवळ टेपरेकार्ड केल्यासारखा आला याचे आश्चर्य वाटले. अन् प्रथम आपल्याला हेही शिकावे लागेल हे उमगले. दुसऱ्या दिवशी मुंबईत सिनेमा पाहिला. आणि दारूण विनोद असा की रात्री आठ वाजता नाईक साहेबांनी मंत्रिमंडळ जाहीर केले तेव्हा त्यातून हे तीनही मंत्री गाळले गेले होते. त्या मंत्र्यांची इतकी दया आली की त्यांचे सांत्वन करण्यासाठी भेटायला जायचेही धाडस झाले नाही आणि हे राजकीय जीवन किती हवेत चालत आहे याची प्रथम प्रचिती आली. डॉक्टर पुढे म्हणाले, 'अहो पडलो असतो तर बरे झाले असते. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष तरी होता आले असते. (उदाहरणार्थ मधुकर सोनावणे, रामनाथ वाघ वगैरे.)

डॉक्टरांनी अगदी सिक्सरच मारली होती. मी अवाक् झालो. तुम्हीही त्याचेवर दया करा आणि त्यांची नावे छापू नका अशी डॉक्टरांनी शेवटी मला विनंती केली. शेजारच्या टेबलाजवळील लोकांच्या संभाषणाने शुद्धीवर आलो. एक कॉंग्रेस आमदार विशाल सह्याद्रि वाचीत होते. त्यांचे जवळ एक जनसंघीय आमदार आले, 'काय, आला का आकडा?'

कॉंग्रेस आमदार : काय बोलता काय ? हे इंदिरा गांधीच्या ध्येय धोरणांचा हिरीरीने पुरस्कार करणारे पत्र आहे (इंदिरा गांधी या नावाच्या महिम्यामुळे हे आमदार आपल्या पक्षाचे नाव विसरले होते!)

जनसंघीय आमदार : बाकी थोरल्या साहेबांच्या आशीर्वादाने सहकारी साखर कारखान्यांच्या जाहिरातींची मदत घेऊन, जवळ जवळ अर्धा पान आकडे छापून हे दैनिक गरिबांची सेवा करते आहे नाही का ?

कॉंग्रेस आमदार : राहू द्या हो. लोकमान्यांचा वारसा घेऊन आलेले केसरीकारही तेच करीत आहेत आणि तुमचा तरुण भारतही अगदी आकड्यासाठी अर्धे पान रोज छापीत आहे.

धन्य त्या कोलांटचा उड्या !

डॉक्टरांचा निरोप घेऊन निघालो तर कॅन्टीनच्या प्रवेशद्वारात

एम. एल. ए. हॉस्टेलच्या शेजारच्या पॉश कंपनीतील चार मिनीस्कर्ट-मधील युवती (?) आपले केस वाऱ्यावर भुरभूर उडवीत भेटल्या. मी त्यांना झटकन विचारले, ‘आपण एम. एल. ए. होस्टेलच्या कॅन्टीनकडे कशा आकृष्ट झालात ?’ एक युवती गॉगल काढून म्हणाली, ‘जस्ट फॉर फन !’

मुंबईकर एम. एल. ए. होस्टेल ‘फन’ म्हणून घेतात हे प्रथम समजले !

मी त्यांचे आभार मानून चालू लागलो. त्या खळीच्या उबट वासातही त्या युवतींच्या सेंटच्या सुगंधाने मन थोडे उल्हसित झाले. तेवढ्यात त्या युवतीकडे पाहून एक प्रचंड देहाच्या ५८ इंची डगलेवाल्याने एक सणसणीत टॉन्ट मारला—‘मुंबईत आल्यावर ह्या उफाड्याच्या पोरी पाहून डोक्यात कसे चिनमिन होते बघा. अन् मग काय डोंबल्याचा अभ्यास करायचा ?’

त्यांची तक्रार मला बरीच प्रामाणिक वाटली. कारण त्या डगलेवाल्याचे गाल अजूनही लालबुंद व असे टच्च होते की टाचणी टोचली तर चळाचळ रक्ताच्या चिळकांड्या उडतील. चौकशी केल्यावर समजले की, ते तरुण तुर्क गटाचे म्होरके होते आणि त्यांची एकसष्ठी गेल्या वर्षीच मोठ्या थाटाने साजरी झाली होती.

आता डोकं भणभणायला लागलं. पोर्चच्या बाहेर पडलो. टॅक्सीची वाट पाहात थांबलो. टॅक्सीसाठी शेजारी एक माजी मंत्रीही (पण आजी आमदार) उभे होते. एक टॅक्सी आली. तेवढ्यात एक सचिवालयातील कारकून त्या माजी मंत्र्यांना डावलून टॅक्सीत घुसला. त्याच्या हातात पिवळ्या कागदाची फाईल होती म्हणून तो सचिवालयातीलच असावा.

मी चर्चगेटच्या दिशेने पायी चालू लागलो. सिगारेट पेटविली व विचार करू लागलो. आपली आजची किरकोळ रजा वाया गेली की काय ?

□ □



तिच्या छातीत कळ आल्याचं कळल्याबरोबर डॉक्टरांनी तिची हॉस्पिटलात उचलबांगडी केली. पाण्याशिवाय तिला काहीही दाखवलं नाही. रेचक तेवढं दिलं. ती अव्वाच्या सव्वा लठ्ठ होती. आणि कसंही करून तिचं वजन खाली आणणं अगदी अगत्याचं होतं. तळलेली कोंबडी, भात आणि केळ्यांचे काप हे तिचं नेहमीचं खाणं होतं. ते चापून झाल्यावर ती ग्लासभर ताडी झोकी. आता तर त्याचं नावच नव्हतं. म्हणून तिच्या जिवाची तगमग चालू होती.

हॉस्पिटलातून सुटका झाल्यावर डॉक्टरला तिने चोख सांगितलं की आपण लाजबीज काही जाणीत नाही, असे नुसते निर्जळी उपास काढून जगण्यापेक्षा पोटभर खाऊन मेलेलं परवडलं; आता असं आडमाड वागून नातवंडा–पंतवंडांचे चेहेरे बघायला मिळायचे नाहीत हे मान्य; पण नाही मिळाले तर नाही मिळाले; मी पोटभर खाईन आणि सुखासमाधानाने डोळे मिटीन. हॉस्पिटलातून ती तडक आपल्या बारमध्ये गेली. तो तिनेच चालवलेला होता. हातभट्टीची कंट्री आणि चोरटी व्हिस्की प्यायला तिथे गिऱ्हाईकांची गर्दी असायची.


आम्ही तिला मोठी आई म्हणायचो. कारण ती भलतीच लठ्ठ होती नि शिवाय ती आमची आजीही होती. ती ऑन्टीला सोबतीला घेऊन रहायची. ऑन्टी बार चालवायची. बार म्हणजे एक लांबोडकी खोली. दोन लांबोडकी टेबलं. लाकडी अरुंद खुर्च्या. बर्फासाठी मोठं घमेलं. एक लाकडी कपाट. त्यात प्लेअर्स सिगरेटींची पाकिटं, मटणाचे हवाबंद डबे, आणि हाईनकेन बियरचे पत्र्याचे डबे.

ऑन्टी ही मोठ्या आईची लेक. ती दिसायला चांगली घसघशीत होती. आडव्या हाडाची. तीन कामकरणींच्या मदतीने ती बारचं काम उरकी. त्या तिघींचे चेहेरे सदैव तेलकट दिसत. अस्तित्त्व नसल्यासारख्या त्या वावरायच्या. गिऱ्हाईकांना बियर पुरवणं हेच त्यांचं एकमेव काम असे. ऑन्टीचं लक्ष फक्त एकाच गोष्टीकडे असे; पै–पै करून पैसे जमवायचे, मोठी आई मेली की तिची जंगी अंत्ययात्रा काढायची नि दफनविधी मोठ्या दणक्यात करायचा हे तिचं एकमेव स्वप्न होतं.

ऑन्टी हसतमुख असायची. हसायचीसुद्धा खळखळून. मात्र हेतू एवढाच की गिऱ्हाईकांनी खुशीत येऊन दोन पैसे अधिक खर्चावेत. त्यांनी हाक मारायचा अवकाश की कमरेत लचकत मुरडत ती हजर होई. बोला, काय आणू ? प्लेअर्सचं पाकीट ? हे घ्या. जाता जाता ती गिऱ्हाईकाला डोळाही घाली आणि इतकं हसे की तीचं सारं शरीर घुसळून निघे.

विक्रीला ठेवलेला माल हळू हळू उठू लागला की ती शांतपणे समाधानाचा सुस्कारा सोडी नि हसे. हसता हसता पुन्हा एकदा तिचं सारं शरीर घुसळून निघे. नंतरं आपणाला कित्ती कित्ती बरं वाटलं हे पटवण्यासाठी ती जाता जाता गिऱ्हाईकाच्या अंगाला अंग घासटून पटकन आतल्या निजायच्या खोलीत गडप होई. तिथल्या पत्र्याच्या ट्रंकेत ती पैशांची पुरचुंडी दडवून ठेवी.

एकदा काय झालं की चांगलं चाटून पुसून जेवून झाल्यावर मोठी



# एक निग्रो कथा

मूळ लेखिका : किकी उवेचिया (नायजेरिया)
मूळ कथेचं शीर्षक : बिग मॅमा
मराठी अनुवाद : रवींद्र पिंगे

आई बारमधल्या सोफ्यावर एकटीच बसली होती. दुपारची वेळ होती आणि तिचं विणकामाचं साहित्य तिने पुढ्यात घेतलं होतं. ती समाधानाने म्हणाली, आज मला इतकं बरं वाटतंय म्हणून सांगू; बऱ्याच दिवसात इतकं बरं कधी वाटलं नव्हतं बाई. ते काही नाही, मी आता येत्या रविवारी चर्चमध्ये जाते नि पुन्हा एकदा चांगले सुखाचे दिवस दाखवल्याबद्दल देवाची प्रार्थना करून येते. तिचं विणकाम चालूच होतं. गिऱ्हाईकांची ये-जाही सुरूच होती. कुणी बियर पिई, कुणी व्हिस्की. कुणी तिच्या आवतीभोवती पिरंगत खाद्यपदार्थांचा चट्टामट्टा करीत. जे जास्ती पैसे खर्च करीत त्यांची ती लडिवाळपणे विचारपूस करी. काय, कसं काय ? ठीक नं ? मी येत्या रविवारी चर्चमध्ये जाणाराय. तू येशील ? ये की. नि नंतर माझ्याबरोबरच पार्टीला पण ये. चर्चहून परतल्यावर मोठी आई नेहेमी पार्टी द्यायची.

थोडा वेळ गेल्यावर ती ऑन्टीला म्हणाली, 'दमल्यासारखं वाटतंय ग मला. काळजी करून करून माझा जीव नुसता पिंजला. मरणार ग, मरणार एक दिवस. जरा मला हात दे पाहू तुझा. मला माझ्या खाटेवर ने.'

तिने ऑन्टीच्या खांद्यावर हात ठेवून आधार घेतला. ऑन्टीने तिला आस्ते आस्ते ओढीत, ढकलीत माजघराच्या दरवाज्याजवळ आणलं. त्या अरुंद दरवाज्यातून दोघींनी एकदम घासटून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांना ते जमलं नाही. त्या तिथेच एकमेकीला ढकलीत राहिल्या. ऑन्टीला चांगलीच धाप लागली. तिने गोंधळून मोठ्या आईकडे पाहिलं. मोठ्या आईने हतबल नजरेने ऑन्टीकडे पाहिलं. इतक्यात बारमधल्या त्या तीन कळसूत्री बाहुल्या एकाएकी जीवंत झाल्या. त्यांनी ती लठ्ठ बायांची झोंबी सोडवली आणि मोठ्या आईला मोठ्या विजयी भावनेनं पलंगाकडे नेलं.

थोडा वेळ गेला असेल नसेल, तिथे पलंगावरच मोठ्या आईने प्राण सोडले. जाता जाता ती गडबडून बरळली, 'ये ग बाये ये. मी निघाले हो. न्यायला देवदूतांची पालखी आल्येय.'

ऑन्टी धावली. गिऱ्हाईकं धावली. त्या तिघीजणीही धावल्या. सताड उघडे डोळे. अरे, मरण ? हा काय चमत्कार आहे ? कुणालाच काही कळेना.

माझी वेळ भरत आल्येय. काळजी करून करून हा जीव जाणार ग जाणार. छे–छे. असं कसं होईल ? मोठ्या आईच्या थंडगार अंगावर ऑन्टीने लोळण घेतली. नाही रे देवा, नाही; मला एकटीला नाही सोडणार ती असं. त्या तिघीजणी सैरावैरा पाहू लागल्या आणि मग एकमेकींकडे गांगरून, डोळे विस्फारून पाहू लागल्या. नसेल ग, ती गेली नसेल; आपल्याला बनवत्येय ती.

रात्री टेलिफोन खणखणला तसे आम्ही चौघेही जागे झालो. बाबा, आई, मी स्वतः नि ताई. प्रथम मला जाग आलीच नाही. ताई अगोदर उठली. तिची अशीच घाबरगुंडी उडते. रात्री टेलिफोनच्या तारा धड नव्हत्या. त्यामुळे प्रथम म्हणे ऑपरेटर्सची किटकीटच ऐकू येत होती. म्हणे, हे लोक रात्रीचे का जागे करतात कळत नाही, वगैरे. बाबांनी घसा साफ केला नि ऑपरेटर्सना फैलावर घेतलं. म्हणाले, लेको, भांडता कसले ? रात्रीचे फोन देणं तुमचं कामच आहे. न कुरकुरता तुम्ही ते केलं पाहिजे. हॅलो-हॅलो, अरे, मला धड ऐकू तर द्या. मग भांडण बाजूला ठेवून नीट ऐकू लागले. काही मिनिटं ऐकून घेतल्यावर त्यांचा आवाज एकदम बदलला. देवा ! काय सांगता काय ? खेळ खलास ? एकदम खलास ? खरंच वाटत नाही हो. मोठ्या आईचं अखेर असं झालं ? तेही खरंच आहे म्हणा. जशी देवाची इच्छा, दुसरं काय ? बराय. ठीक आहे. अच्छा. बाबांनी टेलिफोन ठेवला. दिवे मालवले नि देवाचं नाव पुटपुटत ते आपल्या बिछान्याकडे वळले.

ताईची तर नुसती भंबेरीच उडाली. ती थेट माझ्या अंथरुणात घुसली नि पांघरूण डोक्यावरून घेऊन थरथरू लागली. मला तिनेच ढोसून ढोसून उठवलं. म्हणाली, मोठी आई वारली. तिचं आता भूत होणार नि आपल्याला टा–टा करायला येणार. नक्कीच. अंगाची तिने घडी केली नि मला घट्ट बिलगून राहिली. तिचा घाम माझ्या अंगाला चांगलाच लागला म्हणून मी तिला दूर लकटलं. पण जितकं लकटावं तितकी ती अधिकच बिलगू लागली. स्फुंदू लागली. म्हणे, मोठ्या आईचं भूत होणार नि आपल्याला टा–टा करणार. मला सारखी मिठ्या मारी. मी लकटे. काळोखात तिचा कान माझ्या हातात आला. मी तो पिरगळला. पण ती काही दूर सरेना की मिठी सोडीना. उलट, ती अधिकच थरथरू लागली. मग माझीही धडधड सुरू झाली.

झालं. आई बाबा आमच्या खोलीत आले बाबांचा चेहेरा गंभीर दिसत होता. आईचे डोळे तारवटले होते. दुःखाची बातमी सांगायच्या तयारीने ती दोघं आली होती. पहातात तो आम्ही भीतीने ओलचिंब होऊन कुडकुडतोय. बाबा आले तसे गंभीरपणे निघून गेले. आई मात्र उसासे काढू लागली. आम्हीही तसे तिच्यासारखेच हुंदके द्यावेत अशी तिची इच्छा दिसली. पण ताईने मोठ्याने गळा काढला. आई, मोठ्या आईचं भूत आपल्याला टा–टा करणार काय ग ? आम्हाला

हुंदके येईनात. तेव्हा आईने सांगितलं : हे बघा, आज जिने प्राण सोडले ती माझी सख्खी आई नि तुमची आजी आहे. लक्षात ठेवा. ती भूत होऊन आपल्या बाळांना घाबरवणार नाही. त्यातली ती नव्हतीच मुळी. तेव्हा मी सांगते तसं वागा नि करा. आता वाईट गोष्ट घडल्याय नं ? मग आता रडा पाहू तुम्ही.

एवढं बोलून तिने दे-दे हुंदके दिले नि हुंदके देत देतच ती आपल्या निजायच्या खोलीत गेली. आम्ही होतो. तिथेच भीतीने थरथरत राहिलो. नाही नं तिचं भूत येणार आम्हाला टा–टा करायला ? की येईल ?

सकाळ झाली तशी आईने आम्हाला अंथरूणातून अक्षरशः ओढून काढलं नि आमचा नट्टापट्टा करायला सुरुवात केली. बांगड्या, अंगठ्या, माळा, गोफ, डूल, सारं काही काढलं. जेव्हा सगळं ठाकठीक झालं तेव्हा आम्ही दोघंजणं ख्रिसमस ट्रीसारखे लखलखून निघालो. मात्र वस्तु हरवू नयेत म्हणून आम्हाला कुठं हलता येईना.

आईने काळा झगा घातला आणि ती ड्रायव्हरच्या नि बाबांच्या मधोमध कोंबून बसली. आमच्या बाबांची स्टेशन वॅगन होती. कबरस्थानात वगैरे जायला आम्ही तीच वापरायचो. गाडीच्या मागच्या सीटा काढून टाकलेल्या होत्या. तिथें कागद अंथरून आम्ही मुलांची बसा–झोपायची सोय केलेली होती. गाडीने गचके खाल्ले नि ती एकदम घडघडत सुरू झाली. त्या अगोदर आईने मागे वळून आमच्याकडे रडवेल्या तोंडाने बघून घेतलं. काही कागदी रुमाल आमच्याकडे भिरकावले. तुम्हाला रडावसं वाटलंच, तर आपले जवळ असलेले बरे.

मोठ्या आईला प्रथम आंघोळ घातली. मग सजवली. तिच्या लग्नात तिने वापरले होते तेच कपडे घालून तिला माजघरात ठेवलं, माझ्या आजोबांची नि मोठ्या आईची फारकत झालेली होती. शेजारच्या गावात एक खराब नायकीण राहायची. आजोबा तिच्याच घरी असायचे.

आता आपल्या मेलेल्या बायकोला बघायला आजोबा आले. म्हणतात, त्यांनी घराची पायरी सोडल्या दिवसापासून आज ते पहिल्यांदा उगवले. ते ठेंगणे ठुसके, झकपक कपड्यातले, रीतीचं वागणारे, असे होते. त्यांनी आल्याबरोबर हॅट काढून हातात घेतली. मोठ्या आईकडे बघितलं. पहा, कसं तेज फुलून आलंय. आमच्या लग्नाच्याच वेळचा पोशाख हा. तेव्हाही अशीच सुंदर दिसली होती. पण, प्राण जायच्या अगोदर तुम्ही मंडळींनी मला वर्दी का नाही दिली ? ऑन्टी किंचाळली, तुम्हाला ? तुम्हाला वर्दी द्यायची ? बायकोचा नवरा नि मुलांचा बाप ह्या दोन्हीकडून तुम्ही नालायक आहात ? पाजी–बेशरम. मग त्या दोघांची खूप गरमागरमी झाली. मध्ये मोठ्या आईचं प्रेत. एका बाजूला ऑन्टी. दुसऱ्या बाजूला आजोबा. चांगलीच जुंपली. डुक्कर–ए जाडये–हो, हो. तूच डुक्कर. बापाला डुक्कर म्हणतेस ? हो, हो. डुक्कर नाही तर काय ? थोडा वेळ गेल्यावर आजोबा म्हणाले, 'मला तिला काही सांगायचं होतं. तिलाही मला काही सांगायचं असेल. आम्हाला आपापसात काही बोलायचं होतं. आणि हे सर्व तिचे प्राण जायच्या आधी होणं अगत्याचं होतं. आपल्याला काही काही बाबी नीट समजून सांगायच्या असतात. क्षमा मागायची असते. जुन्या आठवणी उगाळायच्या असतात. काही गोष्टी फार नाजूकही असतात. बरं, नवरा बायकोचं नातंच असं असतं की नवऱ्याला नेहमीच बायकोला नीट काहीतरी समजून सांगायचं असतं. हो नं ? मग तिचे प्राण जायच्या अगोदर तुम्ही मला का नाही निरोप पाठवलात ? ऑन्टी आजोबांच्या मानाने चांगलीच धिप्पाड होती. तिने आजोबांचे हात पकडले नि त्यांना ढकलीत ढकलीत आतल्या खोलीत नेलं. तुला निरोप पाठवायचे काय ? थांब. अगोदर आत चल नि मर्तिकाच्या खर्चाचं काय ते बोल मुकाट्याने.

कुणी पैशांची गोष्ट काढली की आजोबा गरम होत. तशात मर्तिकावर पैसे खर्च करणं हे त्यांच्या लेखी पैसे उधळण्यासारखंच होतं. त्यांनी आपलं टक्कल पडलेलं डोकं खाजवलं, चुळबूळ केली, थातूर मातूर केलं नि शेवटी निर्णयाचं सांगून टाकलं, सर्व काही तडीस गेलं की हिशोब करून मला पक्का आकडा सांगा. सांगाल त्याचा आठवा हिस्सा माझ्याकडे लागला. म्हणजे, मी द्यायचा प्रयत्न करीन. कारण तुम्हाला ठाऊकच आहे. माझा दुसरा संसारही आहेच. आणि तिथेही काही खुट्‌ होणं अशक्य नाही. तेव्हा आपलं सांगून ठेवलेलं बरं. हे ऐकून ऑन्टी पिसाळली नि खुर्चीत कोसळली. तिथूनच कडाडली 'डुक्कर रे, तू डुक्कर.' त्याला आठवणही करून दिली तिने की ती छोटी होती तेव्हा एकदाही कधी त्याने तिला फिरायला नेलं नव्हतं आणि तोच मुडदा आता त्या बयेच्या कुत्र्याला पट्टा घालून रपेट करून आणतोय. थू: बाप म्हणूनही डुक्कर नि नवरा म्हणूनही डुक्कर. खूप झालं. त्यांना निसटायचं होतं. त्यांनी खिशातून एका पाऊंडाची नोट काढली आणि तिच्याकडे भिरकावली. हॅट चढवली दाराकडे वळले. जाता जाता म्हणाले बस; इतकंच देणं लागतो मी तुमचं. आता यापुढे माझ्याकडून काहीही मिळणार नाही. फुलं, चर्चची फी, दफनाचा खर्च, सारं काही ह्या पैशात आलं. नंतर तडक निघाले. जाता जाता एवढं बारीक म्हणाले की जमल्यास दफनविधी तासभर उशिरा करता आला तर पहा. कारण त्यांच्या त्या दुसऱ्या घरात कांही महत्त्वाचं काम निघालं होतं नि त्यामुळे त्यांना दफनाला अगदी वेळेवर हजर राहणं जमण्यासारखं नव्हतं

आजोबा बारमध्ये गेले. तिथेही दुःखाची कळा पसरलेली होती. त्या रिकाम्या जागेत त्या तिघीजणी त्यांच्या ठराविक जागा पकडून उभ्या होत्या. पहिली काऊंटरजवळ होती. दुसरी लाकडी खुर्चीत टेकली होती. तिसरी बियरच्या बाटल्याजवळ उभी होती. आपले लालेलाल डोळे त्यांनी आजोबांकडे रोखले. आजोबांनी मान हलवली. आत फार उकडत होतं. माशा घोंघावत होत्या. त्यांनी बर्फाच्या घमेल्यातून एक बियरची बाटली उपसली नि उघडली. इतक्यात एक माशी त्यांच्या नाकावर बसली. बाटली घटाघटा प्याले. मग ती होती तिथे ठेवून दिली. त्या तिघींशी थोडीशी बातचीत केली. मोठ्या आईनं असं जावं म्हणजे किती दुःखाची गोष्ट आहे. आजच जाईल अशी कल्पनाच नव्हती. बाकी चेहऱ्यावर तेज मात्र फुललंय हं. तो आमच्या लग्नातला पोषाख आहे. त्या तिघींनी त्यांच्या बोलण्याकड चक्क दुर्लक्ष केलं. संपल्यावर ते उठून दरवाजाकडे गेले. तिनं असं जावं ही केवढ्या खेदाची गोष्ट बरं. कुणाच्या ध्यानीमनीसुद्धा नसेल. एक कामकरीण उद्‌गारली : मूर्ख–शतमूर्ख. आणि त्या तिघींनाही एकदम रडू फुटलं.

मोठ्या आईवर अत्तर शिंपडण्यात आलं. खोलीभर फुलांची आरास मांडली. ताई नि मी मोठ्या आईच्या पायथ्याला उभे राहून मोठ्या

आईच्या नाकात कोंबलेल्या कापसाच्या गोळ्याकडे आणि गळ्या-भोवती बांधलेल्या गळपट्ट्याकडे पाहू लागलो. तिचं तोंड उघडं राहू नये म्हणून तो गळपट्टा गच्च आवळला होता. ऑन्टी आणि आई एकमेकींना बिलगून मोठ्या आईच्या पलंगावर दुःखवेगाने कोसळून पडलेल्या होत्या. बाबांनी कॅमेऱ्याने त्यांचे खूप फोटो काढले. जरा वेळ गेला की नवा फोटो. इतक्यात ताईला झटका आला. तिने मुठी आवळल्या नि ती ताठ झाली. तोंड वेडवाकडं करायला लागली. नशीब आईच्या लक्षात आलं. तिने एकदम ताईला ओढलं नि दूर नेलं, नाहीतर तिने नक्कीच कपड्यावर आणि पायावर ओकून ठेवलं असतं.

बाहेर बघ्यांची गर्दी जमली होती. लोक आपापसात निरनिराळ्या मर्तिकांच्या तुलना करीत होते. तुम्हाला काय वाटतं, ही मंडळी मर्तिकावर भरपूर खर्च करतील? शक्य आहे. पण कुणी सांगावं, कदाचित अळंटळंही करतील. आपल्याला कळेलच म्हणा.

एका काळ्या, काटकुळ्या मुलीने खांद्यावर घेतलेलं मूल जरा उंच धरलं होतं कारण गर्दीतून तिला नि त्याला मर्तिकाचा देखावा नीट पहायचा होता. गर्दीतल्या मंडळीत ती उठून दिसली, कारण तिच्या खांद्यावरलं मूल इतकं गोरं होतं की ते अक्करमाशी असणार ह्यात शंकाच नव्हती. ते अक्करमाशी मूल गर्दीला कंटाळून खांद्यावर चुळ-बुळ करू लागलं. म्हणून त्याला खाली जमिनीवर सोडलं. ते मातीत किल्ले बांधू लागलं. ती काळी तरुणीही सिमेंटच्या ओटयावर बसली. वांबूच्या बॅगेतून तीने आपलं विणकाम काढलं नि ते करण्यात ती गढून गेली. घरातून विव्हळल्याचे आवाज आले की ती तेवढ्यापुरती मान वर करी.

थोडया वेळातच दोघी कामकरणी बाहेर पडल्या. बिअर, व्हिस्की, जीन आणि प्रेत ह्यांचा संमिश्र भपकारा त्यांना आत सहन होईना. त्या दोघींपैकी एकीने त्या काळ्या तरुणीला विचारलं, तू त्या मुलाची दाई ना ग? काळी तरुणी संतापली नि शिष्टपणाने हसली. हट्, मी आई आहे त्याची. एवढं बोलून ती परत आपल्या कामात गढून गेली. मात्र ती अशा अविर्भावाने विणकाम करू लागली की ते पाहून ती वरच्या कुळातलीच असावी असा आमचा सर्वांचा ग्रह झाला. दुसऱ्या कामकरणीने तिच्याकडे थुंकून मत्सराने पाहिलं नि मग म्हणाली, अग, ती गोऱ्यावरोबर झोपत असेल, दुसरं काय? गोऱ्याकडून पोर हवीत नं? गोराच आवडायचा असल्या बयेला. मी आणि ताईने त्या काळ्या तरुणीकडे मोठ्या कौतुकाने पाहिलं कारण गोऱ्या माणसा-बरोबर संग करू शकणारी आम्ही पाहिलेली ही पहिली काळी बाई. आम्हाला कौतुक वाटतंय हे तिनेही ओळखलं. शांतपणे तिने सांगितलं, मी गोरा खलाशी गाठून त्याच्यावरोबर कॅनरी बेटावर जाते. तो मला तिथे ह्या अशा बॅगा घेऊन देतो. हे सांगत असतांना तिने आपली बांबूची बॅग उंच करून आम्हाला दाखवली. आणि मग ती हसली.

दोन माणसं मोठ्या तावातावाने बोलत होती. एक भिंतीला टेकून उभा होता. दुसरा बारच्या दरवाजाला धरून. भिंतीला टेक-लेला माणूस जास्त बोलत होता. दुसरा माणूस उत्तरादाखल फक्त हं हं करीत होता. भिंतीला टेकलेला माणूस ठासून सांगू लागला, अरे, माझी वस्तीच मुळी कबरस्थानाजवळ आहे. मी सारखा विनाशच पाहात असतो. आता पाहून पाहून त्या विनाशाचासुद्धा कंटाळा आलाय बघ. मी सांगतो ते लक्षात ठेव, माणूस म्हणजे विनाश, माणूस म्हणजे माती. दिवसाढवळ्या ऐकावं, लोकांचं ऊर बडवणं चालू असतं. रात्री ऐकावं तरी रडारड आहेच. माणसं कण्हत अस-तात. रडत असतात, स्फुंदत असतात. माणूस म्हणजे इथून तिथून रडारड. ना चव, ना चौथा. दरवाजा जवळचा माणूस उत्तरला, होय; अखेर माती मातीलाच मिळते. बायबलमध्येसुद्धा सांगितलं म्हणे, माणूस म्हणजे अंती मातीच.

घरामागच्या सफरचंदाच्या झाडाखाली चार तरुणांनी खड्डा खणला. प्रेताची आणि ते घेऊन येणाऱ्या घोळक्याची ते हातात फावडी घेऊन वाट पहात होते. मंडळींनी मोठ्या आईला घरातून उचललं आणि बागेत तिच्यासाठी खणलेल्या कबरीत तिला ठेवलं. ऑन्टी धाय मोकलून रडू लागली. हातवारे करू लागली. त्या कबरीतच तिला शिरायचं होतं. पण एका तरुणाने तिला अडवलं आणि बळे बळे दूर नेलं. ते तरुण कबरीत माती टाकून ती बुजवू लागले. आई ते पाहात होती. पुढे वाकून पाहू लागली. तिचे डोळे लकाकू लागले. मधूनच जीभ बाहेर काढी. मातीचा ढीग कबरीत पडला की ती भीतीने डोळे गच्च मिटून घेई. माझा दंड करकचून पकडी. एक वेगळीच छटा तिच्या चेहेऱ्यावर पसरे. कामकरणींनी गळा काढला. मोठ्या आई गेल्या हो. कायमच्या, कायमच्या गेल्या. ते तरुण कबरीत माती ढोसू लागले. ताई भिऊ लागली, कामकरणी स्फुंदू लागल्या. ऑन्टी आकांत करीत कबरीत उडी मारण्यासाठी झेपावू लागली. बाबांना एकाएकी झटका आला. त्यांनी एकाच्या हातातलं फावडं हिसकावून घेतलं आणि कबरीत मातीचे ढीग टाकायचा त्यांनी तडाखा लावला. मंडळींना मोठं कौतुक वाटलं.

दफन संपल्यावर ताई नि मी अगदी दमून गेलो. आता आणखी अधिक रडण्याची शक्तीच उरली नव्हती. म्हणून आम्ही बारमध्ये कामकरणींच्या आजूबाजूला पिरंगू लागलो. आम्ही त्यांच्याकडे पाहिलं. त्यांनी आमच्याकडे पाहिलं. पण हसण्याचं नाव नाही. शेवटी ताईने माझ्या मांडीवर डोकं टेकलं नि ती गाढ झोपी गेली. ऑन्टीचे मुळूमुळू रडणं मला ऐकू येत होतं. आई पडलेल्या आवाजात शेजार-णीशी बोलत होती. माणसं पांगत होती. बाबा आले. त्यांनी ताईला उचलून मोटारीत ठेवलं. आमची नीट सोय लागल्यावर त्यांनी मोटारीचं दार बंद केलं. ताई गाढ झोपलेली होती. ड्रायव्हर कुरकुरत आला, कारण त्याला दफनविधी अगदी शेवटपर्यंत पहायचा होता. आणि आता तर आम्हाला घरी पोहोचविण्यासाठी त्याला अर्ध्या-वरूनच निघावं लागलं होत. त्याने गाडी दणक्यात सुरू केली. उतरंड मिळाल्यामुळे गाडी भुर्कन निघाली पण शंभर यार्ड पुढे जातो न जातो तोच ती थांबली. परतणारा जमाव आता आमच्या भोवती जमा झाला. ड्रायव्हर उतरला. त्याने हँडल काढलं नि गाडीच्या पुढच्या भोकात घातलं नि तो ते जोरजोरात फिरवू लागला. लोक चेकाळले. उड्या मारू लागले. टाळ्या पिटू लागले. हाण, लेका हाण. ड्रायव्हर पण जोरजोरात हाणू लागला. मग एकदाचं इंजीन फुरफुरू लागलं. गाडी थरथरू लागली. जिवात जीव आला. ड्रायव्हरने मग हँडल काढून घेतलं आणि आत पायापाशी फेकलं. तो स्वतः येऊन बसला आणि मग हात हलवून त्याने गर्दीचा निरोप घेतला. हाण, लेका हाण. गाडी धूम धावत सुटली. माझा डोळा लागला.

जागा झालो तेव्हा काळोख होता. मी आपल्या पलंगावर होतो. बाबा दाराजवळ उभे होते आणि आई ताईच्या बिछान्यावर वाकली होती. अग झोपू दे ग तिला, झोपू दे. बाबा सांगत होते पण आई ताईला हलवून जागी करीत होती. नालायक, कुठे भरकटली होती कोण जाणे; कानातले डूल मात्र हरवून टाकलेन. काय ग, अग तुझे डूल कुठे आहेत? ती ताईला गदागदा हालवू लागली. ताई फक्त कुरकुरे कारण तिच्या डोळ्यावर झोप होती. मग बाबा पुनः पुन्हा सांगू लागले, अग झोपू दे ग तिला; झोपू दे. □ □

# महेश एलकुंचवारांची 'कैफियत'

## नाट्यसार

[ उघड्या रंगमंचावर 'कैफियत'चा सेट मांडण्यात आला आहे. सेट पाहून, हा 'कोर्ट ड्रामा' आहे हे प्रथम दर्शनीच लक्षात येते.

सभागृहातील दिवे एकदम मालविले जातात. सभागृहातील कुज-बुज लगेच थांबते आणि त्याचबरोबर क्षणभराने दिवे परत लागतात.

सभागृहातूनच एकांकिकेची सुरुवात होते. थोडे मोठ्याने बोलणे. थोडी कुजबूज. ]

**पहिला प्रेक्षक :** अहो-शुक-इकडे. इकडे या.

**दुसरा :** केव्हा आलात ?

**पहिला :** केव्हा काय ? केव्हाचा आलोय. तुमची जागा धरून ठेवली आहे. म्हटलं येताय की नाही ?

**तिसरा :** बस चुकली.

**दुसरा :** मला काळजीच लागली होती. म्हटलं, उशीर होतो की काय ? फार Interesting case, नाही ?

**पहिला :** भयानक आहे हो !

**चवथा :** काही खास भयानक नाही.

**पहिला :** काय, काही हृदय बिदय आहे का नाही तुम्हाला ? पाच वर्षाच्या अर्भकाचा खून-

**पाचवा :** अर्भक म्हणजे अगदी लहान मुलाला म्हणतात ना हो ?

**दुसरा :** तेच हो. पण एकूण राक्षसीच काम !

(त्याचवेळी आणखी काही प्रेक्षक कलावंत सभागृहात येऊ लागतात.)

**चवथा प्रेक्षक :** या पहा निर्मलाबाई. दुर्दैवी बिचारी !

**दुसरा प्रेक्षक :** या कोण ?

**चवथा प्रेक्षक :** अहो ही आजच्या आरोपीची बायको.

एव्हाना सरकारी वकील, आरोपी वगैरे मंडळी रंगमंचावर आलेली आहेत. निर्मला प्रेक्षागृहात बसली आहे. आरोपीला पिंजऱ्यात उभं करण्यात येत. एकदम दबलेली स्तब्धता.

आणि इथून नाट्याला खरी सुरुवात होते.

**सरकारी वकील :** आरोपी राजेश्वर-एक्स्यूज मी, माय लॉर्ड-वडिलांचं नाव नाही-आडनाव नाही-ही ईज् अॅन इलिजिटिमेट् चाइल्ड.

**आरोपी :** आय् अॅम् नो मोअर् अ चाइल्ड !

**न्यायाधीश :** ऑर्डर ! ऑर्डर !

**स. वकील :** वय तीस-याच्यावर, गोपाल-वडिलाचे नाव नाही-त्यामुळे आईचे नाव गोपाल रूपा मेहेरा, वय वर्ष पाच याचा १० डिसेंबर रोजी, भर दुपारी, अंगावर कात्री जागोजाग भोसकून खून केल्याचा आरोप ठेवण्यात येत आहे. हा आरोप पुराव्यानिशी सिद्ध करण्याची सरकारची तयारी आहे. आवश्यक तो पुरावा कोर्टासमोर ठेवण्यात येईलच.

**न्यायाधीश :** आरोपीला त्याच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपा-बाबत काय म्हणायचं आहे ?

**आरोपी :** जी गोष्ट अगदी ढळढळीत स्वच्छ आहे, ती मारे पुराव्यानिशी वगैरे सिद्ध करण्याची आयाऊ उठाठेव सरकार कशाला करतं आहे ? मी गोपूचा खून केला ही गोष्ट कधीच नाकारलेली नाही. पण ते पुराव्यानिशी वगैरे सिद्ध केल्याचं समाधान तुम्हाला हवं आहे ना ? सोईचे नि दिसणारे, सगळेच पुरावे तुम्ही उपयोगात आणणार असाल ?

**न्यायाधीश :** आरोपी फार बोलतो.

**आरोपी :** माझ्या स्वभावातल्या गुणदोषांचा न्यायनिवाडा करण्या-साठी तुमची नेमणूक झाली आहे का ?

**न्यायाधीश :** आरोपीनं उद्धटपणानं केलेल्या कोर्टाच्या बेअदबी-बद्दल त्याला शिक्षा होऊ शकते, हे त्याला माहीत आहे ना ?

**आरोपी :** आरोपीला एक सारखं ये-जा असं संबोधून न्यायाधीश त्याची एकसारखी बेअदबी करीत आहेत. त्याबद्दल न्यायाधीश महाराजांना कोण शिक्षा करणार ?

**न्यायाधीश :** ऑर्डर ! ऑर्डर !

**आरोपी :** डिस ऑर्डर ! (प्रेक्षागारात कुणीतरी हसते त्याला संतापून) हा विनोद नाही !

**प्रेक्षक :** ही मस्ट बी मॅड !

„ ही ईज !

„ छे हो व्हिलन आहे पक्का !

**आरोपी :** माझा न्यायनिवाडा करण्याची कोणाचीही लायकी नाही ! कोणाचाही अधिकार नाही !

**न्यायाधीश :** सात दिवस सक्तमजुरीची सजा आरोपीला या पुढच्या बेअदबीबद्दल फर्माविण्यात येईल. मि. प्रॉसिक्यूटर, यू मे प्रोसीड.

**स. वकील :** या खटल्यातला पहिला साक्षीदार-लछमन.

लछमनच्या नावाचा दुबार पुकारा होतो. प्रेक्षकातून लछमन येतो. पिंजऱ्यात जाऊन शपथ घेतो. आणि एकेकाच्या साक्षीला-उलट तपासणीला सुरुवात होते.

कुणा एका कोळके गुरुजी नावाच्या समाजसेवकाच्या अनाथा-श्रमात वाढलेल्या राजेश्वर नावाच्या, गर्भित विकृतीने पिसाटलेल्या

चित्रकाराची ही 'ट्रॅजेडी'. त्याच्या खऱ्या आईवडिलांचा पत्ता नसतो. जन्मतःच त्याला रस्त्याच्या कडेला फेकून दिलेले असते. कोळके गुरुजी त्याला उचलून आणतात. त्याला आईचे प्रेम देतात. वडिलाची माया लावतात. त्याचं नाव ठेवतात राजेश्वर! तो चित्रकार होतो.

पण आपण पोरके आहोत. स्वतःच्या वासनेची खवखवणारी भूक भागविण्यासाठी कुणा तरी स्त्री-पुरुषाने आपणास जन्माला घालून उकिरड्यावर फेकून दिले, हे शल्य त्याच्या मनास सतत सलत असते. त्यातच उकिरड्यावर फेकून दिलेले जनावरागत जीव विकत घेऊन अगाऊ मानवता दाखविणारे कोळके गुरुजी त्याच्या दृष्टीने एक तिरस्करणीय व्यक्ती असते.

न्यायालयात, निर्मला त्याच्यावर सरळच आरोप करते की, 'गोपूचा खून तुम्ही केलात. गोपू मेला नाही. तुम्ही ठार मारलंत त्याला'. त्यावेळी अगतिक होऊन राजेश्वर म्हणतो, 'मला का नाही कुणी ठार मारलं? ज्या कात्रीने माझी नाळ कापली, त्याच कात्रीचे घाव माझ्यावर का नाही घातले कुणी?'– कुठंतरी दूरवर हरवल्यागत तो बोलू लागतो–नजरेसमोरचं हळूहळू फिकट होऊ लागतं. लांबून मुलांनी म्हटलेल्या प्रार्थनेचे सूर त्याच्या कानावर येऊ लागतात. सरकत सरकत, अनाथाश्रमाची इमारत त्याच्या नजरेसमोर येते. जिथे तो वाढला होता आणि त्याचवेळी कुणाचा तरी कापरा हस्तस्पर्श त्याला होतो. कोरके गुरुजी त्याला प्रेमाने गोंजारत असतात. त्यांना बघताच, झुरळाला झटकावं तसं त्यांचा हात झटकून तो बाजूला होतो, 'का आलात माझ्या आयुष्यात?'

**कोरके गुरुजी** : वेड्या, असं दुःखी होऊ नये.

**राजे.** : कोण होते माझे आई-वडील? कोण होते हे लोक?

**को. गु.** : वेड्या अरे देवच आपले सर्व काही बरं!

**राजे.** : कोण कुठला देव–

**को. गु.** : माता-पिता-बंधू-सखा सगळं तोच बरं. आणि अरे. मी नाही का तुला? आ? ये असा ये माझ्याजवळ.

**राजे.** : तुम्ही माझ्या अंगाला हात लावू नका.

**को. गु.** : असं वागू नये रे.

**राजे.** : तुम्ही दूर व्हा कोरके गुरुजी.

**को. गु.** : अरे मी तुला वडिलासारखा–

**राजे.** : तुम्ही भयंकर आहात! घाणेरडे आहात!

**को. गु.** : अरेरे! काय ही कृतघ्नता रे! अरे रस्त्यावरून उचलून आणले ना मी तुला–

**राजे.** : ही नसती उठाठेव कुणी सांगितली होती तुम्हाला? अशी अगाऊ मानवता दाखवून काही माणसं जन्माची विकत घेण्याचा अधिकार काय तुम्हाला? मला ज्या क्षणापासून कळू लागलं, त्या क्षणापासून तुम्ही दिसला, की रक्ताचा घोट गिळावा लागत असे मला. दया दाखवताहेत! कशाला? कशाला?

**को. गु.** : कायरे हा विपर्यास, आं? काय हे? तुम्हा सगळ्यावर मायेची पाखर घालीत आलो सतत. लोक म्हणत मुलांना खरीखुरी आई भेटली.

**राजे.** : रोज नवीन मुलांना पांघरुणात घेऊन झोपणारे. तुम्ही बाई असता ना, तर आमच्या सारख्या बेवारशांची वीणच्या वीण वाढवली असतीत.

**को. गु.** : राजू–

**राजे.** : राजेश्वर म्हणा! राजेश्वर! बायकासारखे राजू राजू करू नका!

**को. गु.** : हे नाव तरी मीच नारे दिलं तुला?

**राजे.** : नाव दिलं नसतं तरी काय बिघडणार होतं विशेष! दुनियेला तरीसुद्धा माझी दखल घ्यावी लागली असती. माझ्या अस्तित्वाचा जळता डाग तुम्हा सगळ्यांच्या चेहऱ्यावर उठवल्याशिवाय मी मरणार नाही! समजलं? समजलं?

'ऑर्डर! ऑर्डर',

न्यायाधीशाच्या आवाजामुळे, आवेशाने मुठी आपटीत, भ्रमात असल्यागत, बरळत असलेला राजेश्वर भानावर येतो.

'साक्षीच्या कामात एकसारखा आरोपी अडथळा आणीत आहे, याचा कोर्टाने विचार करावा', सरकारी वकील, न्यायाधिशाच्या आवाजात राजेश्वरकडे तुच्छतेने बघत सांगतो.

प्रेक्षकातून गडबड ऐकू येते– 'बडा तय्यार नट आहे हो! चेहऱ्यावरचं दुःख पहा त्याच्या–'

'ही ईज अ ग्रेट पेन्टर!'

राजेश्वर परत स्वतःला सावरून बसतो. सर्वांकडे तुच्छतेने बघत.

–कोर्टाचं काम पुढे सुरू होतं.

अनुक्रमे लछमन आणि निर्मला यांची साक्ष आणि उलटतपासणी कोर्टापुढे होते.

–लछमन, हा राजेश्वरचा नोकर. खरं तर तो रूपाचा नोकर होता. रूपा–राजेश्वरची सुंदर मैत्रीण. श्रीमंत–गर्विष्ठ. राजेश्वरला एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणे वागविणारी–राजेश्वर तिच्या रूपावर भाळतो. पागल होतो. तिला आपलीशी करण्यासाठी धडपडू लागतो. रूपा, त्याला सतत मांजराने उंदराला खेळवावं तसं खेळवीत असते. 'हाय् माऊस्!' 'माय् स्विट लितल् माऊस्!' 'राज, तू सुंदर आहेस. पण सिकर्निंग एकदम! एखाद्या हिरव्या बुळबुळी सापासारखा!'

**राजे.** : शटअप्!

**रूपा** : (खळाळून हसत) चिडलास? माऊस!

**राजे.** : मला फार खेळवलंस, झुलवलंस.

**रूपा** : तू का झुललास पण, यू फूल? मला गंमत वाटत होती. एक तर मी अतिशय कंटाळले होते. पपू दिवसभर शिकारीसाठी बाहेर राहायचे. व्हॉत् कुद आय दू वुइथ ताइम्? तू भेटलास तेव्हा वाटलं, चला, नॉत अ बॅद बॉय. आणि तू माझ्या प्रेमात पडलास! असं सांगू लागलास तेव्हा तर–यू सी–इत वॉज ग्रेत फन्.

**राजे.** : प्रेम म्हणजे काय ते तुला कधीच कळणार नाही!

**रूपा** : पण त्याची एवढी गरज काय? तू असं बोलतोस की प्रेम म्हणजे ऑक्सिजन आहे किंवा जेवण.

**राजे.** : खन्नालासुद्धा गंमतीसाठी खेळवीत होतीस वाटतं?

**रूपा** : (हसून) स्टिल् जेलस्?

**राजे.** : (तुच्छतेने) जेलस! खन्नाला पाहिलं आहेस एवढ्यात? दॅट पॉपस ॲस! त्याचं पोट सुटलं आहे. आंबलेल्या आटयासारखं. पॅटमधून भसदिशी बाहेर येत असतं. त्याची बायको लस्सी पिऊन पिऊन सोकावलेली–

**रूपा** : जेलस! यू ऽ र स्तिल जेलस मॉशेरी!

–सारखं रूपा त्याला डिवचीत असते. हे सर्व असह्य होऊन एक दिवस राजेश्वर रूपावर बलात्कार करतो आणि इंग्लंडला पळून जातो. रूपा गरोदर रहाते. त्यातच मेहेरा नावाच्या व्यक्तीशी तिचं लग्न होतं. मेहेराला जेव्हा समजतं की, रूपाला दुसऱ्यापासून दिवस गेलेले आहेत, तेव्हा तो आत्महत्या करतो. रूपा गोपाळला जन्म देते

आणि तीसुद्धा नंतर आत्महत्या करते. लछमन रूपाच्या मुलाला संभाळू लागतो.

–इंग्लंडहून आल्यानंतर राजेश्वर निर्मलाशी लग्न करतो. लछमन गोपाळला घेऊन नंतर राजेश्वरकडे नोकरी करू लागतो.

–सरकारी वकिलाच्या प्रश्नांना उत्तरं देताना लछमन सांगतो,

–इसके बाद हमने इन्ही बाबूजीके पास नौकरी पकड ली. अब हमे क्या मालूम, की इनके दीमागपर शैतान सवार हुआ है ।

**राजे.** : लछमन, गोपू मला मुद्दाम त्रास देत असे. आधीच मला झोप येत नाही. त्यात चुकून एखादवेळी झोप लागलीच तर अचूक तुझ्या गोपूचा आरडाओरडा सुरू होत असे. माझ्या झोपेची जशी काही वाट पाहात असल्यासारखा तो रडायचा. दॅट ब्रॅट वॉज अ परफेक्ट व्हिलन !

**लछमन** : ये बाबूजी जबभी गोपूको देखते तो एकदम खपा हो जाते थे. हां, थोडा शरारती जरूर था. पर आखिर उसकी उम्रही क्या थी ? और बच्चोंकी शरारतें बर्दाश्त न कर सकें वो आखिर इन्सान भी क्या है ?

**स. वकील** : खुनाचा पत्ता तुम्हाला कसा लागला ?

**लछमन** : पहले तो बाईजीके चिल्लाने की आवाज आयी. दौडते हुए बंगलेमें पहुँचा, तो देखा कि, गोपूकी लाश खूनमें लथपथ होकर पडी है. और ये बाबूजी पासमें बैठे थे. इस तरह बैठे थे, हाथमें कैंची लेकर, जैसे होश उड गया हो उनका. और कैंचीसे लहू टपक रहा था. सरकार–क्या बताऊं सरकार–बडा प्यारा था, बडा मासूम था– आखिर तक उसके बाप का न पता चला, न ठिकाना मालूम हुआ–

लछमनचे हे सर्व बोलणं ऐकून राजेश्वर पिसाटासारखा खदखदा हसू लागतो. त्याच्या हसण्याकडे सर्वजण बघत असताना, जणू त्याला सांगायचं असतं, की मूर्खांनो, गोपू माझा मुलगा होता, हे तुम्हाला कधीच कळणार नाही.

यानंतर निर्मलाची साक्ष सुरू होते. गोपूचा तिला अतिशय लळा लागतो. आपल्या मुलासारखं ती त्याच्यावर प्रेम करू लागते आणि हेच मुळी राजेश्वरला सलत रहाते.

'मला गोपू आवडत नाही हे तिला माहीत होतं. म्हणून ही मुद्दाम त्याचे लाड करायची. मला गोपू का आवडावा ? का ? त्याला सुरुवातीला कितीदा मी जवळ घेण्याचा प्रयत्न केला. बट ही हेटेड मी. घरात नसताना माझा पुलओव्हर त्यानं कात्रीनं कापून काढला. घरात येऊन गालिच्यावर मुद्दाम मुतायचा. दगड मारून खिडक्यांच्या काचा फोडायचा–आणि एक भयंकर सवय त्याला होती. ध्यानीमनी नसताना एकदम लक्षात यायचं की, हा कुठूनतरी आपल्याकडे बघतोय. दाराआडून, झाडाआडून––आणि हे वैर फक्त माझ्याशी– मी–'

वादळी वाऱ्यासारखे हे विचार राजेश्वरच्या मनाला चाटून गेले. निर्मलाची साक्ष चालू असताना मध्येच उठून कोर्टाला ओरडून सांगावं असं त्याला वाटलं.

आणि इथे निर्मलाची साक्ष चालूच होती–'गोपू इतका काही माझ्या अंगावर झाला होता, की मी क्षणभर नजरेआड झाले तरी तो रडायचा. गोंधळ घालायचा. रात्री माझ्याजवळ हट्टानं झोपायचा. मला राहावायचं नाही. अनाथ, आईबापा वेगळा मुलगा तो. ह्यांना खरं तर त्याचं रडणं माझ्यापेक्षा अधिक केविलवाणं वाटायला हवं होतं ! ह्यांना कुठे माहीत आहेत यांचे आईवडील ! कोरके गुरूजींच्या अनाथाश्रमात वाढले, माझ्या बाबांनी मदत केली म्हणून वर आले. पण नाही. मला गोपूचा लळा लागला आहे ही गोष्ट यांना अजिबात खपत नव्हती.

**राजे** : का खपावी ? माझा हक्क होता तुझ्यावर, प्रथम आणि शेवटीसुद्धा. माझा पूर्ण हक्क होता तुझ्यावर. त्याच्यात काय म्हणून कुणाला वाटेकरी होऊ देऊ मी ! तू फक्त माझी होतीस ! फक्त माझी ! माझी.

**निर्मला** : तुमची होते ! हक्क होता ! म्हणजे काय ? तुमची दासी होते का मोलकरीण होते ? स्वतंत्रपणे श्वास घ्यायचीसुद्धा चोरी होती मला !

**राजे.** : होती ! तुझे श्वाससुद्धा माझ्यासाठीच चालायला हवे होते ! तसं केलं असतंस तर माझ्या श्वासावरची मालकी मी कधीच देऊन टाकली असती तुला ! मला कधीच काही दिलं नाही कुणी !

**निर्मला** : तक्रार करून कधी काही मिळत नसतं ! गोपू अनाथ होता. त्याला मी हवी होते. मला तो हवा होता.

**राजे.** : आणि मी ? मी का म्हणून जन्मभर अनाथच राहायचं ?

**निर्मला** : गोपूचे वय––

**राजे.** : निर्मला ! गोपू इज डेड !

**निर्मला** : डेड ? तुम्ही ठार मारलंत त्याला ?

कुणीतरी आपणास गर्द खोल दरीत ढकलून दिल्याचा भास राजेश्वरला झाला. त्याच्या डोळ्यावर अंधाराची झापड येऊ लागली. अगदी खोलातून उमटून येऊ लागलं.

'मला का नाही कुणी ठार मारलं ? ज्या कात्रीनं माझी नाळ कापली, त्याच कात्रीचे घाव माझ्यावर का नाही घातले कुणी–'

आणि मग जिवाच्या आकांताने तो निर्मलेला ओरडून सांगतो– 'निर्मला, गोपू माझा मुलगा होता आणि मी त्याचा खून केला. खून. ते एवढंसं पोर ! ते सांगू लागलं, आई म्हणते तुम्ही सैतान आहात. मी म्हणालो, कोण आई ? तर तुझ्या खोलीकडे बोट दाखवून तो ओरडू लागला. मग मी त्याचा खून केला–'

एव्हाना निर्मलाची साक्ष झालेली असते. न्यायालयात एक कुबट शांतता.

थोड्या वेळाने, प्रकाश हळूहळू कमी होऊ लागतो. शिक्षा फर्मावण्यास अधीर झालेले न्यायाधीश राजेश्वरला सांगतात– 'संपलं ? आता निकाल–की तुम्हाला काही सांगायचं राहिलं आहे अजून ?'– आणि याचवेळी रंगमंचावर संपूर्ण अंधार, फक्त राजश्वरवर प्रकाशझोत.

**राजेश्वर** : नाही. काही सांगायचं राहिलं नाही. काय सांगणार ? कोणाला ? तुम्ही निकाल द्या. शिक्षा द्या. फाशीची शिक्षा– किती युक्त्या ! किती प्रकारच्या युक्त्या ! एका माणसाला ठार मारण्याकरिता फक्त ? पण मला मारणं इतकं सोपं नाही ! (बराच काळ स्तब्धता.)–माझ्या मनातला एक हिरवागार प्रचंड पिंपळ सतत सळसळ करणारा ! गडद हिरवा. –सुखमय वेदनांनी तडफडणारं एक अरण्यच शरीर माझं.–निर्मला, रूपा, तुम्ही न्यायलात त्या अरण्याला. मी, तुमच्यावर प्रेम करीत राहिलो. अफाट शक्तीनिशी– माझा टाहो एकीलाही ऐकू आला नाही. कुणालाही कळलं नाही. मी शक्तिसंपन्न महामानव–जगण्यासाठी थोडी परवानगी. अन् एक आश्वासक स्मित. एवढंच मला हवं होतं. तुम्ही मला सगळे का घाबरलात ? (स्तब्धता) तुम्ही मला सगळे हवे होता. मी मग एक घनदाट प्रचंड ढग होऊन तुमच्यावर तरंगत राहिलो असतो. तुमच्यावर सावली धरली असती. तुमच्या नकळत बरसलो असतो धरणावर झरझरझरझर–तुमच्या अंगावर. तुमच्या सर्वांगांना शीतल धारांनी लपेटून टाकीत. असं झालं नाही–का बरं ? का बरं ?–' O

**नाट्यसार : सुरेन फातर्पेकर**

निसर्ग चित्रकार

# मिलिंद फडके



गेल्याच आठवड्यात म्हणजे दि. २२ फेब्रु. ते ५ मार्च १९७५ या दिवसात पुण्याच्या बालगंधर्व कलादालनात अतिशय लोभस, आल्हाददायक अशा पस्तीस निसर्गचित्रांचे एक प्रदर्शन पुण्याच्या एका तरुण, उत्साही चित्रकाराने मांडले होते. चित्रकृतींचे अमाप कौतुक झालेला हा चित्रकार म्हणजे मिलिंद फडके. पेरुगेट भावे स्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर पुढ अभिनव कला महाविद्यालयात कमर्शिअल आर्टचा डिप्लोमा त्यांनी १९७१ मध्ये घेतला. लहानपणापासून चित्रकलेची आत्यंतिक आवड आणि म्हणूनच चित्रकार होण्याचे ध्येय उराशी बाळगून मोठ्या जिद्दीने, आत्मविश्वासाने त्यांनी कलाशिक्षण घेतले. एक अत्यंत कष्टाळू, मेहनती अन् हुशार विद्यार्थी म्हणून नावलौकिक मिळविला, इतकेच नव्हे तर विविध पारितोषिकेही पटकावली. डिप्लोमा परीक्षेत महाराष्ट्रात दुसरा व पुण्यात पहिला क्रमांक त्यांनी मिळविला. कॅमलिन कंपनीने ठेवलेले 'बेस्ट स्टूडंट अॅवॉर्ड 'ही त्यांना देण्यात आले. 'टॉम अॅन्ड वे ' या जाहिरात कंपनीची रौप्य ट्रॉफीही फडके यांनी मिळविली. मे. घाटगे पाटील यांच्या वाहतूक कंपनीच्या ट्रेडमार्क चित्रणस्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक त्यांनी मिळविले. १९७२ च्या अखिल भारतीय दसरा प्रदर्शनातील फडके यांच्या एका चित्राची निवड म्हैसूर सरकारने करून त्यांचा गौरव केला व ते चित्र दावणगिरी येथील चित्र संग्रहालयासाठी ठेवून घेतले. काही वर्षे प्रतिभा अॅडव्हरटायझर्स या कंपनीत आर्टिस्ट म्हणून नाव मिळविल्यावर केवळ वयाच्या तेविसाव्या वर्षी अभिनव कला विद्यालयात लेक्चरर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. अशा अध्यापकाचे मार्गदर्शन मिळणारे कलाविद्यार्थी खरोखरीच भाग्यवान म्हटले पाहिजेत.

एका बाजूला चरितार्थाचे साधन म्हणून कमर्शिअल आर्ट कोर्सचे अध्ययन करीत असतानाच निसर्ग चित्रणाची आत्यंतिक ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना. निसर्ग चित्रणाचा ध्यास त्यांनी घेतला. अतिशय थोड्या काळात त्यांनी गरूडझेप घेतली. प्रा. नांगरे, प्रा. डेंगळे यांनी मार्गदर्शनाचा हात पुढे केला. अन् हा चित्रकार निसर्गचित्रणात पुढे आला. सकाळ ट्रस्ट व औंध ट्रस्ट यांच्या शिष्यवृत्तीच्या जोरावर महाबळेश्वर व काश्मीर या निसर्गसौंदर्याच्या खाणी त्यांनी पाहिल्या, चित्रातून तेथील खजिना त्यांनी पुणेकरांसाठी जसाच्या तसा जपून आणला. या दोन्ही ' ट्रस्ट 'च्या प्रमुखांनी कलागुणांची योग्य पारख केली असेच म्हणावेसे वाटते. आपले लॅण्डस्केप पेन्टिंग सुरू असतानाच मिलिंद यांनी आजवर तीन प्रदर्शने भरविली. दोन ' वनमॅन शो ' व एक ग्रुप शो. हे चौथे सुंदरसे प्रदर्शन मांडून पुण्याच्या रसिकांना तृप्त करण्याचा प्रयत्न पूर्ण यशस्वी झाला. प्रेक्षक सुखावले, विसावले, खरोखरच सर्वांचे समाधान झाले.

## विविध माध्यमांचा वापर

निसर्गचित्रांच्या निर्मितीसाठी जलरंग, तैलरंग, अॅक्रॉलिक कलर्स, कलर पेस्टल्स, फेल्टपेन अशा विविध माध्यमांचा वापर या चित्रकाराने केला होता. चारही माध्यमे यशस्वीपणे हाताळण्यात फडके यांना चांगलेच यश लाभले आहे. सर्वच चित्रांतून लक्षात येणारी, विविध परंतु हळुवार अन् विलोभनीय रंगछटांची उधळण. चित्रणाची अचूक वेळ छायाप्रकाशाच्या सुंदर रंगछटातून जाणवत होती. चित्रपरिपूर्णता, जलरंगाची पारदर्शकता, पेस्टल वापरण्यातील नाजुकता सारं कसं ठरवून केलेलं.

अगदी मोजकीच चित्रे या पेस्टलमाध्यमातून सामोरी आली होती. अतिशय नाजूक, हळुवार परंतु ताजे वाटणारे हे पेस्टलवर्क अप्रतिम होते. त्यासाठी योग्य अशा रंगछटेचा कागद (टिंटेड पेपर) निवडून त्यावर छायाप्रकाशाच्या तुकड्यांची जणू आकर्षक मांडणीच केली होती. चित्रातील मोठे क्षेत्र अन् त्याचा रंग विचारात घेऊन कागदांची निवड करणे फार महत्त्वाचे असते. या पेस्टल रंगातून निसर्गचित्रण करणे अतिशय कष्टाचे चिकाटीचे, अन पूर्व विचारांचे असे जिकीरीचे काम असते. या कामातील या चित्रकाराची तयारी चांगलीच प्रत्ययास येते. मद्रास सागरातील पडाव हे केशरी रंगछटांचे चित्र तसेच श्रीनगरच्या वाटेवर ही चित्रे फारच दर्जेदार वाटली. केवळ पेस्टलवर्कमधील चित्रांचे एक मोठे प्रदर्शन पुढील काळात या चित्रकाराने मांडावे अन माध्यमातील चित्ररूपी प्रात्यक्षिके रसिकांना सादर करावीत असे म्हणावेसे वाटते.

अॅक्रॉलिक रंगाच्या नाजूक छटांनी नाहलेली चार पाच चित्रेही सुखद अशी होती. त्यातील रंगछटांचा ताजेपणा फारच सुंदर होता. काश्मीर कॅनॉल–हाऊस बोट, वगैरे चित्रांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. रेषेचा बंदिस्तपणा राखण्यात आणि नाजुक, मृदु रंग छटा राबविण्यात या चित्रकाराची विशेष कुशलता दिसून येते. ' नवोदितांना प्रात्यक्षिके ठरावीत अशी चित्र ' असे म्हणता येईल.

प्रदर्शनातील चित्रांपैकी बरीचशी चित्रे जलरंग माध्यमात तयार झालेली होती. पारदर्शक जलरंग वापर (ट्रॅन्सपरंट) हे फार कुशलतेने, जबाबदारीने व समज ठेवून करण्याचे काम आहे. ' सासवडची सकाळ ' दत्तवाडी पाणवठा, सारसबाग मंदिर, विठ्ठलवाडी, वाघोली रस्ता वगैरे चित्रे या पद्धतीचे बोलके दाखले होते. जलरंगाचा आत्मा जो ताजेपणा तो सर्वत्र सारखा जाणवत होता. झाडाझुडपांच्या रंगकामातील नेमक्या हळुवार हिरव्या रंग छटा, ऊनसावल्यांचा खेळ, मांडणी वैशिष्टच, लांववर पडलेल्या सुखद सावल्या, सारं कसं जिथल्या तिथं अन् आवश्यक तेवढेच. फडके यांची जलरंगचित्रे म्हणजे या माध्यमाच्या विविध अंगाचे उत्कृष्ट पाठ ठरतात. चित्रणातील रेखांकन, प्रमाणबद्धता, रचनाकौशल्य या त्रयींचा सुंदर संगम फडके यांच्या निसर्गचित्रणात दिसून येतो.

अशा या तरुण चित्रकाराचा भविष्यकाल निश्चितच उज्ज्वल आहे.

–अनंत भिडे

# पुनः एकदा जवाहरलालजी दर्डा

## झुंबरलाल भरुट

सदस्य, आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्था, यवतमाळ

श्री. जवाहरलाल अमोलकचंद दर्डा यांच्या विविध भानगडी-संबंधीचा आमदार श्रीमती मृणाल गोरे यांनी विधानसभेत मांडलेला अशासकीय ठराव चर्चिला गेल्यापासून श्री. दर्डा यांच्या नावाला पुन्हा प्रसिद्धी लाभली आहे. माणूस साप्ताहिकाच्या दिनांक २५ ऑगस्ट व १ सप्टेंबरच्या अंकांचा उल्लेख श्रीमती मृणाल गोरे यांनी तर केलाच पण नवलाची आणि आनंदाची गोष्ट म्हणजे काँग्रेस पक्षाचे एक प्रमुख आमदार श्री. पिंटो यांनीही दर्डाविरुद्ध वेळोवेळी केल्या जाणाऱ्या तक्रारींची स्पष्ट माहिती सभागृहाला दिली. सहकारमंत्री श्री. यशवंतराव मोहिते यांनी जरी न्यायालयीन चौकशी करण्यास नकार दिला असला तरी शासनातर्फे महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीच्या कारभाराची चौकशी त्वरीत केली जाईल असे स्पष्ट आश्वासन सभागृहाला दिले हेही काही कमी नाही. हे सर्व होईपर्यंत तोंड मिटून गप्प बसलेल्या दर्डांनी अखेर नाइलाजाने विधान परिषदेत गेल्या २२ तारखेला तोंड उघडून 'माझ्यावर केलेले आरोप बेजबाबदार आणि दुष्ट हेतूने केले आहेत' असा कांगावा करावयास सुरुवात केली. जाता जाता त्यांनी मृणाल गोरे यांनाही आव्हान देण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला. स्वतःच्या शुद्धपणाचा एवढा गर्व असल्याचा आव आणणाऱ्या दर्डांना मृणाल-ताईंच्या आव्हान स्वीकृतीसाठी थांबण्याची वास्तविक काहीच गरज नाही. कारण केवळ विधीमंडळातच हे आणि असे आरोप आतापर्यंत झाले आहेत आणि बाहेर झाले नाहीत असे मुळीच नाही. बाहेर गेल्या दहा-पंधरा वर्षात कित्येक वेळा असे आरोप करण्यात आले असूनही गेंड्याची कातडी धारण करणाऱ्या दर्डाजींनी आव्हान स्वीकारण्याची हिंमत कधीच केली नाही. ते काही का असेना. एकदाचे मृणाल गोरे यांना उत्तर देण्याच्या निमित्ताने का होईना, या प्रश्नावर दर्डाजींनी अखेर तोंड उघडले हेही काही कमी नाही. दर्डाजींचे आव्हान स्वीकारावयचे की नाही हे ठरविण्याचे काम मृणालताईंचे आहे. त्यांची जबाबदारी त्या जाणतातच. आज साऱ्या महाराष्ट्राला डोईजड होऊन बसलेल्या या अमोल जवाहराचे पालन पोषण केले आहे यवतमाळ जिल्ह्याने आणि म्हणून या बाळाने केलेल्या उपद्व्यापांपैकी काही उरलेल्या उपद्व्यापांची माहिती महाराष्ट्राला देण्यासाठी या लेखाचा प्रपंच करण्यात आला आहे.

१ : यवतमाळ येथील आदर्श गृह निर्माण सहकारी संस्थेचा अध्यक्ष या नात्याने १–३–१९५६ ते १८–४–५७ या साडेतेरा महिन्यांच्या काळात दर्डाजींनी ९,५९,०००/– रुपये विदर्भ हाऊसिंग बोर्डाकडून उचलले होते. या संस्थेचे खाते पंजाब नॅशनल बँकेत होते. एवढ्या प्रचंड रकमेपैकी फक्त ३५७ रुपये या संस्थेच्या नावावर ३०–६–५७ रोजी या बँकेत शिल्लक होते. उरलेली संपूर्ण रक्कम आल्या आल्याच उचलली गेली होती. पण आश्चर्य म्हणजे या वेळे-पर्यंत संस्थेने फक्त २२ घरेच बांधून पूर्ण केली होती. म्हणजेच याच वेळेस चालू असलेल्या 'पृथ्वीवंदन' या आपल्या बादशाही इमारती-साठी दर्डाजींनी ती रक्कम वापरली होती.

२ : यवतमाळ शहरात भर मध्यवस्तीत, ऐन बाजाराच्या गर्दीत एक मोक्याची जागा दर्डांनी याच काळात आपले मित्र आणि आदर्श गृह निर्माण सहकारी संस्थेचे सेक्रेटरी श्री. ब्रह्मप्रसाद यादव यांच्यासाठी सरकार दरबारी असलेले आपले वजन वापरून मिळविली व त्यावर यादवांना दुमजली इमारत बांधून दिली. या इमारतीची सध्याची किंमत सहज दीड लाख रुपये भरेल. श्री. यादव यांच्या-जवळ इतका पैसा उपलब्ध करून देण्याचे कोणतेच साधन नसताना ही इमारत ते कशी बांधू शकले हे एक कोडे आहे. पण ज्या काळात यवतमाळातला आदर्श गृह बांधणी कार्यक्रम सुरू होता त्याच वेळेत ही इमारत बांधली गेली ही गोष्ट विचारात घेतली तर सर्व कोडे उलगडते. विशेष म्हणजे ही जागा बांधकामास दिली गेल्यास भर-वस्तीतील रहदारीला अडथळा येईल या कारणास्तव या जागेकरिता त्यापूर्वी आलेले शेकडो अर्ज कलेक्टरसाहेबांनी नामंजूर केले होते.

३ : यवतमाळचे दर्डा उद्यान व या उद्यानातील आलीशान बंगला, यवतमाळच्या भरवस्तीतील पृथ्वीवंदन हा चार मजली प्रासाद, मंगल मुद्रण, नागपूर येथील बंगला व लोकमत मुद्रण, मुंबई येथील फ्लॅट्स् वगैरे दर्डाजींच्या चातुर्याने उभे झाले असले तरी दर्डाजींच्या स्वतःच्या नावावर यापैकी काहीच नाही. आपल्या कुटुंबातील कोणाच्या तरी नावाने त्याची मालकी दाखविण्याची काळजी दर्डाजींनी प्रथमपासूनच घेतली आहे.

४ : अमरावती येथील मंगल मुद्रण हा छापखाना दर्डांनी मासिक पाचशे रुपये हप्तेबंदीने १९५६–५७ साली श्री. दंडे यांच्या-पासून दहा हजार रुपयांना विकत घेतला. अगदी याच काळात इकडे यवतमाळात पृथ्वीवंदनचे मजले चढत होते ही गोष्ट विचारात घेतली तर दर्डाजींचा या मागील धूर्त कावा लक्षात येईल.

५ : मुंबई येथील महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स सोसायटीशी प्रथम सदस्य, नंतर उपाध्यक्ष व आता अध्यक्ष या नात्याने श्री.

दर्डाजींचा गेल्या पंधरा वर्षांपासून सतत संबंध आला. या काळातील लोकमतचे सर्व अंक आणि विशेषत: दिवाळी अंक चाळून पाहिल्यास त्यात महाराष्ट्रातील घरबांधणी संस्थांच्याच जाहिराती प्रामुख्याने आढळतात आणि विशेष म्हणजे लोकमतखेरीज इतर नियतकालिकात त्यापैकी बहुतेकांच्या जाहिराती मुळीच नाहीत. एका छोटयाशा जिल्हा पत्राला पान पान जाहिराती देण्याची आवश्यकता बाहेर जिल्ह्यातील घरबांधणी संस्थांना का वाटली असावी याचा अंदाज घेणे कठीण नाही.

६ : साम, दाम, दंड, भेद वगैरे आवश्यक ते सारे मार्ग वापरून विरोध मोडून काढायचा ही दर्डाजींची नेहमीची आवडती पद्धती. याच पद्धतीचा अवलंब करून दर्डाजींनी यवतमाळच्या बहुतेक सर्व पत्रकारांना खिशात घातले. यवतमाळ येथील स्टेशन रोडवरील अत्यंत मोक्याची सरकारी जागा अगदी नाममात्र किंमतीत या पत्रकारांच्या हाऊसिंग सोसायटीला दर्डाजींच्या मेहरबानीने प्राप्त झाली. दर्डाजीच अध्यक्ष असलेल्या या सोसायटीत घरे बांधणारे वीरेंद्र सारस्वत, लक्ष्मीकांत चोखाणी, रानडे वगैरे पत्रकारांची गावातच दुसरीकडे घरे आहेत. द्वारका शर्मा हे दर्डांच्या मंगल मुद्रणचे व्यवस्थापक. आदर्श सोसायटीत त्यांच्या नावावर एक घर आहे. पण तरीही त्यांचा पत्रकारात समावेश करून दर्डाजींनी त्यांनाही या सोसायटीत एक घर दिलेच. आनंदराव अण्णाजी देशपांडे हे नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षक. आदर्श सोसायटीत एक घर असतानाही त्यांना पत्रकार सोसायटीत घर मिळालेच. सहकार कायद्याशी आणि गृह निर्माण सहकारी संस्थांच्या स्थापनेमागील उद्देशांशी हे सरळ सरळ विसंगत आहे. हे देशपांडे नगरपरिषदेत शिक्षक असले तरी खरी चाकरी दर्डाजींचीच करीत असतात. लोकमतचे वार्ताहर म्हणून ते बऱ्याच वर्षांपासून काम करीत आहेत. पण त्यांचा उल्लेख दर्डाजींच्या हिशोबपुस्तकात कोठेच आढळणार नाही. त्याकरिता ' रमेश गाडे ' हे काल्पनिक नाव त्यांना देण्यात आले आहे.

७ : सोसायटचा मागून सोसायटचा स्थापन करण्याची दर्डाजींची भूक इतकी वाढली आहे की, त्यांनी आपल्या दर्डा उद्यानात दर्डा कुटुंबातीलच अकरा नावे घेऊन स्नेहसागर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ही नवीनच सोसायटी नुकतीच स्थापन केली असून तिचे रजिस्ट्रेशन प्रपोजल सहकार खात्याकडे सादर केले आहे. एकाच कुटुंबातील व्यक्तींचा समावेश असलेली अशी दुसरी हाऊसिंग सोसायटी जगाच्या पाठीवर दुसरी कोणती नसेल.

## महाविद्यालयाचे धिंडवडे

दर्डाजींनी अध्यक्षपद भूषविलेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या अमोलकचंद महाविद्यालयाचा उल्लेख आजकाल अनेकदा वृत्तपत्रांतून होऊ लागला आहे. याच महाविद्यालयाने यवतमाळात आणि यवतमाळ जिल्ह्यात महाविद्यालयीन शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. कला, वाणिज्य, विज्ञान, कायदा वगैरे विविध शाखांचे शिक्षण देणारे हे विद्यालय म्हणजे यवतमाळचे एक भूषण आहे. आता तर अर्थशास्त्राचे पदव्युत्तर वर्गही या महाविद्यालयात सुरू झाले आहेत. परंतु गेल्या पंधरा वीस वर्षांच्या कालावधीत या महाविद्यालयाने प्राप्त केलेली सारी इभ्रत गेल्या काही महिन्यात पार घालविली आहे आणि याची संपूर्ण जबाबदारी केवळ दर्डाजींचीच आहे. या महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे अध्यक्षपद त्यांच्याकडे गेल्यापासूनच या भानगडींना सुरुवात झाली. अनेक भानगडींपैकी केवळ काहींचाच उल्लेख पुढे करण्यात येत आहे—

१ : १९७३ सालांतील पाच महिन्यांचा ६०–६५ प्राध्यापकांचा पगार देण्यात आलेला नाही. महाविद्यालयाची आर्थिक स्थिती चांगली नाही हे कारण सांगून प्राध्यापकांच्या सह्या मात्र घेण्यात आल्या व ही रक्कम ठेव म्हणून महाविद्यालयात ठेवली जाईल असे सांगून त्याबद्दलची पावतीही प्रत्येक प्राध्यापकाला देण्यात आली. नागपूर विद्यापीठाच्या आणि महाविद्यालयाच्या नियमाशीही हे सरळ सरळ विसंगत आहे.

२ : प्राध्यापकवर्गाच्या पगारातून कापून घेण्यात आलेले अंदाजे दीड लाख रुपये महाविद्यालयाने संबंधित खात्यात अद्याप जमा केलेले नाही. या रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| (१) मार्च ७३ ते जानेवारी ७४ पर्यंतचा प्रॉव्हिडंट फंड | १,१०,०००–०० |
| (२) सहकारी कर्ज पुरवठा संस्थेची प्राध्यापकवर्गाकडून झालेली किश्त वसूली | २४,०००–०० |
| (३) महाविद्यालयात चालविल्या जाणाऱ्या सहकारी स्टोअर्सची उधारी | ७,०००–०० |
| (४) तीन महिन्यांची वसूल केलेली इन्कम टॅक्सची रक्कम | ३,०००–०० |
| (५) संचित मुदतीच्या पोष्टाच्या खात्यात भरण्याची रक्कम | ३,०००–०० |
| | १,४७,०००–०० |

ही रक्कम प्राध्यापकवर्गाच्या वेतनातून कापून घेण्यात आली असली तरी तिचा वापर मात्र महाविद्यालय अनधिकृतपणे अद्यापी करीत आहे.

३ : महाविद्यालयाच्या बॉटनी आणि झुऑलॉजी लेबॉरेटरीचे बांधकाम दर्डांच्या कारकिर्दीतच करून घेण्यात आले. या बांधकामासाठी सीमेंट कॉंक्रिटचा पाया आधीच तयार होता. परंतु संपूर्ण कामच नवीन केले आहे असे कागदोपत्री दाखविण्यात आले असून फार तर सत्तर हजार रुपये प्रत्यक्ष खर्च झालेल्या लेबॉरेटरीवर हिशोबात मात्र तब्बल अडीच लाख रुपये खर्च केल्याचे दाखविले आहे. बांधकामाच्या वेळचा सरकारी शेड्युल रेट पाहिला तर ही विसंगती ताबडतोब स्पष्ट होऊ शकेल.

४ : मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी दिलेली देणगी व विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळालेले अनुदान यातून एक भव्य सभागृह या महाविद्यालयात बांधण्यात आले आहे. या सभागृहाचे सीलींग करण्यासाठी ऐंशी हजार रुपये उधळण्यात आले. ज्या संपूर्ण सभागृहावरही ऐंशी हजार रुपये खर्च झालेले नाहीत त्या सभागृहाच्या केवळ सीलिंगसाठी इतका वारेमाप खर्च झाला याचे कुणालाही आश्चर्य वाटेल. पण त्याचे कारण नाही. कारण या सभागृहाबरोबरच दर्डांच्या बंगल्याचेही सीलिंग सहकारी तत्वावर उरकून घेण्यात आले आहे.

५ : महाविद्यालयाच्या नावावर १९७२ साली तेरा हजार रुपयांची क्रॉकरी विकत घेतलेली आढळते. महाविद्यालयासारख्या शैक्षणिक संस्थेला क्रॉकरीवर इतकी प्रचंड रक्कम खर्च करण्याचे काहीच प्रयोजन नाही. वास्तविक ही सर्व क्रॉकरी विकत घेतली गेली दर्डाजींच्या वडील चिरंजीवाच्या विवाहाचे वेळेस. आणि ती आतापर्यंत त्यांच्याकडेच पडून होती. पण काही प्राध्यापकांनी हा प्रश्न सरळ दर्डाजींपुढेच काढल्यामुळे त्यांनी नाइलाजाने यापैकी थोडीशी क्रॉकरी महाविद्यालयात इतक्यातच पाठविली आहे. परंतु फार तर अडीच तीन हजार रुपयांचीच क्रॉकरी महाविद्यालयाकडे पोचली आहे.

६ : महाविद्यालयाच्या पगारपत्रकावर सही करणारे काही कर्मचारी, दर्डाजी महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षपदावरून हाकलले गेले असूनही अद्यापी दर्डाजींच्या बंगल्यावरच काम करीत असतात. कॉलेजचा त्यांचा संबंध फक्त पगारापुरताच येतो.

७ : पाकिस्तान आक्रमणाचे वेळेस राष्ट्रप्रेमाचा आव आणून प्राध्यापकांना न विचारताच दर्डाजींनी त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडातील रक्कम राष्ट्रीय-संरक्षण निधीत जमा करण्यात येईल असे भर सभेत जाहीर करून टाकले. भर सभेत दिले गेलेले आश्वासन मोडले जाऊ नये या एकाच हेतूने अनियमित पगार मिळणाऱ्या प्राध्यापकांनी या विरुद्ध काहीच तक्रार केली नाही. पण प्राध्यापकांच्या लाचारीचा असा गैरफायदा घेणाऱ्या कोटचाधीश दर्डाजींना मात्र स्वतःचा एक पैसाही या निधीत गुंतविण्याची आवश्यकता वाटली नाही.

८ : महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे अध्यक्षपद प्राप्त झाल्यापासून यवतमाळात होणारे कॉंग्रेसचे सारे लहान मोठे समारंभ या महाविद्यालयातच होतील याची योग्य ती काळजी दर्डाजी बरोबर घेत आले आहेत. यामुळे समारंभ परस्पर महाविद्यालयाच्याच खर्चाने होऊन उलट तितकाच पैसा संघटनेतर्फे स्वतःच्या खिशात घालण्याची संधी दर्डाजींना प्राप्त होत असते.

९ : आपल्या अध्यक्षीय कारकिर्दीत दर्डाजींनी आपल्या माणसांना महाविद्यालयात लावण्याचा सपाटा सुरू केला. अनेक जागा अनावश्यक असूनही भरल्या गेल्या. त्यामुळे साहजिकच प्राध्यापक वर्गाच्या व कर्मचाऱ्यांच्या संख्येत भरमसाठ वाढ झाली आणि त्यावरील वाढीव खर्चाचा आणि दर्डाजींच्या दिवाळखोरीचा बोजा सहन करता करता या महाविद्यालयाची आर्थिक घडी पार विस्कटली.

१० : गतवर्षी अनेक प्राध्यापकांना त्यांची चार चार वर्षे नोकरी झालेली असतानाही कमी करण्यात आले. मात्र पुढील वर्षाच्या सुरुवातीला त्या सर्वांना पुन्हा जरूर कामावर घेतले जाईल असे गोड आश्वासन आपल्या मिठ्ठास वाणीने देऊन दर्डाजींनी पाच महिन्यांच्या डिपॉझिटवर त्यांच्या सह्या मिळवल्या. पण त्यानंतर नोकरी आणि डिपॉझिट दोन्हीबाबत दिलेले आश्वासन दर्डाजी साफ विसरले.

११ : विद्याप्रसारक मंडळाला विद्यार्थ्यांच्या प्ले ग्राऊंडकरिता महाविद्यालयाजवळच एक जागा बक्षिस मिळाली आहे. फक्त प्ले ग्राऊंड म्हणूनच तिचा उपयोग केला जावा, इतर कार्याकरिता नाही अशी स्पष्ट तरतूद संबंधित बक्षिसपत्रात आहे. पण दर्डाजींच्या सुपीक डोक्यात निराळीच कल्पना आली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी विद्या विहार सहकारी संस्था या नावाची संस्था स्थापन करून त्या संस्थेला ही बक्षिस मिळालेली जागा अनधिकृतरीत्या विकून टाकली. विद्या विहार सहकारी संस्थेत प्राचार्यांशिवाय काही प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचाही समावेश करण्यात येऊन या सहकारी संस्थेला महाराष्ट्र हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीकडून साडे पाच लाख रुपयांचे कर्जही मंजूर करून टाकले. या रकमेपैकी आतापर्यंत चार लाख पंचेचाळीस हजार रुपये कर्ज उचलले गेले आहे. या संपूर्ण व्यवहाराची काळजीपूर्वक तपासणी होणे आवश्यक आहे. वरवर पहाताही या व्यवहारात खालील दोष स्पष्ट दिसतात.

१. विशिष्ट उपयोगाकरिता प्राप्त झालेल्या जागेचा उपयोग दुसऱ्या कार्याकरिता करणे नियमाविरुद्ध आहे.

२. विद्याविहार मंडळ हा चॅरिटेबल ट्रस्ट असल्यामुळे या व्यवहाराला चॅरिटी कमिशनरची पूर्वसंमती आवश्यक होती.

३. चार लक्ष पंचेचाळीस हजार रुपये जरी उचलले गेले असले तरी घरे मात्र मुळीच बांधली गेलेली नाहीत.

४. घरांऐवजी या जागेवर एक छोटासा इमारतीचा सांगाडा मात्र अर्धवट स्थितीत उभा असलेला आढळतो.

५ : ज्या व्यक्तींच्या नावावर घर बांधणीकरिता ही रक्कम मंजूर करून घेतली आहे त्यांचेजवळ स्वतःची घरे अगोदर आहेत काय याकडे लक्ष दिलेले नाही.

६ : कर्ज एका कामाकरिता मंजूर करून ते दुसऱ्याच कामाकरिता वापरले जात आहे.

७ : या व्यवहारात महाविद्यालयाच्या मालकीची जागा महाविद्यालयाच्याच प्राचार्यांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थेला विकण्यात आली आहे. कायद्याच्या चाकोरीत हे बसते काय ?

८ : ही जागा विकत घेण्यासाठी पैसा कोठून आणण्यात आला ?

९ : महाराष्ट्र हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीने ज्या शीघ्र गतीने कोणतीच चौकशी न करता या संस्थेला कर्ज मंजूर केले तीच शीघ्र गती आणि तोच उत्साह इतर सहकारी संस्थाबाबतही दाखविला जातो काय ?

## चौकशी निःपक्षपाती होईल का ?

असे आहे हे सारे प्रकरण. यवतमाळ येथील आदर्श गृह निर्माण सहकारी संस्थेची चौकशी अगोदरच सुरू झाली असून नागपुरातील सहा संस्थांच्या चौकशीचा आदेश नुकताच दिला गेला आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीच्या कारभाराचीही चौकशी केली जाईल असे स्पष्ट आश्वासन विधीमंडळात सहकार मंत्र्यानीच दिले आहे. या साऱ्या चौकशा निःपक्षपातीपणे करण्यात आल्या तर त्यातून सत्य परिस्थिती बाहेर आल्याशिवाय रहाणार नाही. गेल्या कित्येक वर्षांपासून आठ-पंधरा दिवसातून क्वचित काही तासांचे वास्तव्य यवतमाळात करणारे दर्डाजी आदर्श गृह निर्माण सहकारी संस्थेची चौकशी गेल्या महिन्यात चालू असताना यवतमाळात सतत ठाण मांडून बसले होते हे विसरता येत नाही. ते काहीही असो. यातून सत्य बाहेर येईलच अशी खात्री देता येत नाही. समाजवादी पक्षाने लोकमत तयार करण्यासाठी आणि दर्डाजीवर केलेल्या आरोपांची सत्यासत्यता हुडकून काढण्यासाठी सहा सदस्यांची एक समिती नुकतीच नेमली आहे. ती समिती कामाला यापूर्वीच लागलीही असेल. यवतमाळ–नागपूर–मुंबई असा त्रिस्थळी संसार करणारे दर्डाजी या चौकशीत काही अर्थ नाही असे आताच जाहीर करू लागले आहेत. आरोप सिद्ध झाला तर सार्वजनिक जीवनातून निवृत्त होण्याची तयारी त्यांनी दाखविली आहे. महाराष्ट्र टाईम्सने लिहिलेल्या अग्रलेखात दर्डाजी दोषी ठरले तर शिक्षा देण्याचे काम शासनाचे आहे. मात्र असे झाल्यास त्यांनी आपले 'जवाहरलाल' हे नाव बदलावे अशी मार्मिक सूचना केली आहे. आपल्या वृत्तपत्राचे 'लोकमत' हे नावही असे झाल्यास त्यांनी बदलावे अशी आमची सूचना आहे. ☐ ☐

# माणसाचा आवाज !

जीर्ण इतिहासाच्या दऱ्याखोऱ्यांतून
कालचक्राच्या झिजलेल्या आऱ्यांतून
किल्ल्यांच्या तटांतून, सागरांच्या लाटांतून
सरकारी कागदांच्या कारकुनी कटांतून
न्याय विकल्या जाणाऱ्या कोर्टांच्या हाटांतून
घुसमटत आला आहे माणसाचा आवाज !
सप्तचिरंजिवांच्या भाकडकथांचे
माकडहाड शोधीत
प्रेषित लोकांच्या लंगोट्या फेडीत
पाशवी सत्तांचे गळफास तोडीत
चिरंतन होऊन इथे उरला आहे,
धमनीगत धगधगता
नाडीगत तडफडता
रक्ताच्या रंगाचा माणसाचा आवाज !
मुरगाळून माना लाखो माणसांच्या
मुजोर राजांनी बांधलेले मिनार
कोसळून पडले...
मुंडक्यांचे डोंगर रचणाऱ्या साऱ्या
पापी खड्गांचे आसुरी आवाजही
शिल्पस्थ झाले.
सन–संवताचे रुपये ठोकणारे
काळाच्या उंबऱ्यावर,
राहिले केवळ बखरीच्या खबरीतून !
प्रचंड सांपळ्यांना हुलकावण्या देत
आला मात्र एक
माणसाच्या गळ्यातील बुलंद आवाज.
रक्तात जागी आहे त्याचीच आज गाज !
याच आवाजाने
पाहिले आहेत क्रांतीच्या पुत्रांचे
लखलखते सूळ...
कैदखान्यातले निर्दय कोरडे
हत्तीच्या पायी चिरडलेली बालके
माणसांना पशु बनविणारे वेद
(धर्माच्या वेदीवर निर्घृण शिरच्छेद !)
छेदू शकले नाही कोणतेही शस्त्र पण–
माणसाच्या गळ्यातील सनातन आवाज !
दिली त्याने स्फूर्ति नाडल्या–अडलेल्यांना
भूक–दारिद्र्याने पिडल्या–सडलेल्यांना
ताठ केल्या त्याने वाकलेल्या माना
रुद्ध कंठांतही पेरल्या विजयाच्या ताना !
मुजऱ्यांसाठीच केवळ वर होणाऱ्या
हातात दिल्या त्याने नंग्या समशेरी
बेभान आवाजात वडविल्या भेरी !
निर्भयपणे घुमला रस्त्यारस्त्यांतून–
झडत असता जुल्मी बंदुकींच्या फेरी !
व्हॉल्टर–रूसोच्या मुखातून प्रकटून
फोडून टाकला त्याने बॅस्टीलचा तुरुंग.
उभारला झेंडा खंडाखंडातून !
अन्यायाचा काळोख भेदून जाणारी
रशियात घुमविली समतेची बांग
गोऱ्या कातडीला सलाम करणाऱ्यांना
शृंखला तोडून, शिकविले गीत मानवी मुक्तीचे !
यानेच दिला उद्गार
सावकारी चाबकांच्या फटक्याच्या पावसात
होरपळून गेलेल्या असहाय वारल्यांना
गळ्यातल्या मडक्यात थुंकी झालेल्या
लाखो अस्पृश्यांना मातीच्या मोलाने
श्रम विकणाऱ्या सर्व श्रमिकांना !
माणसाचा आवाज...
आज पुन्हा घणघणतोय्
रस्त्यांतून...चौकांतून...चाळींच्या बिळांतून
उठवतोय झोप.
लोकशाहीवर बलात्कार करणाऱ्या सत्ताधुंदांची.
मागतोय डायरी.
पंचवीस वर्षे ऐष भोगलेल्या प्रत्येक दिवसाची.
शराबी डोळ्यांच्या फडी रात्रींची !
माणसाचा आवाज.
झालाय आज.
सहस्त्रमुख,...सहस्त्रपाद...सहस्त्रकर...सहस्त्राक्ष !
नाक्यानाक्यावर आहे एकेक सशस्त्र आवाज दक्ष !
माणसाचा आवाज :
एक चिरंतन ज्वाला.
एक फडफडणारा बावटा...वळलेली वज्रमूठ,
एक रोखलेली बंदूक...एक उपसलेली समशेर.
माणसाच्या रक्ताने लिहीलेला शेर !
माणसाचा आवाज :
सत्याहून सत्य.
राहिलेल्या शृंखला तोडून टाकण्यास्तव
नवे गीत देणारा जनतेचा शायर !
पिळवणुकीच्या अंधारास
वाकुल्या दाखवीत
नित्य उगवणारा एकच सूर्य
अनिवार्य !
ओम् आवाजाय् नमः । आवाज उवाच ।
" माणसाच्या आवाजातून यापुढच्या
क्रांतीचा मार्ग आहे !
पहा ! क्रांतीच्या रस्त्यावर घंटानादाच्या
कमानी उभारल्या जात आहेत...
जनताजनार्दना ! डफ तापला आहे
तुझ्या गळ्यातून ललकारांचा मोर्चा
बाहेर पडू दे !..."

–राजा राजवाडे

# दोन चेहऱ्यांचा हेर

# गार्बो



मि. जे. सी. मास्टरमन नावाच्या ऑक्सफर्डच्या प्राध्यापकाने हल्लीच एक सनसनाटी पुस्तक लिहिले आहे. युद्धकाळात प्राध्यापकमहोदय ब्रिटीश गुप्तहेरखात्याचे सल्लागार होते. युद्धसमाप्तीनंतर खात्याला त्यांनी सादर केलेला गुप्त अहवालच पुस्तक म्हणून आता जनतेसमोर आला आहे. या पुस्तकात मि. मास्टरमननी असा दावा केला आहे की युद्धकाळात ब्रिटनमध्ये उभारलेल्या जर्मन हेरव्यवस्थेचे अवघे नियंत्रण ब्रिटिश गुप्तहेरखात्याने केले आणि जर्मन युद्धयंत्रणेला वेळोवेळी चकवा दिला.

ब्रिटनमध्ये घुसलेल्या जर्मन हेरांना पकडून त्यांना दोस्तांकडे फितवण्यात आले. जर्मनीच्या लेखी ते निष्ठाशील जर्मन हेरच होते. त्यांच्याकरवी ब्रिटिश गुप्तहेरखात्याने कितीतरी खोटीनाटी, भ्रामक माहिती खरी म्हणून जर्मनांच्या गळी उतरवली. त्यातील एक विलक्षण प्रकरण असे : दुसरी आघाडी उघडून युरोपच्या भूमीवर प्रचंड सैन्य उतरवण्याची योजना दोस्तांनी आखली. हे सैन्य मुख्यतः पाद कॅले या ठिकाणी पायरोवा करण्याचा प्रयत्न करील अशी जर्मनांची समजूत करून देणे, ब्रिटनमधील जर्मन हस्तकांवरील नियंत्रणामुळे ब्रिटनला शक्य झाले. वस्तुतः दोस्त फौजा उतरणार होत्या नॉर्मंडीमध्ये. जर्मनांनी मात्र आपली प्रतिकारी ताकद पाद कॅले या ठिकाणी एकवटली होती. त्यामुळे नॉर्मंडीवरील चढाईला सुरूवात झाल्यावरही, तो फसवा हल्ला असेल असे मानून, जर्मनांनी आपले १५ डिव्हिजनएवढे सैन्य तेथील प्रतिकारात गुंतवले नाही.

सत्य हे प्रसंगी कल्पितापेक्षाही सुरस आणि चमत्कारिक असते हे सिद्ध करणारी कितीतरी प्रकरणे मि. मास्टरमनच्या प्रस्तुत पुस्तकात आहेत. त्यातील हेर-प्रतिहेरांची सांकेतिक नावे मजेदार आहेत : स्नो, झिगझॅग, ट्रायसिकल, बिस्किट, रेनबो, हॅम्लेट, पपेट, बलून, केअरलेस, चीज, कॅरट, लिपस्टिक, वॉकऊट, गार्बो.

एके ठिकाणी मास्टरमन म्हणतात : " 'स्नो' म्हणजे हेरगिरीच्या या जीवघेण्या खेळातील डब्लू. जी. ग्रेस मानला तर 'गार्बो'ला साक्षात डॉन ब्रॅडमन मानावे लागेल " 'गार्बो'ची कथा खरोखरच अद्भुत आहे.

गार्बो स्पॅनिश असून फॅसिझम आणि कम्युनिझमबद्दल त्याला सारखाच तिटकारा वाटत असे. स्पॅनिश यादवी युद्धात त्याला भूमिगत व्हावे लागले होते; त्यावेळी दोन वर्षे तो एकाच घरात लपून राहिला होता. दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यावेळी आपण ब्रिटीश हस्तक म्हणून जर्मनीमध्ये किंवा इटालीमध्ये काम करू शकू, असे गार्बोला वाटले. तसे काम मिळवण्याचा त्याने प्रयत्न केला, पण ब्रिटीश हेरखात्याने त्याला नकार दिला. पण गार्बोची फॅसिझमबद्दलची चीड इतकी प्रभावी होती की त्याने सरळ जर्मन हेर बनण्याचा यशस्वी प्रयत्न केला, अंतर्यामी हेतू अर्थात जर्मनांचा विश्वासघात करण्याचाच होता.

गार्बोने बनावट कागदपत्र तयार केले आणि १९४१ सालच्या जुलैमध्ये माद्रिद सोडून इंग्लंडला जायला तो निघाला. पण खरे म्हणजे तो इंग्लंडला गलाच नाही. त्याने लिस्बनला तळ ठोकला. तेथे राहून इंग्लंडबद्दलची सर्वस्वी कल्पित माहितीपत्रे त्याने लिहिली, इंग्लंडमधून विश्वासू हस्तकांकरवी ती पोर्तुगालला पाठवली गेली, अशी बतावणी त्याने केली, आणि पोर्तुगालहून टपालाने ती जर्मनीत पावती झाली. गार्बोच्या या बनावट माहितीपत्रांनी जर्मनांची चांगलीच फसवणूक झाली. पुढे १९४२ सालच्या एप्रिलमध्ये गार्बोला पोर्तुगालमधून इंग्लंडला हलवण्यात आले. तेथेही त्याचे विश्वासघातकी काम चालूच राहिले. या कामातील त्याची सफाई विलक्षण असली पाहिजे, कारण युद्धातील उभयपक्षांना गार्बोचे मोल इतके वाटत होते की त्यांनी त्याच्या कामगिरीबद्दल त्याला मुद्दाम सन्मान बहाल केले, १९४४ सालच्या डिसेंबरमध्ये ब्रिटिशांनी गार्बोला एम्. बी. ई. (मेंबर ऑफ द ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायर) केले, आणि जर्मनांनी त्याला आयर्न क्रॉस हे पदक देऊ केले !


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

# सेक्स एज्युकेशनचा नवा धंदा
# गुप्तग्यान

यशस्वी हिंदी चित्रपट काढायला डोकं लागतं. असं डोकं लढवून काढलेल्या चित्रपटांनीच सिल्व्हर नि गोल्डन ज्युबिल्या साजऱ्या केल्या आहेत. काश्मीरमध्ये कॅमेरे चालवून मध्यंतरी काही निर्मात्यांनी आपले खिसे भरले. त्याला लोक कंटाळलेले पाहताच त्यांनी परदेशी धाव घेतली. रोम, पॅरिस, लंडनच्या रस्त्यांवर भारतीय नायक-नायिका गाणी म्हणू लागली. तेही आकर्षण कमी झालेलं पहाताच ही मंडळी 'सेक्स'कडे वळली. कॅबरे डान्सेस, बेडसिन्स चित्रपटाचा अविभाज्य भाग बनले. नायिका वेश्या बनल्या. नायक त्यांचा उद्धार करू लागले. हिरो हिरॉइनसाठी कोवळे तरुण-तरुणी वापरण्यात आल्या. त्यांची उघडी शरीरं पाहायला पब्लीकनं रांगा लावल्या. पण यालाही पब्लीक कंटाळणार असा रंग दिसू लागला. आता याही पलीकडे जायचं तर न्यूडसिन्स. पण सेन्सॉरवाल्यांना त्याची अॅलर्जी. आदर्श नावाच्या एका दिग्दर्शकानं यावर तोड काढली. त्यांनी 'गुप्तग्यान' हा सेक्स एज्युकेशन देणाराच एक चित्रपट काढला. एज्युकेशन वगैरे म्हटल्यावर सेन्सॉरवाले गडबडले असावेत. त्यांनी 'ए' सर्टिफिकीट देऊन चित्रपट पास केला. दिग्दर्शकांनी अॅडल्टसमधला A मोठा करून पोस्टरवर लावला.

शेजारी गर्भाशयातल्या गर्भाचं चित्र.

प्रत्यक्ष अर्भकाचा जन्म पडद्यावर पहा!

'गुप्तग्यान' हा सेक्स एज्युकेशनवरला पहिला हिंदी चित्रपट. पण हे जरा फार होतंय. 'गुप्तग्यान' सेक्स एज्युकेशनवरला पहिला चित्रपट तर मग आजवरचे हिंदी चित्रपट कशावर होते? त्यांनी हे एज्युकेशन दिलं नाही तर दुसरं काय केलं? फार तर त्याला शास्त्रीय पद्धतीनं उघड सेक्सचे धडे देणारा चित्रपट म्हणू या.

चित्रपटाच्या सुरुवातीलाच हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय चक्क खडू हातात घेऊन फळ्यावर सेक्सचे धडे देताना दिसतात. कुणाला? तर मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना – तेही हिंदीतून – अगदी मेल, फिमेल वर्गवारीपासून सुरुवात, नशीब ते फुलातल्या स्त्रीकेसर आणि पुंकेसरपासून सुरुवात करीत नाहीत. चित्रपटाच्या या सुरुवातीपासूनच विषयाच्या पोरकट हाताळणीची, दिग्दर्शकाच्या बौद्धिक आवाक्याची जाणीव होऊ लागते.

आकृत्या, अॅनिमेशन आणि प्रत्यक्ष दृश्य अशा तीन स्वरूपात हा विषय समजावून सांगण्यात येतो. लैंगिक अवयवांची ओळख करून दिल्यावर गुप्तरोग, कुटुंबनियोजनाची साधने, त्याचा वापर, गर्भपात इत्यादी धडे देण्यात येतात. एवढंच जर या चित्रपटात असतं तर तो बऱ्यापैकी माहितीपट बनला असता. पण चित्रपट म्हटला म्हणजे त्याला स्टोरीबिरी हवीच अशा समजुतीनं दिग्दर्शकानं पारंपारिक हिंदी वळणाचं कथानक जोडून त्याला गलिच्छ स्वरूप दिलंय.

स्टोरी ऐकायची उत्सुकता असेल तर ऐका. (नसली तरी ऐका) एक असतो हिरो. त्याची आई सिफीलसनं मरते. वडिलांना सिफीलस झालेला. आईच्या चितेजवळ उभा राहून तो सेक्स रोग तज्ज्ञ बनायची प्रतिज्ञा करतो. हिरो असल्यामुळे तो बापाची कवडीदेखील न घेता घराबाहेर पडतो. बाहेर देखभाल कोण करणार या प्रश्नाला तो तडफदार उत्तर देतो. 'जो हमे पैदा करता है वोही हमारी देखभाल करता है' कॉलेज अॅडमिशनसाठी डोनेशन पाहिजे. हा कर्ज मिळवण्यासाठी भटकतो. सगळे त्याला हाकलून देतात. पुढं त्याला एक दानशूर गृहस्थ अचानक भेटतो. इतका दानशूर की तो हिरोला शिक्षणासाठी झटकन चेकनं पैसे देतो आणि पुढे त्याच्यासाठी चेक फाडतच राहतो. फीसाठी पैसे हवेत – फाड चेक. डिग्री मिळाली. फॉरीनला जायचंय – फाड चेक. हॉस्पिटल काढायचं – फाड चेक. हिरो नाव कमावतो. या धंद्यात एक ढोंगी बदमाश डॉक्टर असतो. हिरोच्या लोकप्रियतेने या 'व्हिलन'च्या धंद्यावर गदा येते. तो कट रचतो. एका स्त्रीला हिरोकडे पाठवतो. ती बाई हॉस्पिटलात हिरोनं बलात्कार केल्याची ओरड करते. हिरो तुरुंगात. इथं त्या दानशूर गृहस्थाची बायको प्रसूतीसाठी अॅडमिट होते. तिची केस सिरीयस असते. तेव्हा या कामाला हिरोच हवा. पडद्यावर हा सोहळा तपशीलवार दाखवण्यात येतो (चित्रपट सेक्स एज्युकेशनवर आहे हे विसरून कसं चालेल?) हिरोवर नंतर एकदा गोळी झाडण्याचाही प्रयत्न होतो. पण ही गोळी शेजारच्या नर्सला लागते. ती देखील दंडाला. कारण ही नर्स हिरोशी लग्न करणार असते. हरिंद्रनाथच्या सेक्सवरल्या लेक्चरनं सुरू झालेला हा चित्रपट या लग्नसोहळ्यानं संपतो.

बोला! या फापटपसाऱ्यात कसलं आलंय सेक्स एज्युकेशन! हे एज्युकेशन वगैरे सारं सेन्सॉरच्या डोळ्यात धूळ फेकण्याचं तंत्र. सेक्सचं शास्त्रोक्त शिक्षण देण्याच्या नावाखाली गल्ला गोळा करण्याची ही अनैतिक वृत्ती.

या चित्रपटाचे रंग आणि फोटोग्राफीही दळभद्री आहे. विषय गरमागरम असल्यानं कॅमेरा फोकस करण्याची गरज वाटली नसावी.

गुप्तरोग, गुप्त अवयव, प्रसूतीक्रियेचं दृश्य आणि कुटुंबनियोजन साधनांची प्रात्यक्षिकं ही चित्रपटाची प्रमुख आकर्षणं आहेत. हे सर्व पहायला प्रचंड गर्दी लोटल्याखेरीज राहणार नाही. एरव्ही पिवळ्या वेष्टनातली पुस्तकं वाचून तयार झालेल्या तरुणवर्गाला या चित्रपटातून मिळणारं 'ग्यान' गुप्तही नाही नि खऱ्या अर्थानं 'ग्यान'ही नाही. एक गोष्ट मात्र निश्चित साध्य होईल. अलीकडच्या हिंदी चित्रपटातली स्त्री-पुरुष आलिंगनाची, बेडसीन्सची आणि हेलनच्या तथाकथित धुंद मादक नृत्याची दृश्यं आता तरुणांना अगदीच मिळमिळीत आणि अळणी वाटू लागतील. 'बॉबी'सारख्या चित्रपटांना तर हा चित्रपट म्हणजे मोठं आव्हान आहे.

'गुप्तग्यान' आजवरच्या सर्व हिंदी चित्रपटाचे लोकप्रियतेचे रेकॉर्ड ब्रेक करण्याचाही संभव आहे. बाजपेयी, चंद्रशेखर इत्यादी खासदार, नगरपाल श्री. कोतवाल, राम जेठमलानी आणि नामवंत डॉक्टरांचे आशीर्वाद पाठीशी आहेतच.

–अवधूत परळकर

# टॉलस्टॉय–एक माणूस

लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

## पूर्वग्राहक : विनामूल्य भेट : योजना

कागद, छपाई, बांधणी इत्यादींचे भडकते भाव पहाता टॉलस्टॉय–एक माणूस लेखिका : सौ. सुमती देवस्थळे या चरित्रग्रंथाची किंमत अगाऊ निश्चित करता येत नाही. तरी ती रुपये तीस ते चाळीसच्या घरात जावी असा अंदाज आहे. आपण वीस रुपये भरून पूर्वग्राहक म्हणून नोंदणी करावी. ग्रंथ पाठविण्याचा टपाल पॅकिंग इत्यादी खर्च मात्र आपल्याला करावा लागणार आहे. [ वीस रुपये दोन सारख्या हप्त्यात भरण्याचीही सवलत आपण घेऊ शकता. ]

- पाच वर्षांची साप्ताहिक माणूसची किंवा चित्रवार्ता पाक्षिकाची रुपये शंभर ही वर्गणी आपण एकदम भरली तर हा ग्रंथ आपणास विनामूल्या मिळेल. पाठवणी-खर्च आपल्याकडे राहील.
- पाच वर्षांसाठी रुपये शंभरची ठेव ' राजहंस प्रकाशन 'कडे ठेवली तरी हा ग्रंथ विनामूल्य मिळू शकेल. पाठवणीखर्च ठेवीदाराचा.
- सव्वाशे रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपण विकत घेतलीत तर हा ग्रंथ विनामूल्य देण्यात येईल. पाठवणीखर्च ग्राहकाचा.
- ग्रंथ १९७४ अखेर प्रसिद्ध होईल.
- ठेव असल्यास ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्ट किंवा म. ऑ. ने रक्कम पाठवावी.
- पाच वर्षांची वर्गणी पाठविणे असल्यास ड्राफ्ट ' व्यवस्थापक माणूस ' या नावावर पाठवावा व सोबतच्या पत्रात चित्रवार्ता पाक्षिक किंवा साप्ताहिक माणूस यापैकी कुठला अंक हवा त्याचा खुलासा करावा.
- चेकने रक्कम पाठवणाऱ्यांनी वटणावळ म्हणून एक रुपया अधिक पाठवावा.
- या टॉलस्टॉय पुस्तक योजनेची मुदत ३१ मार्च १९७४ पर्यंत आहे.

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पुणे–४११ ०३० दूरध्वनी : ५७३५९**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस'

# यापुढचा
# साप्ताहिक
# माणूस
# अंक
# लघुउद्योग
# विशेषांक
# किंमत
# एक रुपया

□

# नोकरी नसलेल्या
# नोकरी नको असलेल्या
# सर्वांनी
# पहावा असा

□

---

...मराठी तरुणांनी आज मोठ्या संख्येने उद्योगधंद्यांकडे वळलं पाहिजे. 'पैसा नाही' ही सबब आज खोटी आहे...

—आ. मनोहर जोशी

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर